कर्मचारी वर्गाला आनंदी ठेवले तर त्यांची उत्पादन क्षमता वाढीस लागेल आणि त्या आस्थापनाला त्याला फायदा होऊ शकतो. त्यामुळे या कर्मचाऱ्यांचे आनंदाचे प्रमाण शास्त्रोक्त पद्धतीने मोजून त्यांचे निर्देशांक निश्चित करणे तसेच त्याबाबत मूल्यमापन करून देण्याचे काम करणाऱ्या अनोख्या कंपनीबाबत.

सविस्तर वृत्त पान ८ वर

# कर्मचारी टाइम्स

शासकीय कर्मचाऱ्यांचा हितरक्षक कर्मचारी टाइम्स

• मुंबई, १, ऑगस्ट २०२३ • वर्ष - १, अंक ७ • पाने ८ • किंमत १० रुपये फक्त.

शीर्षक सत्यापन क्रमांक ५२०२८ दिनांक ११/१०/२०२२ माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारद्वारा प्राप्त.

Title Verification No. 52028 dated 11/10/2022 Received by Ministry of Information and Broadcasting, Government of India.

www.karmacharitimes.com • संपादक - श्री. एम. एम. उर्फ भाऊसाहेब पठाण Email - karmacharitimes@gmail.com

कर्मचारी टाइम्स
ALL-IN-1 QR CODE
वर्गणीदार व्हा...

# अडीच वर्षांपासून २.४४ लाख पदे रिकामी

**मुंबई :** राज्यातील विविध विभाग आणि जिल्हा परिषदांतर्गत २.४४ लाखपेक्षा अधिक पदे रिक्त असल्याचे उघड झाले आहे. याबाबतची माहिती राज्य शासनाकडे माहिती अधिकारात मागितल्यानंतर पुढे आली आहे.

शासकीय विभाग व जिल्हा परिषदेतील ३१ डिसेंबर २०२० पर्यंतची माहिती उपलब्ध झाली असून, एकूण २९ शासकीय विभाग आणि जिल्हा परिषद यात मंजूर पदांची संख्या १० लाख ७० हजार ८४० इतकी आहे. यापैकी ८ लाख २६ हजार ४३५ पदे भरलेली आहेत, तर २ लाख ४४ हजार ४०५ इतकी पदे रिक्त असल्याची माहिती माहिती अधिकार कार्यकर्ते अनिल गलगली यांना महाराष्ट्र शासनाने दिली आहे. महाराष्ट्र शासनाकडे १४ जून २०२३ रोजी अर्ज सादर करत महाराष्ट्र शासनाच्या अंतर्गत सर्व वर्गातील एकूण पदांची माहिती देताना मंजूर पदे, भरलेली पदे आणि रिक्त पदांची माहिती मागितली होती. त्याबाबतचा खुलासा मिळालेल्या उत्तरातून स्पष्ट झाला आहे. त्यातून ही बाब उघड झाली आहे.

सामान्य प्रशासन विभागाने अनिल गलगली यांना गटनिहाय शासकीय व जिल्हा परिषदेतील गट अ, ब, क आणि ड मधील ३१ डिसेंबर २०२० पर्यंतची माहिती उपलब्ध करून दिली. एकूण २९ शासकीय विभाग आणि जिल्हा परिषद यांत मंजूर पदांची संख्या १०,७०,८४० इतकी आहे. ज्यापैकी ८,२६,४३५ इतकी पदे भरलेली आहेत, तर २,४४,४०५ पदे रिक्त आहेत. यात शासकीय कर्मचाऱ्यांची १,९२,४२५ तर जिल्हा परिषदेच्या ५१,९८० अशी एकूण २,४४,४०५ पदे रिक्त आहेत. गृह विभागाची एकूण मंजूर पदे २,९२,८२० असून, त्यापैकी ४६,८५१ पदे रिक्त आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाची एकूण मंजूर पदे ६२,३५८ असून, यापैकी २३,११२ पदे रिक्त आहेत. जलसंपदा विभागाची एकूण मंजूर पदे ४५,२१७ असून, त्यापैकी २१,४८९ पदे रिक्त आहेत. महसूल व वन विभागाची एकूण मंजूर पदे ६९,५८४ असून त्यापैकी १२,५५७ पदे रिक्त आहेत. उच्च व तंत्र विभागाची एकूण मंजूर पदे १२,४०७ असून, त्यापैकी ३,९९५ पदे रिक्त आहेत. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाची एकूण मंजूर पदे ३६,९५६ असून, त्यापैकी १२,४२३ पदे रिक्त आहेत. एकूणच राज्य सरकारच्या विविध विभागांतील २,४४ लाख पदे रिक्त असल्याची माहिती माहिती अधिकारातून समोर आली आहे.

### रिक्त पदे तत्काळ भरावीत

रिक्त पदांमुळे सेवेत दिरंगाई होते आणि सामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. सरासरी २३ टक्के पदे रिक्त असली तरी काही विभागात ३० ते ५० टक्क्यांपर्यंत पदे रिक्त असल्याची खंत अनिल गलगली यांनी व्यक्त केली आहे. शासनाने तत्काळ ही रिक्त पदे भरण्याची आवश्यकता आहे. असे मत गलगली यांनी व्यक्त केले. दरम्यान, विविध शासकीय कर्मचारी संघटनांनी याबाबत नाराजी व्यक्त केली असून शासनाकडून याची गंभीर दखल घेऊन योग्य ती कार्यवाही लवकरच व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## पेन्शनसाठी निर्णायक आंदोलनाचा निर्धार

**मुंबई :** जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या समितीची तीन महिन्यांची मुदत संपली असून यापुढे त्यांना मुदतवाढ देण्यात येऊ नये, तसेच पेन्शनबाबत लवकरात लवकर निर्णय जाहीर करावा, अन्यथा निर्णायक आंदोलन करण्याचा निर्धार महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाच्या बैठकीत करण्यात आला.

त्याच बरोबर बैठकीत अन्य मुद्यांवरही चर्चा झाली. त्यानुसार सेवानिवृत्तीचे वय केंद्र व अन्य २५ राज्यांप्रमाणे ६० वर्षे करण्यात यावे, सरळसेवा भरती प्रक्रिया अंमलात यावी, सेवानिवृत्ती उपदान / मृत्यू उपदानाची (ग्रॅज्युईटी) कमाल मर्यादा २० लाख रुपये करण्यात यावी, प्रशासकीय विभागाची सेवाज्येष्ठता यादी १ जानेवारीलाच संकेतस्थळावर प्रकाशित व्हावी, सातव्या वेतन आयोगाचा हप्ता विनाविलंब मिळावा, शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना कर्तव्य बजावत असताना मारहाण झाल्यास त्यावर शासनाने कायदेशीर कारवाई लवकरात लवकर पूर्ण करावी. गट विमा योजनेचा निधी सातव्या वेतन आयोगाशी सुसंगत असावा आदी मागण्यांबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली.

# कंत्राटी भरती बंद ?

**मुंबई :** राज्यातील सरकारी नोकऱ्यांचे खासगीकरण करताना शासकीय / निमशासकीय नोकर भरती बाह्ययंत्रणेच्या माध्यमातून करण्याचा आणि त्यासाठी नऊ संस्थांची नियुक्ती करताना कामगार विभागाने या संस्थावर मेहरबानी दाखविल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही कामगार विभागाच्या या निर्णयावर आक्षेप घेतल्यामुळे तो रद्द करण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कामगार विभागास दिल्याचे समजते.

नोकर भरतीमुळे सरकारवर पडणारा आर्थिक ताण कमी करण्यासाठी शासकीय / निमशासकीय कार्यालयांमधील कामांसाठी बाह्ययंत्रणेच्या माध्यमातून मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्याचा निर्णय कामगार विभागाने १४ मार्चला घेतला होता.

कामगार विभागाच्या या निर्णयास त्यावेळी राज्यभरातून विरोध झाला होता. मात्र त्यावेळी जबरदस्तीने हा निर्णय लागू करणाऱ्या राज्य सरकारला आता मात्र या निर्णयातील फोलपणा दिसू लागला आहे. राजकीय तसेच समाजातून या निर्णयास विरोध होत असताना प्रशासनातूनही आता या निर्णयास विरोध होऊ लागला आहे. काही सनदी अधिकाऱ्यांनीही या निर्णयामुळे सुशिक्षित बेरोजगार तरुणांचे तसेच राज्याचेही नुकसान होणार असल्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या निदर्शनास आणले होते. त्याचप्रमाणे कामगार विभागाने सन २०१४ मध्ये अशाच प्रकारे मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या संस्थांची नेमणूक करताना कामगारांचे मानधन निश्चित तर ठेकेदारासाठी १४ टक्के सेवाशुल्क निर्धारित केले होते. आता मात्र या कंपन्यांना ३० ते ४० टक्के सेवाशुल्क देण्यात येत असल्याचे सचिवांनी फडणवीस यांच्या निदर्शनास आणले.

विकासकामांसाठी पुरेसा निधी मिळावा यासाठी प्रशासनावरील खर्चात बचत व्हावी यासाठी शक्य असेल तेथे बाह्ययंत्रणेमार्फत कामे करून घेण्यासाठी सेवा पुरवठादार नऊ संस्थांची नियुक्ती करण्याचा निर्णय कामगार विभागाने घेतला होता. मात्र या निर्णयात कामगारांना किती रक्कम मिळणार आणि सेवापुरवठादार संस्थेला किती पैसे मिळणार आहेत याचा उलगडा होत नाही. तसेच यात ठेकेदारांना अधिक लाभ देण्यात आल्याचे उदाहरणासह स्पष्ट झाले आहे. सदर शासन निर्णयानुसार सहायक मालमत्ता व्यवस्थापक पदावर नियुक्त होणाऱ्या व्यक्तीस संबंधित विभागाने ठेकेदार संस्थेला ६२ हजार ९०० रुपये महिन्याला दिल्यावर ठेकेदाराने किमान वेतन कायद्यानुसार सदर व्यक्तीला १८ हजार ९०८ रुपये मानधन दिल्यास ठेकेदाराकडे ४३ हजार ९९२ रुपये शिल्लक राहतील. म्हणजेच ठेकेदाराची कमाई किमान वेतनाच्या २३२.६६ टक्के एवढी येते. कामगार विभागाने कर्मचाऱ्यांच्या हितसंरक्षणाचे कार्य करणे अपेक्षित आहे. त्यामुळे या ठेकेदार संस्थांची नियुक्ती करताना त्यांचे शुल्क वाजवी राहील याची खबरदारी घ्यायला हवी होती, असे फडणवीस यांनी मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे.

नोकर भरतीच्या कंत्राटात ठेकेदार संस्थांना अवास्तव लाभ मिळतो. सरकारची किती बचत होते हे स्पष्ट होत नाही. त्यामुळे कामगार विभागाचा हा निर्णय रद्द करण्याची मागणी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्र्यांकडे पत्राद्वारे केली होती. फडणवीस यांच्या या पत्रानंतर शिंदे यांनीही १५ मार्चचा शासन निर्णय रद्द करण्याच्या सूचना कामगार विभागास दिल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यानुसार कामगार विभागाने त्या अनुषंगाने हालचाली सुरू केल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### ठळक मुद्दे

कामगार विभागाच्या निर्णयानुसार मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या ॲक्सेंट टेक सर्व्हिसेस, सी. एम. एस. आयटी सर्व्हिसेस, सीएससी ई-गर्व्हनन्स सर्व्हिसेस इंडिया, इनोवेव आयटी इन्फ्रास्ट्रक्चर, क्रिस्टल इंटीग्रेटेड सर्व्हिसेस, सिंग इंटेलिजन्स सिक्युरिटी सर्व्हिसेस, ऊर्मिला इंटरनॅशनल सर्व्हिसेस या नऊ संस्थांची पाच वर्षांसाठी नेमणूक केली आहे.

या संस्था प्रकल्प अधिकारी, प्रकल्प सल्लागार, वरिष्ठ अभियंता, कनिष्ठ अभियंता, लेखापरीक्षक, अशा विविध ७४ संवर्गातील अतिकुशल पदांसाठी मनुष्यबळ पुरवठा करतील. त्यासाठी सरकारी विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळे, सार्वजनिक उपक्रम यांना या नऊ संस्थांकडूनच आवश्यक मनुष्यबळ घेण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे.

# जिल्हा प्रशासनात मोठे फेरबदल

**मुंबई :** राज्य सरकारने प्रशासनात मोठे फेरबदल केले आहेत. जिल्हा प्रशासनातील महत्त्वाचे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, उपजिल्हाधिकारी पदांवरील अधिकाऱ्यांच्या घाऊक बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये मुंबई शहरचे जिल्हाधिकारी म्हणून मुख्य सचिवांचे सहसचिव राजेंद्र क्षीरसागर यांची नियुक्ती करण्यात आली आहे, तर मुंबई मनपा सहआयुक्तपदी नाशिकचे जिल्हाधिकारी गंगाधरन डी. यांची बदली करण्यात आली आहे. दरम्यान, या घाऊक बदल्यांमुळे येत्या काळात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक लागण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

मुंबई मनपातील सहआयुक्त अजित कुंभार यांची बदली अकोला जिल्हाधिकारीपदावर करण्यात आली आहे. जव्हार आदिवासी प्रकल्प विकास अधिकारी आयुशी सिंग यांची बदली गडचिरोली येथे जिल्हा परिषद मुख्याधिकारीपदी करण्यात आली आहे. महाराष्ट्र शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण परिषद पुणे या पदावर यवतमाळचे जिल्हाधिकारी अमोल येडगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

वाशिमचे जिल्हाधिकारी षण्मुगराजन एस. यांची बदली मुंबईत उद्योग विभागात अतिरिक्त विकास आयुक्तपदी करण्यात आली आहे. तर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मुंबई येथे मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर जालनाचे जिल्हाधिकारी विजय चंद्रकांत राठोड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अकोल्याच्या जिल्हाधिकारी निमा अरोरा यांची बदली मुंबईत माहिती तंत्रज्ञान विभागाच्या संचालकपदी करण्यात आली आहे. तसेच आता उपमुख्यमंत्री कार्यालय मुंबई येथील सहसचिव संतोष पाटील यांची नियुक्ती कोल्हापुरात जिल्हा परिषद मुख्याधिकारीपदी करण्यात आली आहे.

संजय खंदारे यांची मंत्रालय मुंबई येथे प्रधान सचिव पाणीपुरवठा व सांडपाणी व्यवस्थापन विभागात करण्यात आली आहे. नाशिक मनपा आयुक्तपदी मुंबई येथील राज्य कामगार विमा आयुक्त डॉ. ए. एन. करंजकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रीय ग्रामीण मिशन मुंबईच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर रुचेश जयवंशी यांची बदली करण्यात आली आहे.

कोकण विभाग महसूल उपायुक्त मकरंद देशमुख यांची बदली सहआयुक्त मुख्य सचिव कार्यालय मुंबई येथे करण्यात आली आहे. या बदल्यांबरोबरच राज्य शासनाच्या वतीने रायगडच्या जिल्हा परिषद मुख्याधिकारीपदी राज्य रस्ते महामंडळ मुंबईचे मुख्य महाव्यवस्थापक बी. एन. बस्तेवाड यांची बदली करण्यात आली आहे.

## कामगार सेतू नोंदणी केंद्र

**मुंबई :** राज्याच्या अर्थव्यवस्थेत कामगार महत्वाचा घटक असून कामगारांच्या कल्याणासाठी तसेच शासकीय योजनांचा त्यांना लाभ मिळावा, यासाठी प्रत्येक तालुक्यात सर्व प्रकारच्या कामगार नोंदणीसाठी कामगार सेतू नोंदणी केंद्र उभारण्यात येणार आहे, अशी माहिती कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी विधानसभेत दिली. आमदार कैलास घाडगे-पाटील यांनी याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता.

सदर मुद्द्यावर विधानसभा सदस्य नाना पटोले, अनिल देशमुख, आशिष शेलार, राजेश टोपे, विजय वडेट्टीवार, अतुल भातखळकर, भास्कर जाधव, प्रणिती शिंदे, योगेश सागर आदी सदस्यांनी देखील चर्चेत सहभाग नोंदवला.

## बांद्रा नागरी स्वास्थ्य केंद्र आरोग्य कर्मचारी संघटनेचा प्रथम वर्धापन दिन सोहळा हर्षोल्हासात संपन्न



**मुंबई :** बांद्रा येथील नागरी स्वास्थ्य केंद आरोग्य राज्य कर्मचारी संघटना संलग्न मुंबई उपनगर यांचा प्रथम वर्धापन दिन सोहळा दिनांक १५ जुलै २०२३ रोजी आनंददायी वातावरणात आणि हर्षोल्हासात संपन्न झाला.

त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून राज्य सरकारी गट-ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, महाराष्ट्राचे राज्याध्यक्ष भाऊसाहेब पठाण, सरचिटणीस बाबाराम कदम, नागरी स्वास्थ्य केंद्राचे डेंटल सर्जन डॉ. राजेश लाभसेटवार, मुंबई सा. बां. विभाग व आमदार निवास शाखेचे अध्यक्ष विश्वास रणदिवे, सचिव शशिकांत एन. सकपाळ, उपसचिव नंदकुमार साने, जी. टी. रुग्णालयाचे अध्यक्ष पराग आडीवरेकर, वरळी विमा रुग्णालयाचे अध्यक्ष बाळा सावर्डेकर, नागरी स्वास्थ्य केंद्र चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष भगवान धोंडू कदम, कार्याध्यक्ष सुयोग भिलारे, सल्लागार सुरेश तांबे, उपाध्यक्ष शोभा बाबू पवार, सरचिटणीस दिनेश जगन्नाथ भाग्यवंत, खजिनदार श्वेता सुरेश कांबळे तसेच अन्य पदाधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

संघटनेने कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून द्यावा आपला लौकिक वाढवावा, अशी अपेक्षा भाऊसाहेब पठाण यांनी व्यक्त केली आहे.



## पोदार आयुर्वेद संस्थेचा वर्धापन दिन

**मुंबई :** महादेवी आनंदीलाल पोदार आयुर्वेद संस्थेचा ८२ वा वर्धापन दिन सोहळा शानदार वातावरणात पार पडला. यावेळी रुग्णालयातील डॉक्टर, नर्सेस आणि चतुर्थश्रेणी कर्मचारी यांनी आपल्या कलांचे सादरीकरण करून कार्यक्रमात रंगत भरली. कार्यक्रमाची शोभा वाढवण्यासाठी सर्वांनी अतोनात मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

यावेळी प्रथम महिला अधिष्ठाता संपदा संत, आमदार सुनील शिंदे, संचालक डॉ. रामन घुंगराळेकर, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. सुश्रुत मुक्कावार, सहाय्यक संचालक डॉ. निकेतन झोडपे, प्रशासकीय अधिकारी नरसू पाटील व अनिल बंदिष्टी, अधिसेविका मिरा शिरसाठ तसेच राज्य सरकारी गट-ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण, सरचिटणीस बाबाराम कदम, स्थानिक पोदार आयुर्वेदिक संघटनेचे अध्यक्ष राजाराम कदम, सचिव विलास पाटील, कार्याध्यक्ष पांडुरंग शेळके, उपाध्यक्ष संजय गडकरी, खजिनदार भालचंद्र शिर्के तसेच मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी दिवस-रात्र उत्तम सेवा देणाऱ्या सुरक्षा रक्षकांना तसेच रुग्णालयाची उत्तम साफसफाई करणाऱ्या कर्मचारी वर्गाला सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे शानदार सूत्रसंचालन डॉ. प्रज्ञा साबडे यांनी केले.

# असंघटित कामगार कल्याण महामंडळासाठी सेस

**मुंबई :** राज्यातल्या असंघटित कामगारांसाठी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य असंघटित कामगार कल्याण महामंडळासाठी उद्योगांवर एक टक्का सेस आकारण्यात येणार आहे. याबाबतचा निर्णय लवकरच होणार असल्याचेही सांगण्यात येत आहे.

दरम्यान, सेस आकारल्यास उद्योजकांमध्ये असंतोष निर्माण होऊन उद्योग शेजारच्या राज्यांमध्ये जाण्याची किंवा उद्योग बंद पडण्याची भीती उद्योग विभागाच्याच अभिप्रायात नोंदवली आहे. पण तरीही हे महामंडळ आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण करण्यासाठी सेस आकारण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे पुढे आले आहे. राज्य सरकारने उद्योगांवर अधिक ताण देऊ नयेत, आहे ती परिस्थिती आव्हानात्मक आहे, त्याच भर पाडू नये, अशी मते व्यक्त होत आहेत. या विषयावर नक्कीच सकारात्मक भूमिका घेऊन दोन्ही बाजूंनी सुसंगत असा मार्ग निघेल, त्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत, अशीही मागणी यानिमित्ताने व्यक्त होताना दिसून येत आहे.

दरम्यान, अन्य राज्यांप्रमाणेच महाराष्ट्र राज्यातल्या असंघटित कामगारांसाठी महाराष्ट्र राज्य असंघटित कामगार कल्याण महामंडळ स्थापन करण्यास राज्यमंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. राज्याच्या ई श्रम पोर्टलवर १ कोटी ३६ लाख २८ हजार असंघटित कामगारांची नोंद झाली आहे. त्याचबरोबर अन्य नोंदणीकृत नसलेल्या कामगारांनाही नोंदणी करून घेण्याचे आवाहन शासनाच्या वतीने करण्यात आले आहे. पण यासाठी आता असा सेस आकारल्यास स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण होऊ शकते. स्थानिक लोकप्रतिनिधींकडून या आकारणीस विरोध होऊ



शकतो. कर किंवा अतिरिक्त कर लावल्यास कराचा भार सामान्य जनतेवर असल्याची भावना जनमानसात निर्माण होईल असे नगरविकास विभागाच्या अभिप्रायात नमूद केले आहे.

असंघटित क्षेत्रातील उद्योग हे सूक्ष्म, लघु व मध्यम आकारातील उद्योग आहेत. या उद्योगांचे भागभांडवलही अल्प असते. त्यामुळे सेस लागू केल्यास मोठ्या प्रमाणावर उद्योग बंद पडण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे वित्त विभागाच्या अभिप्रायात नमूद केले आहे. उद्योगांत गुंतवणूक करण्याच्या दृष्टीने देशांतर्गत राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर स्पर्धा आहे. हे महामंडळ स्वायत व स्वयंपूर्ण करण्याच्या दृष्टीने निधीचा स्रोत निर्माण करण्यात येणार आहे. त्यासाठी उद्योजकांवर सेस आकारण्यात येईल. त्यानुसार राज्यातल्या महानगरपालिका, नगरपालिका आणि नगर पंचायती क्षेत्रातील ५०० स्क्वेअर फूटपेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या निवासी वाणिज्यिक व शासकीय मालमत्ताधारकांवर मालमत्ता करासोबत सेस लावण्यात येणार आहे. निवासी क्षेत्रासाठी एक रुपया प्रति चौरस फूट, वाणिज्यिक क्षेत्रासाठी दोन रुपये चौरस फूट आणि शासकीय मालमत्तांसाठी एक रुपये प्रति चौरस फुटाप्रमाणे वार्षिक असंघटित कामगार कल्याण सेस कर आकारण्यात येणार आहे. पण असा सेस आकारण्यास कृषी उद्योग विभागाने विरोध दर्शविला आहे. त्यामुळे म्हणूनच याबाबत योग्य मार्ग निघण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.




## भारतीय मजदूर संघाचा वर्धापन दिन

**मुंबई :** भारतीय मजदूर संघाचा ६८ वा वर्धापन दिन सोहळा दादर येथील मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयातील सुरेंद्र गावस्कर सभागृह येथे मोठ्या जोशात आणि उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास माथाडी कामगार नेते आणि अध्यक्ष अण्णासाहेब पाटील, आर्थिक मागास विकास महामंडळ (कॅबिनेट मंत्री दर्जा) नरेंद्र अण्णासाहेब पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्याचबरोबर भारतीय मजदूर संघाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अनिल ढूमणे, बँकिंग क्षेत्राचे प्रभारी रामनाथ केणी, राष्ट्रीय कार्यकारणी सदस्या शर्मिलाताई पाटील, भारतीय मजदूर संघ महाराष्ट्राचे उपाध्यक्ष मधुकर येवले, मुंबई अध्यक्ष बापू दडस, मुंबई सचिव संदीप कदम तसेच मुंबई जिल्हा भारतीय मजदूर संघाचे सर्व पदाधिकारी आणि विविध क्षेत्रातील सन्माननीय सदस्य उपस्थित होते. यावेळी घरेलू कामगारांच्या दहावी बारावी पास झालेल्या मुलांना वह्या वाटप करण्यात आले. मुंबई इंटकचे माजी अध्यक्ष जनार्दन सिंह यांनी आपल्या सहकाऱ्यांसह भारतीय मजदूर संघात जाहीर प्रवेश केल्याबद्दल त्यांच्या सहकाऱ्यांसह सत्कार करण्यात आला. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी सर्वांनी योगदान दिले.

# तलाठी पदोन्नतीच्या प्रतीक्षेत; पदोन्नती डावलल्याची टीका

**पालघर :** पालघर जिल्ह्यात पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या तलाठ्यांकडून सेवाज्येष्ठता व इतर कागदपत्रांची मागणी फेब्रुवारीमध्ये करण्यात आली होती. नवनिर्मित मंडळ क्षेत्रांमध्ये पदोन्नती होणाऱ्या तलाठ्यांची नेमणूक करण्याचे स्पष्ट आदेश असताना ते डावलून अव्वल कारकून आणि मंडळ अधिकारी यांची बदली करून नेमणुका झाल्याचे आरोप होत आहेत. तसेच अदलाबदलीमध्ये अव्वल कारकून पदावरील उमेदवारांना सामावून घेतले असताना मंडळ अधिकारी पदासाठी डावलल्याने पुढील पदोन्नतीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. राज्यात सर्वत्र तलाठ्यांची संख्या कमी असताना फक्त पालघर जिल्ह्यातील तलाठी बढती प्रकरणात डावलले जात असल्याची भावना महसूल कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण करत आहे.

तलाठी आणि नवनिर्मित मंडळ अधिकारी यांच्या विविध सेवांविषयक प्रलंबित मागण्यांची पूर्तता करण्याबाबत वरिष्ठ कार्यालयाकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आला आहे. परंतु, यापैकी एकाही बाबीची पूर्तता न झाल्यामुळे त्यांच्यात नाराजीचे वातावरण आहे. त्यामुळे या संदर्भात पालघर जिल्हा महाराष्ट्र राज्य तलाठी संघाने जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांना निवेदन दिले आहे.

तलाठी पदासाठी भरती, तलाठी प्रवर्गातील बढती आणि कोतवाल भरती वा संदर्भातील शासनाच्या उदासीन धोरणाबाबत महाराष्ट्र राज्य तलाठी संघ, पालघर जिल्हा यांनी तलाठी आणि मंडळ अधिकारी यांच्या नाराजीच्या भावना शासनापर्यंत पोहोचवल्या आहेत.

त्याचबरोबर काम करताना येणाऱ्या संगणक आणि प्रिंटरमधील अडचणी आणि दुरुस्तीकडेही संघटनेने बोडके यांचे लक्ष वेधले आहे. तसेच आश्वासित प्रगती योजनांचा लाभ मिळणे, अतिरिक्त कार्यभार वेतन मिळणे, सर्व आस्थापन शाखा यांचा नियमित आढावा होणे, तलाठी भरतीमध्ये होणाऱ्या दिरंगाईमुळे संबंधितांवर कारवाई करणे, अशा एकूण आठ बाबींचा उल्लेख ह्या निवेदनात करण्यात आला आहे.

वर्षानुवर्षे एकाच पदावर अतिरिक्त कार्यभारासह काम करत असल्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांमध्ये तणाव आणि नैराश्येचे वातावरण आहे. काही कर्मचारी निवृत्तीच्या उंबरठ्यावर असून पदोन्नतीची इच्छा बाळगून आहेत. अशा परिस्थितीत जिल्ह्यात रिक्त असलेली किंवा रिक्त होणारे सहा मंडळाधिकारी यांची पदे तसेच नवीन १६ महसूल मंडळ अधिकाऱ्यांची पदे अशी २२ पदे पदोन्नतीने भरण्यासाठी प्रलंबित असताना तलाठी भरती रखडल्याने पदोन्नतीसाठी पात्र तलाठी आपल्या न्याय्य हक्कापासून अनेक दिवसांपासून वंचित राहिले आहेत.

**कोतवाल भरतीही रखडली**

कोतवाल संवर्गातील रिक्त असलेल्या पदापैकी ८० टक्के मर्यादित पदे एक विशेष बाब म्हणून भरण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. ही भरती प्रक्रिया १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत पूर्ण करण्यासाठी दक्षता घेण्यासंदर्भात शासनाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना कळवले आहे. असे असताना त्या संदर्भात कोणतीही कारवाई झाली नसल्याकडे लक्ष वेधण्यात आले आहे.

**अतिरिक्त वेतनाची मागणी**

पालघर जिल्ह्यामध्ये मागील नऊ वर्षांपासून तलाठी भरती झालेली नसून, अनेक तलाठी व मंडळ अधिकारी हे अतिरिक्त कार्यभार सांभाळत आहेत. त्यांना विशेष वेतन देण्याचा निर्णय असतानाही आजपर्यंत एकाही कर्मचाऱ्याला ते देण्यात आलेले नाही, त्यामुळे हे वेतन मिळावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

## परदेशात कार्यालयात हेडफोनचा वापर

**गोल्ड कोस्ट :** कार्यालयात हेडफोन घालणे योग्य आहे का? ते वापरणे कार्यालयीन वातावरणास असभ्य मानले जाते. साहजिकच अशा कर्मचाऱ्यांवर कारवाई देखील होत असते. पण आता त्याचा सर्रास वापर होऊ लागला आहे. ह्याचे कारण म्हणजे लॉकडाऊननंतर कर्मचाऱ्यांना कार्यालयातील आवाज गोंगाटा-सारखा वाटायला लागला असून तो असह्य होऊ लागला आहे. लिबी (एलिझाबेथ) सँडर, बाँड विद्यापीठाच्या संशोधनात हे अचंबित करणारे निष्कर्ष पुढे आले आहेत.

ओपन प्लॅन ऑफिसच्या आवाजाची तीव्रता कर्मचाऱ्यांच्या कामगिरीवर लक्षणीय परिणाम होतो. संशोधनात असे आढळून आले की, अशा कार्यालयांमधील आवाजामुळे मन विचलित होते. त्यामुळे कामावर लक्ष केंद्रित करणे कठीण होते, असेही या संशोधनात स्पष्ट झाले आहे.

# 'समान काम, समान वेतन'साठी हालचाली

**नवी मुंबई :** महानगरपालिकेतील विविध आस्थापनांमध्ये कंत्राटी पध्दतीने शेकडो कामगार काम करीत आहेत. कंत्रादारामार्फत काम करणाऱ्या कामगारांना 'समान काम, समान वेतन' या निकषांनुसार वेतन द्यावे, अशी मागणी अनेक वर्षांपासून करण्यात येत आहे. या करीता विविध संघटनाकडून आंदोलने देखील करण्यात आली आहेत.

याबाबत करण्यात आलेल्या तरतुदीसाठी तत्कालीन पालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी कामगार संघटना समवेत चर्चा केली होती. तर पालिकेने विशेष समिती देखील गठीत केली आहे. या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या उपसचिव सुशिला पवार यांनी विद्यमान पालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांना नुकतेच पत्र पाठवून याबाबतची विस्तृत माहिती शासनाला उपलब्ध देण्याचे सूचित केले आहे. त्यामुळे नमुमपातील कंत्राटी कामगारांना आशेचा किरण मिळाला आहे.

दरम्यान, याबाबत त्वरित योग्य ती कार्यवाही करून कामगारांना न्याय मिळावा, अशी अपेक्षा यानिमित्ताने व्यक्त करण्यात येत आहे.

नवी मुंबई महापालिकेच्या घनकचरा, आरोग्य विभागासह विविध आस्थापनात सहा हजाराहून अधिक कंत्राटी कामगार कार्यरत आहेत. या कामगारांना 'समान काम, समान वेतन' देण्यासाठी शासनाकडे माजी सनदी अधिकारी तथा पर्यावरण समाधान प्राधिकरणाचे अध्यक्ष विजय नाहटा यांनी केलेल्या मागणीच्या संदर्भानुसार आणि २०२२ च्या पालिकेच्या पत्रानुसार शासनाने ५ जुलै २०२३ रोजी पालिका आयुक्तांना पत्र पाठवून कामगारांची माहिती मागवली आहे. त्याबाबतचा तपशील माहिती आल्यानंतर विचारात घेऊनच योग्य तो निर्णय घेण्यात येईल, अशीही माहिती मिळत आहे.

आयुक्तांना पाठविलेल्या पत्रात १० जून २०१४ च्या कामगार विभागाच्या परिपत्रकातील सूचनांनुसार कामगारांबाबत कार्यवाही होत आहे किंवा कसे याची खातरजमा करून शासनाला माहिती कळवावी. आकृतीबंधानुसार कामगारांचे संवर्ग माहिती व वेतनातील कुशल, अकुशल, अर्धकुशल वर्गवारीनुसार किमान वेतन देण्यात येते का? याची माहिती त्याचप्रमाणे कंत्राटी कामगारांना समान वेतन द्यावयाचे असल्यास किती वाढीव खर्च होईल याचा अहवाल शासनाकडे आठ दिवसात पाठवण्याचे सूचित करण्यात आले आहे. पालिकेने शासनाला माहिती पाठविल्यास निर्णय घेणे शक्य होणार असल्याने पालिका किती वेगाने हालचाली करणार हे पाहणे महत्त्वाचे ठरले आहे. पालिका प्रशासनाच्या वतीने याबाबत कुठलीही चालढकल करू नये तसेच त्वरित कार्यवाही करावी, अशी अपेक्षा कर्मचारी वर्गाकडून व्यक्त केली गेली आहे.

## इंटकचे क्रांती दिनापासून उपोषण

**नवी मुंबई :** ठोक मानधनावरील कर्मचाऱ्यांच्या समस्या न सुटल्यास ९ ऑगस्ट पासून महापालिका मुख्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा कामगार नेते व नवी मुंबई इंटकचे अध्यक्ष रविंद्र सावंत यांनी महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांना दिला आहे.

ठोक मानधनावर असणाऱ्या कामगारांना तुटपुंज्या वेतनावर उदरनिर्वाह करावा लागत आहे. कायम स्वरूपातील कामगार आणि ठोक मानधनावरील कामगार यांच्या वेतनात ४० ते ६५ टक्क्यांचा फरक आहे. ठोक मानधनावर असणाऱ्या लोकांना निदान नवी मुंबईत व्यवस्थित राहता येईल एवढे तरी वेतन द्यावे, अशी मागणी अनेक वर्षांपासून केली जात आहे. यासाठी अनेक आंदोलने, चर्चा, आश्वासने देण्यात आली मात्र अद्याप वेतन वाढ झाली नाही. त्यामुळे आता इंटक बेमुदत साखळी उपोषण सुरू करणार आहे. हे उपोषण क्रांती दिन अर्थात ९ ऑगस्ट पासून मनपा मुख्यालय समोर सुरू करण्यात येणार असून जोपर्यंत मागण्या लेखी स्वरूपात मान्य होत नाहीत, तोपर्यंत उपोषण करणार असल्याची माहिती रविंद्र सावंत यांनी पत्रकार परिषदेत दिली.

## मुंबई मनपा कर्मचाऱ्यांना मिळणार निवृत्तीच्या दिवशीच देणी

**मुंबई :** मुंबई महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीच्या दिवशीच यापुढे देणी देण्याचा निर्णय मनपा झालेल्या बैठकीत नुकताच घेण्यात आल्याची माहिती मुंबई मनपा कामगार कर्मचारी संघटना समन्वय समितीचे निमंत्रक ॲड. प्रकाश देवदास यांनी दिली.

मुंबई मनपा प्रशासक आणि आयुक्त डॉ. आय. एस. चहल यांच्यासमवेत मनपा कामगार कर्मचारी संघटना समन्वय समितीची मुंबई मनपा कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांवर बैठकीत चर्चा झाली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त डॉ. सुधाकर शिंदे, सहआयुक्त पी. वेलरासू, सहआयुक्त रमेश पवार व सह आयुक्त (सामान्य प्रशासन) मिलिन सावंत मुख्य लेखापाल, प्रमुख कामगार अधिकारी व समन्वय समितीचे निमंत्रक ॲड. प्रकाश देवदास, बा. शि. साळवी, अध्यक्ष बाबा कदम, सत्यवान जावकर, दिवाकर दळवी, वामन कविस्कर, अशोक जाधव, शरद सिंह, शेषराव राठोड, संजीवन पवार, के. पी. नाईक उपस्थित होते.

याबाबत ॲड. प्रकाश देवदास म्हणाले, १५ वर्षापूर्वी निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सत्कार करून त्याचदिवशी त्यांना निवृत्तीचे सर्व लाभ देण्यात येत असत. मात्र सध्या ४ ते ५ वर्षे सेवानिवृत्तीचे फायदे मिळत नाहीत. पुर्वीप्रमाणे ती पध्दत पुन्हा सुरु करण्यात येईल. निवृत्तीच्या दिवशीच सर्व देणी देण्यात येतील, असे आयुक्त व प्रशासक डॉ. आय. एस. चहल यांनी या बैठकीत आदेश दिले.

याचबरोबर वैद्यकीय विमा पॉलिसी ५ लाख रुपयांसाठी लागणारा इन्शुरन्स प्रिमियमची रक्कम प्रत्येक कर्मचाऱ्यांना देण्याचे तत्वतः मान्य झाले आहे. पॉलिसी सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही. ३० जून २०२३ रोजी निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना ती वेतनवाढ मिळत नाही. त्यावर आयुक्तांनी सांगितले की, एक अतिरिक्त वेतनवाढ थकबाकीसह देण्यात येईल, असे मान्य करण्यात आले. त्यासंबंधीचे परिपत्रक लवकरच काढण्यात येईल आणि त्यानुसार कार्यवाही करावी, असे निर्णय या बैठकीत घेण्यात आले. मात्र, उर्वरित ५ मागण्यांवर निर्णय झाला नाही.

## सहायक आयुक्त पदे महानगरपालिकेत रिक्त

**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेत सध्या १७ सहायक आयुक्त आहेत. एकूण पदांपैकी ५ जागा रिक्त असून सात जागा संबंधित विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडे अतिरिक्त पदभार सोपवून चालविल्या जात आहेत. अतिक्रमण निर्मूलन विभागात चार जागा रिक्त आहेत. त्यामुळे मुंबई मनपाच्या आयुक्तांपैकी ९ जागांवर सध्या सहायक आयुक्त नसल्याने मुंबईकरांच्या पावसाळ्यातील समस्यांचे निराकरण होणे अवघड आहे. आमदार आदित्य ठाकरे यांनी केलेल्या ट्विटमधून ही माहिती दिली आहे.

माहिती अधिकार कार्यकर्ते यांना मिळालेल्या माहितीच्या अधिकारांतून माहिती पुढे आली आहे. मागील १६ महिन्यांपासून मनपातील अनेक वॉर्ड हे संबंधित मनपा अधिकारी, आयुक्तांशिवाय चालविले जात आहेत. मुंबई पालिकेत एकूण ३६ आयुक्तांची नियुक्ती केली जाते. मुंबईतील २४ वॉर्डसाठी प्रत्येकी एक तर उर्वरित १२ सहायक आयुक्तांची नियुक्ती केली जाते. सदर पदे लवकरात लवकर भरली जावीत यासाठी कर्मचाऱ्यांकडून मागणी होत आहे.

# ठाण्यात ४३ हजार हेक्टरवर गिरणी कामगारांसाठी घरे

**मुंबई :** मुंबईतील बंद पडलेल्या गिरण्यांच्या जमिनीवर गिरणी कामगारांसाठी उपलब्ध होणाऱ्या घरांची मर्यादित संख्या विचारात घेता गिरणी कामगारांना अधिकाधिक घरे उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनातर्फे ठाणे जिल्ह्यात विविध ठिकाणी ४३ हजार हेक्टर जागा शोधण्यात आली आहे. या जागेवर सदनिका उभारण्यासाठी चाचपणी करण्यात येत असून त्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.



सह्याद्री अतिथीगृह येथे म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे सन २०२० मध्ये गिरणी कामगारांसाठी जाहीर झालेल्या सोडतीतील बॉम्बे डाईंग व श्रीनिवास मिलमधील पात्र व सदनिकेच्या विक्री किमतीचा, मुद्रांक शुल्काचा भरणा केलेल्या २५१ यशस्वी गिरणी कामगार/ वारसांना राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते दुसऱ्या टप्प्यांतर्गत सदनिकांच्या चाव्या व वितरणपत्र वाटप करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.

यावेळी पुढे बोलताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, १५ जून २०२३ रोजी पहिल्या टप्प्यांतर्गत १६७ पात्र यशस्वी गिरणी कामगार / वारसांना सदनिकांच्या चाव्या व वितरणपत्र वाटप करण्यात आल्यानंतर २० दिवसांत चावी वाटपाचा दुसरा टप्पा पार पडत असल्याने आनंद वाटत आहे. घर मिळण्यास विलंब होऊ नये यासाठी गिरणी कामगारांची जशी पात्रता निश्चित होईल तसे चावी वाटपाचे कार्यक्रम यापुढे देखील घेण्यात येतील. प्रधानमंत्री आवास योजना, मोदी आवास योजनेप्रमाणे विविध योजनांमधून सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात घरे उपलब्ध होत आहेत. मुंबईतील अनेक रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पांना चालना देऊन नागरिकांचे जीवनमान उंचावण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. शासनाने बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प, धारावी पुनर्विकास प्रकल्प हाती घेतले आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, गिरणी कामगारांना हक्काची घरे लवकर मिळावीत यासाठी संनियंत्रण समिती नेमण्यात आली असून गिरणी कामगारांची पात्रता निश्चित करण्याच्या आणि घरे वाटप करण्याच्या कामाला गती मिळाली आहे. ठाणे जिल्ह्यात विविध पाच ठिकाणी ४३ हेक्टर जमिनीची पाहणी करण्यात आली असून संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून कोणत्या जागेवर घरांची उभारणी शक्य आहे, याबाबतचा अहवाल मागवला असल्याचे त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, मुंबई आणि गिरणी कामगारांचे आगळेवेगळे नाते आहे. मुंबईच्या विकासासाठी गिरणी कामगारांनी अतोनात कष्ट घेतले आहेत. मुंबईबरोबरच देशाच्या जडणघडणीत तसेच राजकीय, सामाजिक चळवळीत या कामगारांचे मोठे योगदान आहे. घर हा जगण्याचा आधार असतो, नात्यांचा ओलावा असतो. त्याच अनुषंगाने स्वतःचे घर हा गिरणी कामगारांचा हक्क असून त्यांना घरांच्या चाव्या दिल्या जात आहेत, याचे वेगळे समाधान आहे.

शहर आणि औद्योगिक विकास महामंडळाच्या (सिडको) ३५० चौरस फूट चटई क्षेत्रफळाच्या १० हजार सदनिका तयार असून या सदनिकांची विक्री किंमत निश्चित झाल्यानंतर व गिरणी कामगार संघटनेने पसंती दर्शवल्यानंतर या सदनिका गिरणी कामगारांसाठी उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच ठाणे जिल्ह्यातील रायचूर व रायगड जिल्ह्यातील कोल्हे येथील २५२१ सदनिकांची सोडत लवकरच काढण्याचा विचार आहे तसेच अधिकाधिक गिरणी कामगारांना घरे मिळवून देण्याचाही प्रयत्न असल्याची माहिती याबाबत बोलताना गिरणी कामगार संनियंत्रण समितीचे अध्यक्ष आमदार सुनील राणे यांनी दिली आहे.

# बूट पॉलिश कामगार कुठे जाणार?

**मुंबई :** मुंबई रेल्वे स्थानकातील बूट पॉलिश कामगारांना श्रीकांत भारतीय यांच्या तर्पण संवेदना फाऊंडेशनच्या वतीने नुकतेच बूट पॉलिश किटचे वाटप करण्यात आले. मध्य आणि पश्चिम रेल्वेवरील सुमारे ५४० बूट पॉलिश कामगारांना येत्या तीन महिन्यांत टप्प्याटप्प्याने किटचे वाटप करण्यात येणार आहे. परंतु परवान्यातील जाचक अटींमुळे बूट पॉलिश करणाऱ्या कामगारांना काम मिळेल का, हा प्रश्न आहे.

मध्य-पश्चिम रेल्वेवर सध्या ५४० बूट पॉलिश कामगार आहेत. या बूट पॉलिश कर्मचाऱ्यांकडून रेल्वे दरमहा ठराविक भाडे घेते. त्यात अधिकृत नोंदणी नसलेल्यांची संख्या जास्त आहे. त्यामुळे या अनधिकृत बूट पॉलिश



कामगारांना आळा घालण्यासाठी मध्य रेल्वेने स्थानकांवर बूट पॉलिश कामगारांसाठी निविदा प्रक्रिया राबविण्याची घोषणा केली होती. त्यास अर्थातच विरोध झाला. त्यानंतर आता मध्य रेल्वेने मुंबई विभागातील ३५ स्थानकांसाठी या निविदा काढलेल्या आहे. यातून मध्य रेल्वेला वार्षिक २ लाख ५३ हजार ८२४ रूपये परवाना शुल्क मिळणार आहे. २५ हजार अनामत रक्कम प्रत्येक कामगाराकडून घेण्यात येणार आहे. मात्र, बूट पॉलिशचे कंत्राट खासगी कंपनीला दिले जाणार असल्याने अनेकांचा रोजगार हिरावला जाईल, अशी भीती व्यक्त होत आहे. कोरोनाकाळात लोकल सेवेवर निर्बंध असल्यामुळे हातावर पोट असणाऱ्या बूट पॉलिश कामगारांचा धंदा कमी झाला होता. परिणामी कुटुंबाचा उदरनिर्वाहसुध्दा व्यवस्थित होत नव्हता. त्यामुळे अनेकांनी बूट पॉलिश करण्याचा व्यवसाय सोडून गाव गाठले असल्याची माहिती बूट पॉलिश कामगारांमध्ये दिली आहे. कोरोनानंतर आता कुठे घडी बसत असताना रेल्वेच्या उफराट्या निर्णयामुळे बूट पॉलिश करणाऱ्यांमध्ये अस्वस्थता आहे. त्यामुळे त्वरित याबाबत संबंधित प्रशासनाने लक्ष देऊन कार्यवाही करावी, अशी मागणी कामगारांची आहे.

# महसूलच्या कर्मचाऱ्यांनी लाच घेण्यात मारला तीर !

**जालना :** लाच घेणे आणि देणे हा गुन्हा असला तरी अनेक जण आजही लाच घेतल्याशिवाय कामे करीत नसल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. जिल्ह्यात गेल्या सहा महिन्यांत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने जवळपास १४ कारवायांमध्ये २० जणांना ताब्यात घेतले. त्यात सर्वात पुढे महसूल विभाग असून, त्यापाठोपाठ खाकीतील वीरांचा नंबर लागतो.

प्रशासकीय यंत्रणेकडून आता अशा स्वरुपाचे प्रकार टाळण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्यास सांगितले आहे. मागील काही वर्षांपासून लाचखोरीत मोठी वाढ झाली आहे. सर्वसामान्य नागरिकांना कोणतेही काम करायचे असल्यास, लाच दिल्याशिवाय ते काम होत नसल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळेच लाचखोरीत वाढ झाली असून, पोलिस, महसूल, वन विभाग, पंचायत समिती, महावितरण आदी विभागातील अधिकारी व कर्मचारी लाचेच्या जाळ्यात अडकले आहेत. जिल्ह्यात लाच घेणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यरत आहे. या विभागाने गेल्या सहा महिन्यांत जवळपास १४ कारवाया केल्या. त्यात २० जणांना लाच घेताना पकडण्यात आले. सर्वाधिक ६ लाचखोर महसूल विभागातील आहेत. त्यात वर्ग तीनचे चार आणि वर्ग चारच्या दोन कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. पोलिस विभागातील चार जणांना पकडण्यात आले आहे.

# अंगणवाडी मदतनीसांसाठी पदवीधर रांगेत

**यवतमाळ :** अंगणवाडी मदतनीस म्हटले तर त्यांच्या नोकरीला गावात कुणीही वाव देत नाही. अशी काही स्थिती पूर्वी होती. आता मात्र चित्र बदलले आहे. मदतनीसाच्या नोकरीसाठी इंजिनिअरिंग, वैद्यकीय क्षेत्रातील मुलीही पुढे आल्या आहेत. यामुळे महिला बालकल्याण विभागही अचंबित झाला आहे.

आजच्या उच्च शिक्षण घेणाऱ्या तरुणी अंगणवाडीची नोकरी करण्यासाठी तयार आहेत. जिल्ह्यात ७०० जागांसाठी चार हजारांवर अर्ज आले आहेत. या ठिकाणी प्रवेश मिळाल्यानंतर सेविका म्हणून प्रमोशन आणि सुपरवायझर होता येणार आहे. सध्याची बेरोजगारी आणि नोकरीची गरज विचारात घेता मोठ्या प्रमाणावर उच्च-शिक्षित वर्गदेखील या पदावर नोकरी करण्यासाठी इच्छुक असल्याचे चित्र सध्याच्या परिस्थितीमुळे दिसून येत आहे. त्याचबरोबर हा विषयदेखील चर्चेचा ठरू लागलेला आहे.

अंगणवाडीच्या मदतनीस पदासाठी १६ तालुक्यांमध्ये ७०० वर जागा आहेत. या ठिकाणी चार हजारांवर अर्ज दाखल झाले आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणावर ही संख्या असल्यामुळे स्पर्धा विशेष आहे, असेच म्हणावे लागेल.

मदतनीसांना गावामधून अंगणवाडीत शिक्षण घेण्यासाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना घेऊन येण्याची जबाबदारी यासोबत खिचडी वाटपाची जबाबदारी सोपविण्यात येते.

मदतनीसाला किमान बारावीची पात्रता अट निर्धारित करण्यात आली आहे. मात्र, विविध पदवीधर विद्यार्थिनी यासाठी आल्या आहेत.

अंगणवाडी मदतनीसासाठी चार हजारांवर विद्यार्थिनींनी अर्ज दाखल केले आहेत. यात बहुतांश उच्च शिक्षित आहेत. या मुली परिसरातीलच असून त्यांना नोकरीची गरज असल्याचे त्यांच्याकडूनच सांगण्यात आले आहे. त्यामुळे पडेल ती नोकरी करून आपला उदरनिर्वाह भागविण्याचा या महिला उमेदवारांचा मानस आहे.

बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. त्यावर कोणाचेच नियंत्रण नाही. त्यामुळे बेरोजगार नियुक्तीच्या जाहिरातील जिथे दिसतील तिथे अर्ज दाखल करत आहेत.

अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करणाऱ्या आणि एमएससीचा अभ्यास पूर्ण केलेल्या विद्यार्थिनींदेखील या सेवेसाठी स्वतः संमती दर्शविली आहे.

## मनमाडच्या रेल्वेसह कामगारांच्या प्रश्नांबाबत भारती पवार यांना निवेदन

**मनमाड :** रेल्वे आणि कामगारांच्या विविध समस्यां-बाबत ऑल इंडिया एससी/ एसटी रेल्वे एम्प्लॉईज असोसिएशनतर्फे नांदगाव दौऱ्यावर आलेल्या केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री भारती पवार यांना निवेदन देण्यात आले.

सदर निवेदनात शहरात असलेल्या केंद्रीय इंजिनिअरिंग कारखान्यांमध्ये चतुर्थ श्रेणी (गट-ड) या पदाच्या जवळजवळ १५० जागा रिक्त आहेत. त्या जागा भरण्यासाठी रेल्वेमंत्री यांच्याशी चर्चा करून रिक्त जागा त्वरित भरण्यात तसेच कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी यावेळी करण्यात आली.

नाशिकहून मनमाडला जवळपास शंभरावर रेल्वे कर्मचारी ये-जा करीत असल्याने देवळाली येथून सकाळी सुटणाऱ्या गाडी क्र.११११३ ची वेळ बदलण्यात यावी आदी मागण्यांचा निवेदनात समावेश होता. या मागण्या लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी, अशीही त्यांची मागणी आहे.

निवेदन झोनल सचिव सतीश केदारे यांच्या नेतृत्वाखाली कारखाना शाखेचे कार्याध्यक्ष किरण आहिरे, शाखेचे अतिरिक्त सचिव सागर गरूड, बहुजन युवक संघाचे कार्याध्यक्ष नदीम सय्यद, दीपक बोरसे आदी उपस्थित होते.

## कल्याणकारी योजनांपासून ग्रामीण भागात मजूर वंचित

**आंधळगाव :** शासनाच्या कल्याणकारी योजनांपासून ग्रामीण भागातील अनेक मजूर वंचित आहेत. त्या मजुरांपर्यंत कामगार कल्याण मंडळ पोहोचलेच नसले तरी अनेक कंत्राटदारांकडून त्यांची दिशाभूल केली असल्याचे चित्र दिसून येते.

शासनाने इमारत बांधकाम कामगारांकरिता कामगार कल्याण मंडळाची स्थापना केली आहे. त्या माध्यमातून अनेक योजनांचा लाभ कामगारांच्या कुटुंबीयांना मिळावा, या हेतूने काही अटी घालून वर्षातून किमान ९० दिवसांचे प्रमाणपत्र प्राधिकरण यांच्याकडून घेऊन कामगार कल्याण मंडळाकडे नोंदणी करणे व मजुरांना सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक, आर्थिक अशा योजनांचा लाभ घेता येतो. जिल्ह्यातील बहुतांश तालुक्यातील ग्रामीण भागातील मजूर नोंदणीविनाच असून, ते शासनाच्या कल्याणकारी योजनांपासून कोसो दूरच राहिला असल्याचे चित्र दिसत आहे. सर्वत्र पेटीच्या नावाने कामगार कल्याण मंडळ धूम वाजवीत आहे. मात्र, कामगार कल्याण मंडळाच्या कारभारामुळे ग्रामीण भागातील शोषित, पीडित मजूर अजूनही योजनेच्या कोसो दूर असल्याचे चित्र दिसत आहे. याबाबत शासनाने दखल घ्यावी, अशी मागणी होत आहे.

# जिल्हा परिषदेच्या शाळांत आता कंत्राटी निवृत्त शिक्षक

**मुंबई** : राज्यातील जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. मात्र नियोजित शिक्षक भरती संदर्भात उच्च न्यायालयात दाखल रिट याचिकांमुळे भरती प्रक्रियेस उशीर होत आहे. या पार्श्वभूमीवर पवित्र प्रणालीमार्फत नियमित शिक्षक भरतीमधून शिक्षक उपलब्ध होईपर्यंत, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील व खासगी शिक्षण संस्थांच्या अनुदानित शाळांतील सेवानिवृत्त शिक्षकांमधून कंत्राटी तत्त्वावर तात्पुरत्या स्वरुपात शिक्षकांची रिक्त पदे भरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. येत्या १५ दिवसांत ही भरती प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश शिक्षण आयुक्तांसह सर्व जिल्हा परिषदांना देण्यात आले आहेत. नवीन शैक्षणिक वर्षात शिक्षकांच्या रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन यांनी हे आदेश काढले आहेत.

डीएड, बीएड असणाऱ्या लक्षावधी उमेदवारांचा रोजगार हिरावून घेणारा आणि गुणवत्ता संवर्धनाच्या कामात अडथळा निर्माण करून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेतील शिक्षण उद्धवस्त करणारा हा निर्णय आहे. याचे दूरगामी विपरित परिणाम शिक्षणावर होणार असल्याचे मत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे विजय कोंबे यांनी याविषयी बोलताना व्यक्त केले आहे.

## रूग्णालयातील पदे भरण्याची कार्यवाही

**मुंबई** : नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व मेयो रूग्णालय येथे परिचारिकांची १४५ व चतुर्थ श्रेणी संवर्गातील १६० पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असल्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी विधान परिषदेत सांगितले.

सदस्य प्रवीण दटके यांनी यासंदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. मंत्री श्री. मुश्रीफ म्हणाले, परिचारिकांची रिक्त पदे टीसीएस या कंपनीमार्फत भरण्याची कार्यवाही सुरू असून स्पर्धा परीक्षाही घेण्यात आली आहे. ही कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. तर संस्थेतील वर्ग चारची सरळसेवेची पदे जिल्हास्तरीय समितीमार्फत भरण्याबाबत कळविण्यात आले आहे. ही पदे उपलब्ध होईपर्यंत बाह्यस्त्रोता मार्फत करारास मुदतवाढ देण्यात आली आहे.



## चतुर्थश्रेणी कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचा संपूर्ण राज्यात संघटना बांधणीवर भर

**गंगापूर** : राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाच्या वतीने संपूर्ण राज्यात संघटना बांधणीवर भर दिला जात आहे. या उपक्रमांतर्गत गंगापूर येथे स्थानिक संघटना बांधणी करण्यात आली.

यावेळी एका मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. संघटक सचिव एकनाथ (मामा) लांडगे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले तसेच संघटना अधिकाधिक वाढविण्यावर भर द्यावा, असे आवाहनदेखील उपस्थितांना केले.

जिल्हाध्यक्ष शेख निजामुद्दीन जिल्हा सरचिटणीस अजय डुलगज व स्थानिक कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

त्यावेळी लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली उप-जिल्हा रुग्णालय गंगापूर येथे राज्य सरकारी वर्ग-ड चतुर्थश्रेणी मध्यवर्ती कर्मचारी महासंघ, महाराष्ट्र जिल्हा शाखा संभाजी-नगर या संघटनेपदी तालुकाध्यक्ष अतुल भोसले यांची नेमणूक करण्यात आली. मेळाव्यास कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## 'आरसीएफ' भरतीबाबत निर्देशांचे पालन करावे

**मुंबई** : 'आरसीएफ' कंपनीने भरतीची योग्य प्रक्रिया राबवताना न्यायालयाच्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

विधानभवन येथे त्यांच्या दालनात याविषयावर थळ येथील 'आरसीएफ' कंपनीच्या विस्तार प्रकल्पासंदर्भात आढावा बैठकीत ते बोलत होते.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याबाबत म्हणाले, 'आरसीएफ' कंपनीने भरती प्रक्रियेसंदर्भात स्थानिकांना प्राधान्य दिले जाईल याची प्राधान्याने दक्षता घ्यावी. केंद्र शासनाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार सदर प्रक्रिया राबवत असल्याचे 'आरसीएफ'च्या अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यावर भरतीप्रक्रिया स्थगित ठेवण्यात यावी, असेही निर्देश देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

# उच्च शिक्षितही अंगणवाडी मदतनीस पदासाठी इच्छुक

**आमगाव** : अंगणवाडी मदतनिसांची गोंदिया जिल्ह्यात ११० पदे भरली जाणार आहेत. या पदांसाठी ३३६ उमेदवारांनी त्यांचे अर्ज एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयाकडे सादर केले आहेत. त्यांच्या अर्जाची या कार्यालयाकडून छाननी केली जात आहे. एमए, बीएड उमेदवारांचेही अर्जही दाखल झाले असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

सदर अंगणवाडी मदतनीस पदासाठी एकात्मिक प्रकल्प कार्यालयातर्फे भरती प्रक्रिया घेतली जात आहे. या पदांसाठी दरमहा केवळ पाच हजार ५०० रुपयांचे मानधन असताना चक्क एमएस्सी, एमए आणि बी.ए. उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. चार वर्षांनंतर ही भरती प्रक्रिया घेतली जात असल्याचे सूत्रांनी सांगितले. राज्यात सुमारे एक लाखापेक्षा अधिक अंगणवाड्या असून, त्यातून अंगणवाडी मदतनीस आणि अंगणवाडी सेविका कार्यरत आहेत. गेल्या चार वर्षांत मदतनीस पदाची भरती झालीच नसल्यामुळे अंगणवाडी सेविकांवर कामाचा जादा ताण येत होता. त्यामुळे ही पदे तातडीने भरण्याची मागणी होत होती. त्यानंतर शासनाने अंगणवाडीतील पदे जुलै अखेरपर्यंत भरण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार ही प्रक्रिया सुरू झाली. अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख ३ जुलै होती. रिक्त जागांची माहिती ग्रामपंचायतीच्या सूचना फलकावर लावण्यात आली होती.

## गोसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी मुंदडा

**पुणे** : महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या पहिल्या अध्यक्षपदी शेखर मुंदडा यांची निवड झाली आहे. महाराष्ट्र राज्यात प्रथमच स्थापित झालेल्या गोसेवा आयोगाचे प्रथम अध्यक्ष होण्याचा मान मुंदडा यांना मिळाला आहे.

महाराष्ट्र राज्यातील सध्याच्या अडीच हजारांपेक्षा अधिक स्वयंसेवी संस्थांचे जाळे निर्माण करून हजारो निष्पाप गार्यीचे कसायांपासून प्राण वाचवण्यात मुंदडा यांची खूप मोठी भूमिका आतापर्यंत राहिली आहे. त्यांच्या निवडीबद्दल समाधान व्यक्त होत आहे.

समितीमध्ये सुनील सूर्यवंशी, संजय भोसले, डॉ. नितीन मार्केडेय, सनतकुमार गुप्ता, उद्धव नेरकर, दीपक भगत हे सदस्य आहेत.



## सूर्यकात जाधव यांचा सेवानिवृत्तीबद्दल हृद्य सत्कार

**मुंबई** : कामा व आल्ब्लेस रुग्णालयातील कर्करोग चिकित्सा केंद्रातील कक्ष सेवक सूर्यकांत घन:श्याम जाधव यांचा त्यांच्या सेवानिवृत्तीबद्दल कर्मचारी वर्गाच्या वतीने हृद्य सत्कार करण्यात आला.

यावेळी झालेल्या सत्कार सोहळ्यात राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे सरचिटणीस बाबाराम कदम, कामा रुग्णालय कर्मचारी संघाचे सरचिटणीस वसंत मोरे, लिला नागर, रतन कटारिया, किणी सिस्टर, मीना बोरिचा, कुसुम म्हस्के, नरहर आंब्रे, रविंद्र सोडये, अरविंद बिरवाडकर, पांडुरंग उलालकर आदी मान्यवर उपस्थित होते.

सूर्यकांत जाधव यांचा अत्यंत मनमिळावू स्वभाव होता तसेच रुग्णांशीही ते स्नेहाने आणि सौहार्दाने वागत असत. त्यामुळे त्यांनी आपली वेगळी ओळख आणि कामाची छाप पाडली होती. त्यांच्या सेवानिवृत्तीने त्यांची कमतरता आपल्याला जाणवणार आहे, अशा शब्दांत आपल्या भावना बाबाराम कदम यांनी व्यक्त केल्या तसेच त्यांना पुढील वाटचालीसाठी तसेच उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## चर्मकार विकास मंडळात प्रतिनियुक्तीने पदे

**मुंबई** : संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या आस्थापनेवर अधिकारी आणि कर्मचारी यांची पदे प्रतिनियुक्तीने भरण्यात येणार असल्याची माहिती महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक धम्मज्योती गजभिये यांनी दिली आहे.

ही पदे प्रथम एक वर्षाकरिता नंतर ठराविक कालावधी करिता वाढविण्याच्या अटीवर प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी शासनाच्या विविध विभागात या पदाच्या व वेतनश्रेणीच्या समकक्ष पदावर व वेतनश्रेणीवर कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांनी ४ ऑगस्ट २०२३ पर्यंत अर्ज करावे माहिती www. lidcom.co.in वेबसाईटवर उपलब्ध आहे.

# शासनातर्फे होणार ७६३ शिक्षकांची भरती

**मुंबई** : शासनाकडून राज्यातील शासकीय आणि अनुदानित शाळांवर पवित्र पोर्टलच्या माध्यमातून ७६३ शिक्षकांची भरती केली जाणार आहे. ही भरती अंतिम टप्प्यात असून ऑगस्टमध्ये मुलाखती घेऊन उमेदवार अंतिम केले जाणार असल्याची माहिती मिळत असताना या भरती प्रक्रियेत शासनाकडून त्रुटी ठेवल्याचा आरोप काही शैक्षणिक संघटनांनी केला आहे. शासनाने कोणत्याही प्रकारचा जीआर किंवा जाहिरातबाजी न करता सरळ पवित्र पोर्टलवर ही भरती केल्याने ग्रामीण भागातील अनेक उमेदवारांना लाभ घेता आला नसल्याचे संघटनांनी सांगितले.

राज्यातील शासकीय तथा अनुदानित शाळांतील भरती अनेक वर्षांपासून रखडली आहे. २०१२ पासून कोणतीही भरती प्रक्रिया राबविण्यात आली नाही. त्यात मराठा आरक्षणामुळे ही प्रक्रिया रखडली होती. यामुळे अनेक संस्थांमधील शिक्षकांवरील ताण वाढला होता. पण शेवटी शासनाने यासंदर्भात निर्णय घेऊन ७६३ शिक्षकांची भरती घेण्याचा निर्णय २०१७ मध्ये घेतला होता. पण मागील सहा वर्षांपासून ही भरती प्रक्रिया रखडली होती. रखडलेली ही भरती २०१८ मध्ये पवित्र पोर्टलद्वारे सुरू होऊन १९६ संस्थांतील ७६३ रिक्त पदांसाठी मुलाखत पात्र उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली असून निवडीसाठी एकूण ५,५३५ संबंधित उमेदवारांची मुलाखत व अध्यापन कौशल्य चाचणी शिक्षण संस्थांकडून १८ जुलै ते ११ ऑगस्ट या कालावधीत होणार असल्याची माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली आहे.

भरती प्रक्रिया अंतिम टप्प्यात असताना यात अनेक त्रुटी असल्याचा आरोप मुंबई मुख्याध्यापक संघटनेने केला आहे. गाव पाड्यातील, ग्रामीण उमेदवारांना याबाबत माहिती नसल्याने अनेक होतकरू, सुशिक्षित विद्यार्थ्यांची नोकरीची संधी हुकली आहे. यावेळी मुलाखतीवेळी १:३ उमेदवार असल्याने शालेय संस्थांना योग्य शिक्षक निवडण्यासाठी कमी पर्याय उपलब्ध होणार आहेत. यामुळे अनेक शैक्षणिक संस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे.

# दिव्यांगांच्या आंदोलनाला अखेर यश

**नवी मुंबई** : दिव्यांगांच्या प्रलंबित मागण्यांसाठी सिडको भवनमध्ये दिव्यांगाचे दोन दिवस आंदोलन सुरू होते. अखेर या आंदोलनाला यश आले असून सिडको महामंडळाने मागण्या मंजूर केल्यानंतर आंदोलन मागे घेतले, अशी माहिती कोकण विभाग अध्यक्ष सुरेश मोल यांनी दिली.

प्रहार संघटनेतर्फे करण्यात येत असलेल्या या आंदोलनात दिव्यांगांनी सिडको भवनच्या प्रवेशद्वारातच ठिय्या दिला होता. अधिकाऱ्यांसोबत वाटाघाटी करण्याचा प्रयत्न सुरू होता. मात्र मुख्य अधिकारी सिडको भवनातून गायब झाल्यामुळे दिव्यांगांनी सिडको भवनमध्ये तक ठोकला होता.

नवी मुंबई आणि पनवेल महापालिका क्षेत्रातील पात्र दिव्यांगांना दोनशे चौरस मीटर क्षेत्रफळ असणारी जागा उपलब्ध करणे दिव्यांग स्टॉलधारकांना साठ वर्षांचे करारनामे करणे, महानगरपालिका अधिनियमा-नुसार निर्णयानुसार अडीच हजार रुपये भाडे आकारणे आणि वाढीव जागेत बांधकाम करण्याची परवानगी देणे.

अशा मागण्या प्रहार दिव्यांग क्रांती सेनेतर्फे करण्यात आल्या होत्या. अखेर सिडको महामंडळाने मागण्या मंजूर केल्यानंतर आंदोलन मागे घेतले, अशी माहिती कोकण विभाग अध्यक्ष सुरेश मोकल यांनी दिली.

यापूर्वी संघटनेच्या वतीने सातत्याने दिव्यांगांच्या प्रश्नावर आवाज उठवला गेला होता. तसेच त्यांच्या मागण्यांसाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. संघटनेचे कार्य सध्या संपूर्ण महाराष्ट्रभर सुरु आहे. त्याचाच एक भाग म्हणून नवी मुंबईतील सिडको भवनामधील या कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

दिव्यांगांना स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी अनेक महिन्यांपासून सिडकोकडे पनवेल आणि नवी मुंबई परिसरात सातत्याने जागा देण्याची मागणी संघटनेच्या वतीने करण्यात येत होती. दिव्यांगांच्या मागणीवर बोलण्यासाठी आणि तोडगा काढण्यासाठी सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक किंवा त्याच दर्जाचे अधिकारी वेळ देत नव्हते आणि वेळ काढूपणाचे धोरण राबवत होते, असेही दिव्यांगांच्या प्रहार संघटनेकडून सांगण्यात आले.

## 'माझी वसुंधरा' ची अंमलबजावणी करा

**नवी मुंबई** : 'माझी वसुंधरा' अभियान ४.० अंतर्गत निसर्गाशी संबंधित भूमी, जल, वायू, अग्नी आणि आकाश या पंचमहाभूत तत्त्वांना विचारात घेऊन अभियानाची अंमलबजावणी प्रभावीपणे करावी, असे निर्देश कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी दिले. माझी वसुंधरा अभियान ४.० संदर्भात बैठकीचे आयोजन केले होते. त्या वेळी ते बोलत होते. या अभियानात ई-वाहने वापराबाबत प्रसार व प्रसिद्धी करण्यात यावी, या कार्यक्रमांमध्ये महसूल विभाग, पोलीस विभाग, वनविभाग व कृषी विभाग, सामाजिक वनिकरण इ. विभागांचा सहभाग असावा. अशा सूचना डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी बैठकीत दिल्या.

# सहायक आयुक्तांची पदे एमपीएससी मार्फत भरणार

**मुंबई** : महापालिकेतील सहायक आयुक्तांची १०० टक्के पदे राज्य लोकसेवा आयोगाकडून (एमपीएससी) भरली जाणार आहेत. पालिकेतील अभियंता संघटनेने त्यास विरोध केला आहे. यापैकी ५० टक्के पदे पालिकेतील कार्यकारी अभियंत्यांमधून पदोन्नतीने भरण्यात यावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. पालिकेच्या या निर्णयामुळे अधिकारी अभियंत्यांना सहायक आयुक्त होण्याचे दरवाजे बंद झाले असून यावरून पालिका प्रशासन आणि कामगार, अभियंता संघटनांमध्ये वाद होण्याची शक्यता आहे.

मुंबईत पालिकेचे एकूण २४ प्रशासकीय विभाग असून त्यातील १५ प्रभागांमध्ये पूर्णवेळ सहायक आयुक्त कार्यरत आहेत. तर कुलाबा / ए.चंदनवाडी / सी.भायखळा / ई.गोरेगाव / पी.दक्षिण, कुर्ला / एल.कांदिवली / आर.दक्षिण, दहिसर / आर.उत्तर, भांडुप / एस आणि मुलुंड-टी या ९ ठिकाणी सहायक आयुक्तांची पदे रिक्त आहेत. यासोबतच बाजार, नियोजन आणि घनकचरा विभागासह अन्य चार विभागात सहायक आयुक्तांची पदे रिक्त असून या सर्व ठिकाणी कार्यकारी अभियंत्याकडे प्रभारी म्हणून कार्यभार सोपविण्यात आला आहे.

ऐंशीच्या दशकापासून दहा ते पंधरा वर्ष सेवा झालेले अनुभवी अभियंता आणि अधिकाऱ्यांची पालिकेत सहायक आयुक्तपदी नेमणूक केली जात आहे. येत्या काळात ही सर्व पदे एमपीएससीमार्फत भरण्यात येणार असल्याचा दावा करत या निर्णयास अभियंता संघटनांनी विरोध केला आहे. ५० टक्के पदे ही कार्यकारी अभियंता संवर्गातील अभियंत्यांना पदोन्नतीने द्यावीत, अशी मागणी बृहन्मुंबई म्युनिसिपल इंजिनीअर्स युनियनने केली आहे. पालिकेतील सहायक आयुक्त हे विभाग कार्यालयातील सुमारे १७ वेगवेगळ्या उपखात्यांतील कामांवर देखरेखीचे आणि नियंत्रित करण्याचे काम करतात. विभाग पातळीवर सहायक आयुक्त म्हणून अभियंते यशस्वीपणे काम करीत आहेत. महानगरपालिकेचे अभियंते अर्हताप्राप्त असून, ते अनेक वर्षांच्या सेवेनंतर दीर्घ अनुभवी असतात. त्यांच्यावर अन्याय करून बाहेरून अधिकारी आणणे योग्य नसल्याचे मत संघटनेचे सरचिटणीस ॲड. प्रकाश देवदास यांनी व्यक्त केले. बृहन्मुंबई मनपा कार्यालयीन कर्मचारी संघटनेनेही या निर्णयाला विरोध केला आहे. भविष्यात आंदोलन करण्याची तयारी अभियंत्यांनी दर्शवली आहे.

दरम्यान, पालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाचे सहआयुक्त मिलिन सावंत यांनी या वृत्तास दुजोरा दिला आहे. शैक्षणिक अर्हतेनुसार ही सर्व पदे एमपीएससी मार्फतच भरायला हवीत. पालिकेने एमपीएसीकडे १६ पदांसाठी मागणी केली आहे. त्यासाठी परीक्षा झाल्या असून मुलाखती बाकी आहेत, असे सावंत यांनी सांगितले.

# खासगी शाळांमध्ये ३० हजार शिक्षक भरती

**मुंबई** : राज्यभरातील जिल्हा परिषदेच्या ५४ हजार १९३ शाळांची, तर सुमारे १४ हजार खासगी शाळांच्या संचमान्यतेची प्रक्रिया पूर्ण झाली आहे, अशी माहिती शिक्षण विभागाने दिली आहे. यंदा पहिल्या टप्प्यात तीस हजार शिक्षकांची भरती करण्याच्या दृष्टीने संचमान्यतेची प्रक्रिया सुरू असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था व खासगी अनुदानित संस्थांमध्ये अंदाजे ६७ हजार शिक्षकांची पदे रिक्त आहेत. 'आरटीई'च्या निकषांनुसार प्रत्येकी ३० मुलांमागे एक शिक्षक बंधनकारक आहे; पण मागील साडेपाच वर्षांत शिक्षक भरती न झाल्याने हा निकष डावलला गेला आहे. या पार्श्वभूमीवर एकूण रिक्तपदांच्या ८० टक्के पदभरतीला मान्यता देण्यात आली आहे. पण, सध्या पहिल्या टप्प्यात पदे भरली जाणार आहेत, त्याचा कृती आराखडा शालेय शिक्षण विभागाने तयार केला आहे.

२०१७ च्या शिक्षकांच्या भरती प्रक्रियेत १९६ व्यवस्थापनाच्या शाळांतील ७६३ रिक्त पदे भरण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या रिक्त पदांवर ७६३ जागांसाठी एकूण ५,५३५ उमेदवारांची प्राधान्यक्रमानुसार संस्थांकडे शिफारस करण्यात आली आहे. शिक्षण विभागाने या शाळांमध्ये मुलाखत व अध्यापन कौशल्याद्वारे निवड करण्यासाठी पात्र उमेदवारांची यादी जाहीर केली आहे, या शाळांमध्ये इयत्ता सहावी ते बारावी या गटातील रिक्त पदे भरण्यात येणार आहेत.

## महत्वाचे शासन निर्णय (जीआर)

**www.maharashtra.gov.in**

| विभाग | दिनांक | तपशील |
|---|---|---|
| कृषी, पशूसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग | १६-०६-२०२३ | महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. पतंगराव नाईक यांची जयंती राज्यात दि.१ जुलै रोजी कृषी दिन म्हणून कामयस्वरूपी दरवर्षी साजरा करणेबाबत. |
| वित्त विभाग | १९-०६-२०२३ | सातव्या वेतन आयोगानुसार दि. १ जानेवारी २०१६ ते दि. ३१ डिसेंबर २०१८ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकांना सुधारित अंशराशीकरणाचा लाभ देण्यास मुदतवाढ देणेबाबत. |
| महिला व बाल विकास विभाग | १९-०६-२०२३ | कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळवणूकीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या तक्रारीची चौकशी करताना अवलंबण्याची कार्यपद्धती. |
| पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | १९-०६-२०२३ | आई महिला केंद्रित/लिंग समावेश (Gender Inclusive) पर्यटन धोरण |
| वित्त विभाग | २८-०६-२०२३ | दि. ३० जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या/होणाऱ्या कर्मचाऱ्यांना लगतच्या १ जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ विचारात घेऊन सेवानिवृत्तीवेतन निश्चित करण्याबाबत. |
| अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | ०४-०७-२०२३ | एक देश एक शिधापत्रिका योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत मार्गदर्शक सूचना. |
| वित्त विभाग | ०५-०७-२०२३ | असुधारित वेतन श्रेणीत (सहाव्या वेतन आयोगानुसार) निवृत्तिवेतन घेणाऱ्या निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना दि. १ जानेवारी, २०२३ पासून २२१ टक्के महागाई वाढ देण्याबाबत. |
| वित्त विभाग | ०५-०७-२०२३ | निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना दि. १ जानेवारी, २०२३ पासून ४२ टक्के महागाई वाढ देण्याबाबत. |
| महसूल व वन विभाग | ०५-०७-२०२३ | शासनाने प्रदान केलेल्या जमिनीचे/भूखंडाचे हस्तांतरणाबाबत आकारावयाच्या अनर्जित रकमेचे एकत्रित सुधारीत धोरण. |
| अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | १३-०७-२०२३ | रेशन आपल्या दारी : मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात फिरते शिधावाटप दुकान शिधारथ मार्फत अन्नधान्य वितरण करणेबाबत. |



## मनोहर दिवेकर यांचा सत्कार

**ठाणे** : शासकीय कर्मचाऱ्यांना प्रशासकीय कामकाजाचे मार्गदर्शन करण्याचा उपक्रम निवृत्त शासकीय कर्मचारी मनोहर दिवेकर यांनी सुरु केला आहे. त्या अंतर्गत ठाणे कामगार रुग्णालयात त्यांनी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले. त्यांच्या या कार्याबद्दल वैद्यकीय अधिक्षकांनी त्यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला.

श्री. दिवेकर यांनी असाच उपक्रम राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, मोहन नगर, चिंचवड पुणे तसेच मुलुंड, नाशिक अशा अनेक ठिकाणी कामगारांना प्रशिक्षण दिले आहे. त्यांचा हा उपक्रम स्तुत्य असून कामगार वर्गात स्वागत करण्यात येत आहे.

## दीप अमावस्या आयोजन

**मुंबई** : चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे नेते बाबाराम कदम यांनी पारंपारिक दीप अमावस्या सोहळा आयोजित करून संस्कृती जतन केले. यात सुप्रिया प्रशांत कदम, विहान आणि विराज यांनी देखील सहभाग घेतला.



**।। भावपूर्ण श्रध्दांजली ।।**



**कै. निरंजना विठ्ठल सोलंकी**

दि. १६/०७/२०२३

आपल्या कर्तव्याने तसेच स्वभावाने कर्मचारी आणि रुग्णांमध्ये लोकप्रिय असलेल्या एक कर्तव्यदक्ष महिला कर्मचारी अचानक आपल्यातून निघून गेल्या. त्यामुळे समस्त सहकारी वर्गामध्ये शोककळा पसरली आहे.

**-: शोकाकुल :-**

**कामा व आल्ब्लेस रुग्णालय कर्मचारी यांच्याकडून भावपूर्ण श्रद्धांजली.**

## संपादकीय

### कर्मचाऱ्यांच्या अपेक्षांची पूर्ती व्हावी!

महाराष्ट्र शासन हे सदैव राज्य शासकीय कर्मचारी वर्गासाठी अत्यंत संवेदनशील राहिले आहे आणि त्यांच्या हितालाच प्राधान्याने लक्ष दिले आहे, याबाबत दुमत नाही. त्यामुळेच शासकीय कर्मचारी वर्गानेदेखील आपल्या मेहनतीने राज्याच्या विकासात मोलाची भूमिका बजावली आहे. त्यातूनच देशातच नव्हे तर विदेशातील अनेक उपक्रम तसेच घडामोडी याबाबत आपण अव्वल राहिलो आहेत, हे तितकेच खरे! याच कर्मचारी वर्गाने जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत आपली अपेक्षा शासनाकडे व्यक्त केली आहे. त्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या समितीची मुदत संपली असून आता त्यांच्या अहवालाची प्रतिक्षा समस्त कर्मचारी वर्गाला आहे. हा अहवाल सकारात्मकच असेल, अशी लाखो कर्मचाऱ्यांना आशा आहे. पण हे होत असतानाच इतर मुद्यांबाबतही कर्मचारी वर्ग अपेक्षेने शासनाकडे बघत असून त्याबाबत लवकरच सकारात्मक निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी व्हायला हवी. पावसाळी अधिवेशन सुरु असून त्यात सरकारने कंत्राटी भरती बंद करण्याचे आश्वासन दिले आहे, ही स्वागतार्ह बाब आहे. त्याचबरोबर कामगारांच्या नोंदणीसाठी सेतू नोंदणी सुविधादेखील कामगार मंत्री सुरेश खाडे यांनी लागू केल्याची घोषणा विधानसभेत केली. असंघटित कामगारांसाठीही कल्याणकारी मंडळाची स्थापना, अशा निर्णयांमुळे शासनाचे धोरण हे कामगार हिताचे आहे, हे स्पष्ट होत आहे. त्यामुळे या सरकारचे आम्ही अभिनंदन करत आहोत. पण असे असले तरीही काही गोष्टी निदर्शनास आणून त्याबाबत कार्यवाही होणे गरजेचे आहे. ते म्हणजे अद्याप गेल्या अडीच वर्षांपासून अडीच लाख पदे ही रिकामी आहे, ही बाब विचारात घ्यायला हवी, ही पदे भरली जात नसल्यामुळे त्याचा अतिरिक्त भार सध्याच्या कर्मचारी वर्गावर पडत आहे. त्यामुळे कार्यक्षमतेवर परिणाम होण्याचीदेखील भीती आहे. शिवाय अन्य मागण्यादेखील प्रलंबित आहेत. त्या म्हणजे निवृत्तीचे वय ६० वर्षे असावे, वेतन आयोगाची थकबाकी वेळेत मिळावी, ग्रॅज्युईटी २० लाख मर्यादेपर्यंत आणावी, अनुकंपा तत्वावरील भरती, सरळसेवा भरती, प्रशासकीय सेवा ज्येष्ठता सूची अशा विविध प्रश्नांबाबत महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ तसेच राज्य सरकारी गट-ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ या शासनमान्य संघटना सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यांच्या या प्रयत्नांना लवकरच यश मिळायला हवे. त्यासाठी शासकीय स्तरावरून सकारात्मक प्रतिसाद मिळावा, तसेच मार्गदेखील लवकरच काढायला हवा. शासकीय कर्मचारी वर्गात या विषयावर शासन आपल्याकडे दुर्लक्ष करत असल्याची भावना आहे. त्यामुळे त्यांच्यात नाराजीचेही वातावरण आहे. ही नाराजी दूर करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी आता लक्ष देण्याची गरज आहे. त्याचबरोबर शासकीय कर्मचारी वर्गाच्या मागण्या या निधीअभावी रखडणार नाहीत. याचीही काळजी घेतली जावी. राज्य सरकारी कर्मचारी हा राज्याच्या विकासातील एक अत्यंत महत्वाचा घटक असून त्याच्यातील क्रयशक्ती वाढविण्यासाठी शासनाने त्यांच्या अपेक्षांची पूर्तता करावी, असे आवाहन यानिमित्ताने करत आहोत.

# चळवळ नेटाने पुढे नेण्याचा निर्धार

असाच आणखी एक किस्सा १९८५ चा. सिप्झमधील कामगारांचा लढा सुरु असताना एकदा पंतप्रधान राजीव गांधी मुंबई भेटीस एका कार्यक्रमासाठी आले होते. त्यांचा राजभवनवर मुक्काम होता. या संधीचा फायदा घेत मी सिप्झच्या कामगारांचे निवेदन देण्याचे ठरविले. सिप्झच्या कामगारांच्या वतीने निवेदन देण्यासाठी आम्ही राजभवनवर गेले. संध्याकाळची वेळ होती. राजभवनवर शांतता होती. आम्ही तिथल्या अधिकाऱ्याला राजीव गांधी यांना भेटायचे असल्याची इच्छा प्रकट केली. त्यावेळी राजभवनच्या सेक्रेटरीने भेट घडवून आणण्यासाठी प्रयत्न करू, असे आश्वासित केले. नंतर त्यांच्या प्रतिक्षेत बसले असताना एका तासाने आम्हांला बोलाविण्यात आले. राजीवजी राजभवनच्या हिरवळीवर फेरफटका मारत होते. राजीवजींच्या प्रयत्नाने त्यावेळी संगणक युग सुरु झाले होते. विज्ञानाला त्यांनी नेहमीच प्रोत्साहन दिले होते. आम्ही सांगितले की, आपण तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देत आहात, त्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स पार्टस बनविण्यासाठी आपण खास उद्योग उघडले आहेत, उद्योगपतींना सवलती दिल्या आहेत. तिथे काम करणाऱ्या कामगारांवर अन्याय होत आहे. त्यांना कमी पगारात राबवून घेतले जात आहे. कामगारांना संरक्षण दिले गेले पाहिजे, अशी विनंती आम्ही पंतप्रधानांना केली. राजीवजींनी निवेदन घेतले आणि कार्यवाही बाबत आश्वासित केले.

नंतरच्या काळात माझी राजीव गांधींसमवेत दोन-तीनदा भेट झाली. अखेरची भेट मे १९९१ मध्ये एका निवडणूकीप्रसंगी. लोकसभेच्या निवडणूका जाहीर झाल्या होत्या. देशभर राजीवजी प्रचारासाठी फिरत होते. मुंबईमध्ये दोन-तीन सभा जाहीर झाल्या होत्या. उत्तर-मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघातून ॲड. शरद दिघे खासदारकीसाठी निवडणूक लढवित होते. धारावी - ९० फूट रस्ता येथे त्यांची जाहीर सभा होती. राजीवजी सभेला रात्री उशीरा पोहोचले. त्यावेळी गांधी मार्केट-किंग्ज सर्कल भागात मजदूर उत्कर्ष सभेचे युनियनचे कार्यालय होते. शरद दिघे यांचे निवडणूक कार्यालय तिथेच उभारले होते. धारावी येथे राजीवजींच्या सभेला उपस्थिती लावून मी आणि माझे सहकारी कार्यालयाजवळ पोहचलो. राजीवजी तिथून पुढे नागपाडा येथे मुरली देवरा यांच्या मतदारसंघात अखेरच्या सभेसाठी जाणार होते. रात्री १ च्या सुमारास सर्व फौज-फाट्यासह त्यांची गाडी गांधी मार्केट येथून जात असताना त्यांच्या गाडीला आम्ही सर्वांनी हात उंचावून दाखविले. त्यांनी झेंडे पाहून आणि घोषणा ऐकून गाडी थांबविली. गाडीच्या पुढच्या सीटवर ड्रायव्हरच्या बाजूला ते बसले होते. त्यांनी गाडीची काच खाली केली. हस्तांदोलन केले व पुष्पगुच्छ स्वीकारून स्मितहास्य देत पुढे गेले. सर्वांसाठी ही एक पर्वणी होती. आमच्या नेत्याने आम्हांला ओळख दिली. त्यामुळे सगळे धन्य झाले. नंतर सर्वजण जोमाने कामाला लागले. राजीवजी निवडणूकीच्या प्रचारादरम्यान २१ मे १९९१ रोजी तमिळनाडू येथील श्रीपेरूमबुदूर येथे असताना रात्री १० वाजता त्यांची घातपात करून हत्या करण्यात आली. राजीवजींच्या हत्येचा दिवस माझ्या मनात कायमचा कोरला गेला.

त्याचबरोबर त्यांची अजून एक आठवण म्हणजे एप्रिल १९९० मध्ये कॉ.एस.ए.डांगे आजारी असताना राजीवजी डांगेंना भेटायला दुपारच्या सुमारास माहिम येथे हिंदुजा हॉस्पिटलमध्ये आले. कॉ. डांगे यांचे गणाचार्य कुटुंबियांशी सलोख्याचे संबंध होते. त्यामुळे मी देखील त्यांना भेटायला जात असे. मजदूर उत्कर्ष सभेच्या युनियनला एक वर्ष झाल्यामुळे प्रकाशित करण्यात आलेली स्मरणिका त्या दिवशी माझ्याजवळ होती. ती घेऊन मी हिंदुजा हॉस्पिटलमध्ये गेलो होतो. त्याचवेळी माझी लिफ्टजवळ राजीवजींसमवेत अचानक भेट झाली. हा माझ्यासाठी एक सुखद धक्का होता. त्यांच्याबरोबर मुरलीभाई

**अनिल गणाचार्य यांच्या आठवणीतून - भाग ४**

देवरा आणि त्यांचे सहकारी होते. मुरली देवरा मला चांगलेच ओळखत होते. लिफ्टमधून उतरत असताना हे सगळेजण आत शिरू लागले. त्याचवेळी मी देखील पुन्हा लिफ्टमध्ये गेलो. सोबत असलेली स्मरणिका राजीवजींना दिली. स्मरणिकेत इंदिराजी व कॉ. डांगे यांचा एकत्र असतानाचा फोटो मुद्रित केला होता. तो राजीवजींना दाखविला. मुरली देवरांनी माझी ओळख करून दिली. 'यह हमारा कॉंग्रेस का सच्चा कार्यकर्ता हैं और इनके पिताजी कॉ. गुलाबराव गणाचार्य यह कॉ. डांगे के नजदिकके साथीदार थे', असे सांगितले. स्मरणिकेत छापलेला फोटा हा कॉ. डांगे यांच्या दादर येथील निवासस्थानी इंदिराजी त्यांना भेटायला आल्या होत्या, त्यावेळचा होता. हे खऱ्या अर्थाने दुर्मिळ छायाचित्र आहे. कॉ. डांगे यांच्या निवासस्थानी आजही ते छायाचित्र ठेवले आहे.

राजीव गांधी भेटीसाठी आले होते तेव्हा कॉ. डांगे शुद्धीत नव्हते. त्यांच्या कन्या रोझाताई देशपांडे त्यांच्या बाजूला होत्या. त्यांनी डांगे यांच्या कानाजवळ जाऊन इंदिराजींचा मुलगा राजीव आला आहे, असे सांगितले. हे शब्द त्यांच्या कानावर गेल्यानंतर त्यांचे डोळे किलकिले झाले होते. हा किस्सा रोझाताईंनी नंतर मला सांगितला. राजीवजींची हत्या २१ मे १९९१ या दिवशी तर त्याच्या दुसऱ्याच दिवशी पहाटे २२ मे १९९१ रोजी कॉ. डांगे यांचे निधन झाले.

राजीव गांधी यांनी आपल्या कार्यकाळात कामगार क्षेत्राला न्याय देण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. त्यांनी वेगवेगळी कामगार हिताची धोरणेदेखील राबविली त्यामुळे कामगारांना तसेच कामगार चळवळींना बळ मिळत गेले. आधुनिक क्षेत्रात रोजगारांच्या अनेक संधीदेखील उपलब्ध झाल्या.

कॉ. डांगेंच्या निधनाने महत्वाचे व्यक्तिमत्व हरपले. त्यांनी आयुष्यभर कामगार हितासाठी कार्य केले. अनेक लढे दिले. ते यशस्वी केले. त्यांच्यामुळे अनेक हक्कांपासून वंचित असलेल्या कामगारांना न्याय मिळत होता. त्याचबरोबर त्याचे लढे आजही ऐतिहासिक आहेत. कामगार चळवळीचा इतिहास हा कॉ. डांगे यांच्या-शिवाय पूर्ण होणार नाही.

भाजपतर्फे २०१७ मध्ये कुर्ला - नेहरू नगर (राखीव) विधानसभा मतदार संघातून श्री. कांबळे निवडणूक हरल्यानंतर भाजप - शिवसेना युतीचे राज्य आले. पण त्यांची कुठेच वर्णी लागली नाही. त्यांना महामंडळाचे अध्यक्षपद मिळावे, अशी इच्छा होती. त्यासाठी खांडेश्वर - कामोठे येथील एका स्वामीमार्फत मध्यस्थी करण्याचाही प्रयत्न केला. त्यासाठी दीड कोटी रुपये इतके पैसे दिल्याचे व त्याने फसवल्याची बातमी देखील वृत्तवाहिन्यांवर प्रसारित होऊ लागल्या. त्यातून त्यांची बदनामी झाली. श्री. कांबळे यांनी दोन वेळा पक्ष बदलला. कॉंग्रेसमधून राष्ट्रवादी, परत कॉंग्रेस नंतर भाजप. त्यामुळे त्याची विश्वासार्हता नंतरच्या काळात कमी होत गेली.

युनियनमध्ये असलेल्या पदाधिकाऱ्यांनाही ते कमी लेखत असल्याची भावना होती. श्री. मोकल आजारी पडल्यानंतर ते एक कल्ली कारभार करू लागले. वेळेवर पगार मिळत नसल्याच्या कर्मचाऱ्यांच्या तक्रारी असायच्या. तारापूर कार्यालयामधील कर्मचारी रडकुंडीला येत. उपेंद्र पाटील, जिमी डे या दोघांना सेक्रेटरी म्हणून काम करणे अवघड झाले. श्री. मोकल यांच्या निधनानंतर माझ्यासारख्या ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांकडे श्री. मोकल यांची जबाबदारी सांभाळायला देणे अपेक्षित होते. पण ते त्यांनी केले नाही. श्री. मोकल यांच्या निधनानंतर १९ मार्च २०२० मध्ये कोरोना काळात लॉकडाऊन सुरु झाले. त्यांनी या काळात कर्मचाऱ्यांकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून आले. त्यांना पगारही मिळाला नाही. या सर्व प्रकारामुळे अस्वस्थ होऊन मी संघटनेच्या कार्यालयात जाणे बंद केले. त्यानंतर उपेंद्र पाटील, जिमी डे यांचा कांबळे यांच्याबरोबर वाद झाला व त्यांनी राजीनामा दिला. प्रफुल्ल सरवदे नावापुरता खजिनदार होते. ते कांबळेचे भाऊबंदकीतील असल्याकारणाने त्यांना सोयीसाठी खजिनदारपदी ठेवण्यात आले होते. ते स्वतंत्रपणे हिशेब तपासनीसचा व्यवसाय करत, कालांतराने त्यांनीही युनियनचा कारभार कमी केला व आपल्या व्यवसायात लक्ष घालू लागले.

श्री. कांबळे यांनी त्यांचा मुलगा जितेंद्र (पप्पू) याला अध्यक्ष केले. एक खांबी खेळ चालला. मुलगा अपयशी ठरल्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी व नंतर भाजपचे आमदार प्रसाद लाड यांची नेमणूक केली. इकडे उपेंद्र पाटील, जिमी डे यांनी स्वतंत्र संघटना सुरु केली. पूर्वीचे युनियनचे विधिज्ञ सल्लागार ॲड. नितीन शिवकर यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय श्रमिक शक्ती संघच्या उपाध्यक्षपदी माझी निवड करण्यात आली. तारापूर येथील अनेक कारखान्यातील कामगार श्रमिक उत्कर्ष सभा सोडून शक्ती संघात सामील झाले. श्रमिक उत्कर्ष सभेच्या तारापूर कार्यालयाला टाळे लागले. उपेंद्र पाटील यांनी पालघर येथे नवे कार्यालय सुरु करून दणक्यात कामाला सुरूवात केली. विजय कांबळे यांची ताकद कमी होऊ लागली. त्यांनी नवीन पदाधिकाऱ्यांची नेमणूक केली पण ते काहीही प्रगती करू शकले नाहीत. विजय कांबळे यांचे २७ सप्टेंबर २०२१ रोजी मेंदूच्या विकाराने निधन झाले. त्याच दिवशी माझ्यावर माहिम येथील हिंदुजा रुग्णालयात हृदयावर शस्त्रक्रिया करण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर माझी प्रकृती पूर्वपदावर येत गेली. त्यानंतर मी हळूहळू आपल्या कामास सुरूवात केली. कामगार चळवळीचे जेवढे काही काम करता येईल तेवढे करण्याचा निर्धार यापुढील काळात केला आहे.

समाप्त...

# बदली कर्मचारी ते कर्मचारी संघटना अध्यक्ष

सर जे.जे. समूह रुग्णालयात बदली कर्मचारी म्हणून रुजू झालेले व त्यानंतर आपल्या चौफेर व्यक्तीमत्वाने कर्मचारी व रुग्णांची सेवा करून अल्पावधीत आपले कर्तृत्व सिध्द करणारे सुरेश सहदेव तांबे यांना वैद्यकीय क्षेत्रात कोण ओळखत नाही असे नाही.



सुरेश सहदेव तांबे

सुरेश सहदेव तांबे यांचा जन्म ११/९/१९७६ रोजी अत्यंत गरीब कुटुंबात झाला. वडील सहदेव अर्जुन तांबे हे सर जे.जे. समूह रुग्णालयामध्ये अधिपरिचारिका कार्यालय येथे शिपाई या पदावर कार्यरत होते. त्यांच्यामागे पत्नी, ३ मुलगे व मुलगी असा परिवार होता. घरात खाणारी पाच माणसे, तुटपुंज्या पगारात घर चालविणे खूप कठीण जात असल्याने सुरेश तांबे यांना नोकरी करणे गरजेचे होते. इच्छा असून सुध्दा त्यांना पुढील शिक्षण घेता आले नाही. त्यांचे प्राथमिक शिक्षण म्युनिसिपल शताब्दी सोहळा, सर जे.जे.कंपाऊंड येथे झाले. तर माध्यमिक शिक्षण सर एली कादुरी या शाळेत झाले. शेवटी वयाच्या १८ व्या वर्षी सर जे. जे. समूह रुग्णालयात भरतीने बदली कामगार म्हणून रुजू झाले. १० ते १२ वर्षे बदली कामगार म्हणून काम केल्यानंतर २००४ साली ते सरळ सेवा भरतीच्या माध्यमातून कायम-स्वरूपी कक्षसेवक म्हणून काम पाहू लागले. सध्या २०१४ सालापासून ते रुग्णालयात अंधार खोली सहायक या पदावर काम करीत आहेत. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करत आपल्या जीवनाचा हा प्रवास केला आहे.

रुग्णालयाच्या कर्मचारी वसाहतीमध्ये त्यांचे लहानपणा-पासून वास्तव्य असल्यामुळे तिथे होळी, रंगपंचमी, दिवाळी दहीहंडी आदी पारंपारिक सण साजरे होत होते. त्यामध्ये सुरेश तांबे हिरारीने भाग घेत होते व आजही भाग घेतात. दहीहंडी हा त्यांचा आवडता सण आहे. सर जे.जे. समूह रुग्णालयाचे गोविंद पथक त्यांनी तयार केले असून ते सध्या त्यांना प्रशिक्षण देत असतात. अशा प्रकारे सार्वजनिक क्षेत्रात देखील त्यांनी सक्रीय योगदान दिले असून त्यामुळेच अनेकजण त्यांच्याशी जोडले गेले आहे. त्यांना व्यायामाची खूप आवड आहे. ते उत्कृष्ट शरीरसौष्टवपटू आहेत. नवयुग व्यायाम शाळेच्या माध्यमातून नवरात्र, आंबेडकर

**नोंद**

आदी शरीरसौष्टव स्पर्धा त्यांनी जिकलेल्या आहेत. त्यांच्या पावलावर पाऊल ठेऊन त्यांचा मुलगा आयुष तांबे याने नवयुग व्यायामशाळेच्या माध्यमातून पॉवरलिफ्टींग स्पर्धेत सुवर्ण पदक मिळविले आहे.

करोना काळात त्यांनी रुग्णांची सेवा करताना व्यायाम करणे किती जरुरीचे आहे, हे पटवून दिले असून त्याची जनजागृती केली आहे. लहानपणापासून त्यांना चित्रकलेची आवड होती. करोना काळात त्यांनी हा छंद चांगलाच जोपासला. या काळात त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह अनेकांची छायाचित्रे रेखाटली आहेत. त्यांना कोविड योध्दा म्हणून प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आहे.


सुरेश तांबे सर जे.जे. समूह रुग्णालयात कर्मचाऱ्यांचे प्रश्न हिरीरीने सोडवित असतात. त्यामुळेच त्यांना राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र (संलग्न) सर जे.जे. समूह रुग्णालय तृतीय श्रेणी कर्मचारी संघटनेचे अध्यक्षपद भूषविण्याची संधी मिळाली. ते गेली २ वर्षे, या पदावर काम करीत आहेत. या संघटनेच्या माध्यमातून ते सर्व कर्मचारी वर्गाला मदत करीत असतात. या संघटनेच्या माध्यमातून ते सर्व जाती धर्माच्या लोकांना पुढे घेऊन जात आहेत. सर जे.जे. समूह मधील रुग्णांना ते सर्वतोपरी मदत करीत असतात.

तांबे यांच्या छोट्याशा परिवारामध्ये त्यांची पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे. त्यांची पत्नी सर जे.जे. समूह रुग्णालयात परिचारिका म्हणून कार्यरत आहे. आपण ज्या परिस्थितीतून वर आलो. ती परिस्थिती आपल्या मुलांवर येऊ नये म्हणून, हे दोघे पती-पत्नी खूप मेहनत घेत आहेत. मुलगा कॉम्प्युटर इंजिनिअरिंगचे प्रशिक्षण घेत आहे. तर मुलगी आर्या तांबे १२ वी सायन्स उत्तीर्ण झाली असून तिची डॉक्टर होण्याची इच्छा आहे. त्यांना उज्वल भवितव्यासाठी हार्दिक शुभेच्छा!

**- नासिकेत पानसरे**
**९९३०९९८९७८**

# राज्यातील रोजगाराचे एकारलेपण

महाराष्ट्रात रोजगारनिर्मिती होते आहे का? नक्की होते आहे. राज्यात २०१८-१९ पासून २०२२-२३ पर्यंत संघटित क्षेत्रात नवीन रोजगार निर्माण होतोय. वीसपेक्षा जास्त कर्मचारी असलेल्या आस्थापनांना कर्मचारी भविष्य-निधी योजना अनिवार्य आहे. या आस्थापनांकडून दर महिन्याला नवीन सदस्यांची आकडेवारी जाहीर होते. या आकडेवारीवरून राज्यातील औपचारिक क्षेत्रातील रोजगाराची स्थिती लक्षात येते.




राज्यातील संघटित क्षेत्रातील नवीन रोजगार निर्मिती विषयी या लेखात दिलेल्या तक्त्यावरून औपचारिक क्षेत्रातील नवीन रोजगारवाढ दिसेल. केंद्र सरकार या आकडेवारीवरून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होते आहे, असे दिसते. परंतु ही आकडेवारी जशीच्या तशी घेता येत नाही. उदाहरणार्थ, उपलब्ध आकडेवारीनुसार सर्वात जास्त रोजगारनिर्मिती २९ ते ३५ या वयोगटात झाली. त्या खालोखाल ३५ वर्षांवरील वयोगटात झाली. या उलट १८ वर्ष वयोगटात रोजगारवाढ उणे ४ टक्के होती. २९-३५ वयोगटातील आकडेवारी पूर्णत: नवीन निर्माण झालेले रोजगार दर्शवते, असे मानले तर मोठ्या प्रमाणावर तिशी उलटेपर्यंत या व्यक्ती बेकार होत्या, असे मानावे लागेल. हे योग्य वाटत नाही. मग वास्तव काय असावे?

वीसपेक्षा कमी व्यक्तींना कामावर ठेवणाऱ्या आस्थापनांना कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी योजना अनिवार्य नसते. त्यामुळे अशा आस्थापनांतून काम करणाऱ्या व्यक्तींची नोंद होईलच, असे नाही. अशा छोट्या आस्थापनांतून कामाला सुरूवात करून पुढे मोठ्या आस्थापनातून काम करू लागलेल्या व्यक्तींची नवीन सदस्य म्हणून नोंदणी होईल. त्यातून नवीन रोजगार निर्माण होते आहे, असे चित्र दिसेल. परंतु सखोल पाहिले तर फक्त छोट्या आस्थापानातून नोकरी सोडून मोठ्या आस्थापनेत आलेल्या लोकांचाही यात सहभाग असेल. २०१३ मध्ये देशव्यापी आर्थिक पाहणी केली गेली. तिचा निष्कर्षही याला दुजोरा देतो. देशात ८५ टक्के रोजगार हा पाचपेक्षा कमी कामगार असलेल्या आस्थापनांतून आहे, असे दिसून आले, जर अशा छोट्या आस्थापनांतून मोठ्या आस्थापनेत कामगार काम करू लागले, तर त्यांची पहिल्यांदाच कर्मचारी भविष्य निधीसाठी नोंदणी होईल आणि मोठ्या आस्थापनांत कामगार काम करू लागले, तर त्यांची पहिल्यांदाच कर्मचारी भविष्य निधीसाठी नोंदणी होईल आणि मोठ्या प्रमाणावर नवीन रोजगार निर्माण झाला, असे चित्र दिसेल. म्हणूनच बरीच आकडेवारी रोजगारनिर्मितीचे अवास्तव चित्र दर्शवते. याचा अर्थ असा नव्हे, की नवीन रोजगार निर्माणच होत नाहीये. १८-२२ या वयोगटात रोजगार वाढला आहे. इथे नवीन नोकऱ्या निर्माण होत आहेत. पण इथे रोजगार निर्मितीचा दर वार्षिक फक्त ४.५ टक्के इतकाच आहे. एकत्रित आकडेवारीतून १३ टक्के दिसतो, तितकी नवीन रोजगार निर्मिती नक्कीच होत नसावी.

रोजगार निर्माण होतो आहे किंवा नाही, एवढेच पाहून चालत नाही, तो कोणासाठी होतोय आणि कुठे होतोय, याचाही विचार करावा लागतो. स्त्रिया, पुरूष आणि तृतीयपंथींच्या रोजगाराचे स्वरूपच वेगळे तसेच भौगोलिक स्वरूपही वेगळे आहे. पुरूषांचा बिगरशेती व्यवसायातील रोजगार महाराष्ट्रात पशुपालन २१ टक्के, उत्पादन २१ टक्के आणि किरकोळ व्यापार २२ टक्के यात विभागला आहे. तसेच १२ टक्के रोजगार हा वाहतूक आणि उपहारगृह या क्षेत्रातून आहे. स्त्रियांच्या रोजगाराची विभागणी वेगळी आहे, तर १६ टक्के रोजगार उत्पादनक्षेत्रात आहे. मानवी आरोग्य, समाजसेवा, वित्त, विमा व इतर सेवा या क्षेत्रांत स्त्रियांचा २२ टक्के रोजगार आहे, तर किरकोळ व्यापारात सहा टक्के आहे. उरलेला थोडा विखुरलेला आहे.

**डॉ. नीरज हातेकर**

तृतीयपंथींचा रोजगार साधारण पुरूषांसारखा आहे, स्त्रिया ज्या क्षेत्रात काम करतात ती क्षेत्रे पुरूष आणि तृतीयपंथींच्या कामाच्या क्षेत्रापेक्षा वेगळी आहेत. तेथील काम करण्याची स्थिती वेगळी आहे. स्त्रियांच्या रोजगार वाढवायचा असेल तर स्त्रिया ज्या क्षेत्रात काम करतात तिथे भर दिला पाहिजे.

स्त्रियांच्या रोजगाराचे स्वरूप भौगोलिकदृष्ट्याही वेगळे आहे. त्यांच्या एकूण रोजगारापैकी २५ टक्के रोजगार पुणे, मुंबई, नाशिक आणि ठाणे या जिल्ह्यातून उत्पादनावर वास्तुनिर्मिती, वित्त, विमा आणि माहिती तंत्रज्ञान या क्षेत्रांतून आहे. स्त्रियांच्या एकूण रोजगारापैकी ६० टक्के रोजगार पुणे, मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, कोल्हापूर, सातारा व सांगली या जिल्ह्यातून येतो. या उलट विदर्भाच्या ११ जिल्ह्यांतून स्त्रियांचा केवळ १४.७३ टक्के रोजगार येतो. मराठवाड्याच्या आठ जिल्ह्यांतून स्त्रियांचा राज्यातील एकूण रोजगारापैकी फक्त १०.५८ रोजगार निर्माण होतो. यात शहरी आणि ग्रामीण भागही आहे. ग्रामीण भागात स्थिती अधिक विषम आहे. ४७ टक्के स्त्रिया शेतमजूर आहेत. बिगरशेती व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया बहुतांशी असंघटित क्षेत्रात कमी मोबदल्याची कामे करतात. शिवाय घरातील जबाबदारी असतेच. संशोधन असे दाखवते की, कुटुंबाची स्थिती सुधारली की, स्त्रिया काम करायचे बंद करतात. पुरुषांबाबत हे घटक लागू पडत नाहीत. म्हणून रोजगार विषयाचे सरसकटीकरण करता येत नाही. स्त्री, पुरुष आणि तृतीयपंथी व्यक्तींच्या रोजगाराचा स्वतंत्र विचार केला पाहिजे. रोजगारासंबंधी जी धोरणात्मक चर्चा होते, त्यात हे फरक लक्षात घेतले जात नाहीत. उदाहरणार्थ, परदेशी भांडवलदारांशी सामंजस्य करार करून परकी गुंतवणुकीद्वारे रोजगार वाढविण्यावर राज्य सरकार भर देते आहे. यातून निर्माण होणारा रोजगार राज्यातील सर्व घटकांना, भूभागांना सामावून घेणारा नाही. स्त्रिया, तृतीयपंथी, राज्यातील मागास जिल्हे इथे आपोआप रोजगार निर्माण होणार नाही. काही अर्थतज्ज्ञांच्या मते शहरी भागात रोजगार निर्माण झाला की, ग्रामीण भागातील लोकांनाही फायदा होतो. शहरात स्थलांतर करून वाढीव रोजगाराचा फायदा त्यांना घेता येतो. यातून शेतीवरील अतिरिक्त अवलंबित्व कमी होईल, अशी ही मांडणी आहे. पण आकडेवारी नीट पहिली तर वस्तुस्थिती वेगळी दिसते. २००५-२०१२ या काळात राज्याची अर्थव्यवस्था दरवर्षी सरासरी १० टक्के वेगाने वाढली. हा वेग अभूतपूर्व होता. या काळात ग्रामीण भागातून मोठे स्थलांतर झाले. पण ते शेतमजुरांनी केले नाही. या काळात ३४३ ग्रामीण तालुक्यांपैकी ३०९ तालुक्यात शेतमजुरांचे प्रमाण कमी होण्याऐवजी वाढले. याउलट जे शेतीवर अवलंबून नव्हते, त्यांनी शहराकडे स्थलांतर केले. ग्रामीण अर्थव्यवस्था रोजगारासाठी शेतीवर जास्त अवलंबून राहू लागली.

समाजातील सर्व घटकांना सामावून घेईल, असा रोजगार आपोआप निर्माण होत नाही. त्यासाठी स्वतंत्र प्रयत्न करावे लागतील. ग्रामीण भागात स्त्रियांचा बिगरशेती रोजगार वाढवायचा असेल तर स्थानिक पायाभूत सोईंवर भर द्यावा लागेल. स्थानिक वाहतूक सोय नसणे, बारमाही रस्ता नसणे, आरोग्यसुविधा नसणे, यांचा परिणाम स्त्रियांच्या बिगरशेती व्यवसायात काम मिळवण्याच्या क्षमतेवर खूप होतो. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांबाबत देशात विसावा क्रमांक लागतो. केरळ, गुजरात, तमिळनाडू, हरियाना पुढे आहेत. उत्तर प्रदेश आणि बिहार यांनीही गेल्या दहा वर्षात महाराष्ट्राला ग्रामीण पायाभूत सुविधांबाबत मागे टाकले आहे. याचा परिणाम ग्रामीण महाराष्ट्रातील स्त्रियांच्या रोजगारावर होतो आहे. हल्ली राज्य सरकारने स्त्रियांसाठी अर्ध्या तिकिटात बसप्रवासाची सोय केलेली आहे. हे महत्त्वाचे पाऊल आहे. यातून स्त्रियांना कामावर जाणे कमी खर्चिक होते. तसेच बसमधून बहुसंख्येने स्त्रिया असल्यामुळे प्रवास सुरक्षित होतो. सोबत उत्तम सार्वजनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या, तर स्त्रियांच्या रोजगारात चांगला फरक पडू शकतो.

## गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नावर तोडगा काढणार - उपमुख्यमंत्री अजित पवार

**मुंबई :** गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नावर येत्या दोन दिवसांत कृती समितीच्या नेत्यांसोबत चर्चा करून तोडगा काढण्यात येईल, असे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहे, अशी माहिती राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे अध्यक्ष आमदार सचिन आहिर यांनी आझाद मैदानावरील गिरणी कामगारांच्या आक्रोश मोर्चासमोर बोलताना दिली.

अर्ज भरलेल्या सर्व कामगारांना घरे मिळालीच पाहिजेत, या मागणीसाठी विधानभवनवर कामगारांचा आक्रोश मोर्चा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी सचिनभाऊ अहिर कामगारांपुढे बोलत होते. याप्रसंगी विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, आमदार भास्कर जाधव, राजन साळवी, सुनिल शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

श्री. अहिर म्हणाले, मुंबईतील सुमारे ३० हजारांवर घरे फक्त बांधकामाचा खर्च पकडून गिरणी कामगारांना आम्ही मिळवून दिली आहेत. मुंबईतील एनटीसी गिरण्यांची जागा गिरणी कामगारांना देण्याचा राज्याने केंद्राकडे प्रस्ताव पाठवावा, असा प्रयत्न आपण करणार आहोत. गिरणी कामगारांना घरांचा प्रश्न मार्गी लागावा यासाठी शासनाने नेमलेल्या संनियंत्रण समितीत कामगार नेते आणि विरोधी पक्षनेत्यांना डावलून जे पक्षीय राजकारण खेळले गेले आहे, त्याचा आपल्या भाषणात सचिन अहिर यांनी तीव्र शब्दांत निषेध केला. त्यावेळी कृती समितीचे नेते निवृत्ती देसाई, शिवाजी काळे उपस्थित होते.

## गिरणी कामगारांना घरे न दिल्यास आंदोलन

**मुंबई :** जवळपास एक लाख साठ हजार गिरणी कामगारांच्या वारसांना घरे द्या, या मागणीसाठी सर्व श्रमिक संघटनेच्या नेतृत्वात आझाद मैदानात आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलनाचे नेते कॉ. उदय भट म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व गिरणी कामगार आणि वारसांना घरे देण्यात येऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते. मात्र ते पूर्ण करण्यात आले नाही. म्हणून आम्हाला आंदोलन करावे लागत आहे.

घरांसाठी गिरणी कामगार आणि वारसांनी म्हाडाकडे एक लाख ७४ हजार ३३२ अर्ज भरले. २०१२, २०१६ आणि २०२० साली मिळून एकूण १५ हजार ८७१ गिरणी कामगार आणि वारसांना घराचे वाटप करण्यात आले आहे.

## महिला व बालकल्याण आयुक्तपदी डॉ. नारनवरे



**मुंबई :** महिला व बालविकास विभागाच्या आयुक्तपदाची सूत्रे डॉ. प्रशांत नारनवरे यांनी स्वीकारली. त्यावेळी बालविकासचे उपायुक्त राहुल मोरे, प्रशासन विभागाच्या उपायुक्त वर्षा पवार यांनी पुष्पगुच्छ देऊन डॉ. नारनवरे यांचे स्वागत केले. डॉ. नारनवरे हे प्रशासन सेवेतील २००९ तुकडीचे अधिकारी आहेत.

डॉ. नारनवरे यांनी सांगली येथील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उस्मानाबाद व पालघरचे जिल्हाधिकारी आणि सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको यासारखी पदे भूषवली आहेत. जनतेप्रती प्रशासनात संवेदनशीलता निर्माण करणे, त्यांच्यात आपलेपणा निर्माण करणे, उत्तरदायित्वाची भावना निर्माण करून प्रशासन अधिक जलद करणे हे उद्दिष्टे ठेवून डॉ. नारनवरे यांची कार्यप्रणाली राहिलेली आहे.

## चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे निलेश लंके यांना साकडे

**सांगली :** चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसाठी विधानसभेत आवाज उठवण्याची ग्वाही पारनेरचे आमदार निलेश लंके यांनी दिले. चतुर्थश्रेणी कर्मचारी महासंघातर्फे सांगली जिल्हाध्यक्ष संजय व्हनमाने यांनी शिष्टमंडळासह लंके यांची भेट घेऊन मागण्यांचे निवेदन दिले. यावेळी महासंघाचे प्रशांत चंदनशिवे, राहुल शिंदे आदी उपस्थित होते. शिष्टमंडळाने सांगितले की, कायम नेमणुकीसाठी कर्मचारी वर्षानुवर्षे संघर्ष करत आहेत. नियुक्तीच्या प्रतीक्षेत अनेक जण सेवानिवृत्त झाले, त्यांना कोणतेही लाभ मिळाले नाहीत. न्यायालयाने आदेश देऊनही कार्यवाही केली जात नाही. त्यामुळे आता विधानसभेत दाद मागवी, अशी त्यांच्याकडे मागणी केली आहे.

## कामावर रुजू होण्यापूर्वी हवे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र

**गडेगाव :** पैनगंगा कोळसा खाणीत अवतार सिंग ॲण्ड कंपनीला ४२ महिन्यांचे कंत्राट मिळाले आहे. या कंपनीमध्ये २५० स्थानिक आणि ४५० कामगार परप्रांतीय आहेत. या सर्व कामगारांची विविध पदांवर नेमणूक करण्यात आली. मात्र कोणत्याही कामगारांना रुजू होण्यापूर्वी त्यांच्याकडून चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र अवतार सिंग ॲण्ड कंपनीने बंधनकारक केले आहे.

अनेक कंपन्यांत स्थानिकांना डावलून परप्रांतीयांना काम देण्यात येते. याकरिता परप्रांतीय कामगारांची चारित्र्य पडताळणी केली जात नाही. कुख्यात गुन्हेगार यामुळेच कंपनीत आश्रयाला येतात. अशी सध्याची परिस्थिती आहे.

शासकीय व निमशासकीय नोकरीत रुजू होण्यापूर्वी त्या व्यक्तीचे चारित्र्य बघितले जाते. त्यासाठी त्याला पोलीस विभागाकडून चारित्र्य प्रमाणपत्र आणणे बंधनकारक असते. परंतु अनेक कंत्राटी कंपनी या बाबीकडे दुर्लक्ष करीत असतात. त्यामुळे भविष्यात देखील अनेक दुर्दैवी प्रकार घडण्याची शक्यता असते. त्याचबरोबर या प्रकारामुळे इथे बऱ्याचदा अनुचित घटना घडत असल्याचे दिसून येते. ही सर्व उदाहरणे आणि परिस्थिती ध्यानात घेऊनच अखेर या ठिकाणी पैनगंगा वेकोलीत पहिल्यांदाच अवतार सिंग ॲण्ड कंपनीने चारित्र्य पडताळणी नाही तर नोकरी नाही, असा आदेश काढला आहे.

## 'कर्मचारी टाईम्स' दिवाळी २०२३ अंकासाठी आवाहन

**मुंबई :** 'कर्मचारी टाईम्स' वृत्तपत्राच्या स्वरुपात आपल्या भेटीला येत असते. शासकीय कर्मचाऱ्यांच्या हितासाठी जे निर्णय राज्यशासन घेत असते ते पोहचवतानाच कर्मचाऱ्यांच्या मागण्या शासकीय स्तरावर पोहचवण्याचे महत्वाचे कामही या वृत्तपत्राच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

दिवाळी निमित्त 'कर्मचारी टाईम्स' दिवाळी २०२३ अंक प्रसिद्ध करावा अशी अनेक वाचकांची सूचना व्यवस्थापक मंडळाला आवडली म्हणूनच यंदाच्या दिवाळीत आपल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या सर्वोत्तम साहित्याची भेट आपण आपल्या वाचकांना देणार आहोत. त्यासाठी अधिकारी / कर्मचारी मान्यवर, प्रथितयश तसेच नवोदित साहित्यिकांनी आपले अप्रकाशित साहित्य, विशेषत: शासकीय कार्य, कर्मचाऱ्यांच्या समस्या, व्यथा आणि त्यांच्या कार्यकर्तृत्वाला प्रकाशझोतात आणण्यासाठी केलेल्या संवर्धनात्मक लेख, कथा, कविता, मुलाखत ३० सप्टेंबर, २०२३ पर्यंत karmacharitimes@gmail.com ह्या ईमेलवर किंवा 'कर्मचारी टाईम्स', संपादक, ६ व ९, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई ४०००३२ या पत्त्यावर पाठविण्याचे आवाहन आहे. अंतिम तारखेनंतर आलेल्या साहित्याचा दिवाळी अंकासाठी विचार करण्यात येणार नाही. अधिकारी / कर्मचारी साहित्यिकाने आपल्या आवडीची सर्वोत्तम कथा, कविता वा लेख यापैकी एकच साहित्यकृती दिलेल्या मुदतीत पाठवावी. जास्तीतजास्त साहित्यिकांचा अंकात समावेश व्हावा म्हणून एका साहित्यिकाच्या एकाच कलाकृतीचा अंकात समावेश केला जाईल. साहित्यासोबत सदर साहित्य स्वतचे असल्याचे नाव, पत्ता, स्वाक्षरी असल्याचे हमीपत्र पाठविण्यात यावे. लिखीत हमीपत्राशिवाय साहित्य स्वीकारले जाणार नाही.

आपण कोणत्या विभागात कार्यरत आहात त्याचा उल्लेख आणि पद लिहिणे अनिवार्य आहे. साहित्य निवडीचा अधिकार निवड समिती राखून ठेवत आहे. अधिक माहितीसाठी संपर्क - ९९८७७४६७७६ गुरुदत्त वाकदेकर, उपसंपादक.

## सेंट जॉर्ज रुग्णालयात मोफत डायलिसिस

**मुंबई :** राज्य सरकारच्या सेंट जॉर्ज रुग्णालयात मॉड्युलर ओटीचे व डायलिसिस सेंटरचे उद्घाटन करण्यात आले. यात सहा अत्याधुनिक शस्त्रक्रियागृह असल्याने सर्व सामान्य रुग्णांना दिलासा मिळणार आहे. याचसोबत सर्वसामान्यांना मोफत डायलिसिस, तर पांढरे रेशन कार्ड असलेल्यांसाठी केवळ २५० रुपयांत ही सेवा मिळणार असल्याची माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. याच सोबत खाजगी रुग्णालयांप्रमाणे अद्यावत सेवा देण्यावर भर देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यात सर्जरी, अस्थिव्यंग गायनेकोलॉजी, प्लास्टिक सर्जरी, नाक, कान, घसा आणि डोळ्यांच्या शस्त्रक्रिया होणार आहेत. या सर्व शस्त्रक्रिया गृहांचे उद्घाटन मंत्री महाजन यांच्या हस्ते करण्यात आले.

## अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा आझाद मैदानात निषेध

**मुंबई :** अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांकरिता केंद्र व राज्य सरकारच्या विरोधात निषेध दिन अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्या मुंबई जिल्हा कमिटीने आझाद मैदानात आयोजित केला. यावेळी अंगणवाडी सेविका, मदतनीस यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग दर्शवला. मागण्यांबाबत शिष्टमंडळाने मंत्रालयात उपसचिव ठाकूर यांना निवेदन देऊन चर्चा केली.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांना केंद्र सरकारने २०१८ नंतर मानधनवाढ केलेली नाही. आहार भत्ता व अंगणवाडीच्या भाड्यात वाढ केलेली नाही. यासाठी निषेध दिन राज्यात सर्वत्र करण्यात आला. मुंबईतील आझाद मैदानात मुंबई जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका, मदतनीस निषेध दिन आयोजित केला. यानंतर महिला व बालविकास विभागाचे उपसचिव ठाकूर यांची शिष्टमंडळाने भेट घेतली. शिष्टमंडळात आरमायटी इराणी, संगीता कांबळे, स्नेहा सावंत, संपदा सैद व मीना मोहिते यांचा समावेश होता.

अंगणवाडी सेविका आणि मदतनिसांना सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा द्या, सेविकांना २६ हजार रुपये व मदतनिसांना २० हजार रुपये किमान वेतन द्या, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे सर्व अंगणवाडी सेविका व मदतनिसांना ग्रॅज्युईटी लागू करा, आयसीडीएसचे खाजगीकरण थांबवा, सर्व अंगणवाडी कर्मचाऱ्यांना पेन्शन लागू करा. टीएचआर पद्धत रद्द करा. आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या. यावेळी सुहासिनी कानसे, सुप्रिया परब, वंदना शेजवलकर यांच्यासह अनेक अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या अनेक मागण्या आहेत. त्यांची पूर्तता अद्यापही करण्यात आलेली नाही. त्यासाठी अनेकदा आंदोलने करण्यात आली. अनेक नेत्यांनी देखील संघटनांना भेटी देऊन याबाबत आश्वासन दिले आहे. तरीही परिस्थितीमध्ये कुठलाही बदल झालेला नाही. त्यामुळेच या सर्व अंगणवाडी महिला कर्मचाऱ्यांपुढे आंदोलन करण्याखेरीज कुठलाही मार्ग उरलेला नाही.

अशा परिस्थितीत जर शासनाच्या वतीने त्यांच्या प्रश्नांची योग्य ती दखल घेतली गेली नाही तर मात्र भविष्यात पुन्हा तीव्र स्वरुपाचे आंदोलन करावे लागेल. त्यावेळी निर्णय लागेपर्यंत कुठल्याही प्रकारे तडजोड केली जाणार नाही, असा निर्धार यावेळी या महिलांच्या वतीने करण्यात आला आहे.

## मागासवर्गीयांवर पदोन्नती देताना अन्याय

**मुंबई :** विधी विभागाच्या 'कायदा अधिकारी' या महत्त्वाच्या पदावर विभागातील ज्येष्ठता सूचीनुसार एक मागासवर्गीय महिला अधिकारी अग्रस्थानी असताना त्यांना डावलून त्यांच्यापेक्षा चार वर्षांनी कनिष्ठ असलेल्या अधिकाऱ्याला पदोन्नती देण्यात आली. या अधिकाऱ्याला पालिकेतील एका सहआयुक्ताच्या दबावामुळे पदोन्नती दिल्याचा आरोप होत आहे. पालिकेच्या विधी विभागात संबंधित मागासवर्गीय महिला संयुक्त कायदा अधिकारी पदावर कार्यरत असून नियमानुसार त्यांना कायदा अधिकारीपदी पदोन्नती देणे आवश्यक होते. कायदा अधिकारी पद १ ऑक्टोबर २०२१ पासून भरायचे होते. मात्र, पालिकेच्या पुनर्विलोकन समितीने योग्य कार्यवाही न केल्याचा आरोप आहे.

## सफाई कामगारांवर उपासमारीची वेळ

**सोलापूर :** औरंगाबाद खंडपीठामध्ये २३ मार्च २०२३ तारखेपासून लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार होणाऱ्या नियुक्तीस स्थगिती दिली. या स्थगितीमुळे साफसफाईचे काम करणाऱ्या कामगारांवर उपासमारीची वेळ येत आहे.

स्थगिती आदेश शिथिल व्हावा व राज्यातील महापालिका, नगरपालिका, नगरपरिषदेमधील सर्व कर्मचाऱ्यांच्या वारसदारांना तत्काळ लाड पागे समितीचा लाभ मिळावा, अशी मागणी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनच्यावतीने सामाजिक न्याय आणि विशेष सहायक विभागाचे सचिव सुमंत भांगे यांच्याकडे केली आहे.

राज्याचे सामाजिक न्याय विशेष विभागाचे सचिव सुमंत भांगे यांच्याशी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनचे अध्यक्ष बापूसाहेब सदाफुले यांनी चर्चा केली. हा निकाल तातडीने लागावा व सामाजिक न्याय विशेष विभागाने जाणीवपूर्वक लक्ष घालावे, शासनाचे वकील यांना हा प्रश्न त्वरित निकाली काढावा म्हणून योग्य त्या सूचना कराव्यात, अशीही मागणी या वेळी करण्यात आली.

या वेळी युनियनचे सायमन गट्टू, ट्रेड युनियनचे उपाध्यक्ष बी. टी. जाधव, वाहनचालक प्रमुख पिंटू जेटीथोर सफाई कामगार नेते श्रीनिवास रामगल आदी उपस्थित होते.

## किमान करारासाठी कामगार आयुक्तांना निवेदन

**पुणे :** राज्यात किमान वेतन कायदा आहे. दर ५ वर्षांनी त्यात आर्थिक परिस्थितीनुसार वाढ करणे बंधनकारक आहे. मात्र, राज्यातील किमान १५ उद्योगांमध्ये ८ वर्षे झाली तरी नव्याने करार करण्यात आलेले नाहीत, असा आरोप भारतीय मजदूर संघाने केला. बीज क्षेत्रातील विविध कंपन्यांमध्ये कंत्राटी स्वरुपात काम करणारे ४० हजार कामगारही या कायद्यापासून वंचित असल्याचे संघाचे म्हणणे आहे.

राज्याचे कामगार आयुक्त सतीश देशमुख यांना संघाच्या वतीने दिलेल्या निवेदनात याबाबतचे सविस्तर विवेचन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

## पुरुष लोको पायलटचा महिला सहकाऱ्यांवर संताप

**सोलापूर :** पुरुषांच्या तुलनेत महिला लोको पायलट अर्थात ट्रेन चालक पूर्ण क्षमतेने काम करत नाहीत. नाइट शिफ्ट टाळतात. कधीही रजा घेतात. यासह इतर अनेक तक्रारी करत पुरुष लोको पायलटांनी लिंग बदलून घेण्याची तयारी दर्शवली आहे. पुरुषांपेक्षा महिला लोको पायलटांना अधिक सवलती मिळत असल्याने आम्हीही लिंग बदलून घेऊ. त्याची परवानगी आपण द्यावी. लिंग बदलून घेण्यासाठी एक वर्षाची रजा देण्याची विनंतीदेखील पुरुष लोको पायलटांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.

सोलापूर रेल्वे विभागाच्या विभागीय व्यवस्थापकांच्या नावे सदर निवेदन आहे. सदर निवेदन सोशल मीडियावर खूपच व्हायरल होत आहे. याबाबत डीआरएम नीरजकुमार दोहरे यांना विचारले असता, त्यांनी कोणतेही निवेदन प्राप्त झाले नसल्याचे सांगितले. याबाबत पुरुष लोको पायलटांना विचारले असता, त्यांनी महिला लोको पायलटांबद्दल तक्रारी असल्याचे सांगितले. त्याच बरोबर सध्या आधुनिक काळात स्त्री आणि पुरुष यांच्यात समानता असल्यामुळे याबाबत कुठलाही भेदभाव करणे हे सर्वस्वी चुकीचे असल्याचे मतदेखील अनेकांनी यावेळी बोलताना व्यक्त केले.

## नगरपालिकांमध्ये १,७८२ पदांची भरती

**मुंबई :** राज्य सरकारच्या नगरपालिका प्रशासन संचालनालय अधिनस्त 'महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा' मधील खालील संवर्गातील गट-क (श्रेणी अ, ब आणि क) मधील १ हजार ७८२ रिक्त असेलेली पदे नामनिर्देशनाने / सरळसेवेने भरण्यासाठी ऑनलाइन पद्धतीने परीक्षेचे अर्ज मागविण्यात आलेले आहेत.

नगरविकास विभागाअंतर्गत कार्यरत असलेले नगरपरिषद प्रशासन संचालनालय हे महाराष्ट्र राज्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या समन्वयासाठी राज्यस्तरीय कार्यालय आहे. या कार्यालयामार्फत नगर परिषदेतील विविध पदांची भरती केली जाते.

## सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यालयास टाळे ठोकण्याचा इशारा

**मुरूड-जंजिरा :** विहूर पुलाच्या सभोवतालीचा परिसर खड्डेमय झाला आहे. याकडे मुरूड सार्वजनिक बांधकाम खात्याने वेळीच लक्ष द्यावे अन्यथा काही दिवसांतच बांधकाम कार्यालयास टाळे लावण्याशिवाय पर्याय नसल्याचा इशारा पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अरविंद गायकर यांनी दिला आहे.

मुरूड येथील सार्वजनिक बांधकाम खाते असूनदेखील, नसल्यासारखे आहे. कोणतेही काम वेळेत न करणे, रस्ते आवश्यक असताना दुर्लक्ष करून लोकांना त्रास देणे, विहूर पुलाच्या सभोवतालीचा परिसर खड्डेमय झाला असून, वेळीच जर येथे कार्पेट मारला असता, तर येथे खड्डे पहावयास मिळाले नसते. परंतु लोकांनी सजग करून सुद्धा या कामाकडे दुर्लक्ष केल्याने आज येथून ये-जा करणाऱ्या शालेय विद्यार्थी व प्रवासी वर्गाला खूप मोठा त्रास सहन करावा लागत आहे. जर कोणतेच काम मुरूड सार्वजनिक बांधकाम खाते करीत नसेल, तर या कार्यालयास टाळे मारणे खूप आवश्यक आहे. येत्या १५ दिवसात विहूर पूल व अन्य रस्त्याचे खड्डे बुजवले नाही तर कार्यालयाला टाळे लावण्याचा इशाराच पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष गायकर यांनी लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

## अग्निशमन दलात आणखी दोन रोबो

**मुंबई :** मुंबई अग्निशमन दलाच्या ताफ्यात पाच वर्षांपूर्वी अत्याधुनिक रोबो दाखल झाल्यानंतर आता येत्या सहा महिन्यांत आणखी दोन रोबो दाखल होणार आहेत. हे दोन्ही रोबो फ्रान्सवरून खरेदी केले जाणार आहेत. दोन्ही रोबोसह व्हेईकलसाठी ६ कोटी ८ लाख रुपये खर्च केला जाणार आहे. वर्क ऑर्डर देण्यात आली असून आयुक्तांच्या मान्यतेनंतर खरेदी प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. बॅटरीवर चालणारे हे रोबो काही तास धगधगत्या आगीत, चिंचोळ्या गल्ल्या आदी ठिकाणी सहज जाऊन तिथली आग विझवू शकणार आहेत.

मुंबईत टोलेजंगी इमारती उभ्या राहिल्या आहेत. या इमारतींना आग लागल्यावर मोठ्या प्रमाणावर पसरणारी उष्णता आणि धूर यामुळे अग्निशमन दलाला आग



विझवताना मोठी अडचण येते. अडचणींना सामोरे जाऊन आग नियंत्रणात आणली जाते. आता दलाच्या ताफ्यात आणखी दोन अत्याधुनिक रोबो मदतीसाठी येणार आहेत. हे रोबो आगीच्या ज्वाळा, चिंचोळ्या गल्ल्या अशा ठिकाणी सहज जाऊन तिथली आग विझवू शकणार आहेत.

दोन्ही रोबोंची किंमत ६ कोटी ८ लाख रुपये असणार आहे. रोबोतील थर्मल कॅमेरा धुरातही सर्व स्पष्टपणे दाखवेल. रोबो बॅटरीवर चालणारे असून ही बॅटरी चार तास चालते. मात्र ती संपल्यावर तत्काळ दुसरी बॅटरी जोडता येणार असल्याने रोबोला कितीही तास आगीशी झुंज देता येणार आहे. सध्या इस्त्रायल, चीन, अमेरिका सारखे विकसित देश असे रोबो तयार करते. विमान बांधणीसाठी वापरण्यात येणाऱ्या ॲल्युमिनियम पत्र्याच्या सहाय्याने त्यांची निर्मिती करण्यात आली आहे.

फ्रान्सच्या कंपनीने तयार केलेला हा रोबो सुमारे ५५ मीटर उंचीपर्यंत पाण्याचा मारा करू शकतो. बैसमेंटवरून राहून आगीशी सामना करताना पसरलेल्या धुरातही जिन्यावरून इमारतीत शिरून रोबो आग विझवू शकणार आहेत.

## महापालिका कॅन्टीनला नूतनीकरणाची प्रतीक्षा

**मुंबई :** पालिका कॅन्टीनमधील किचनमध्ये तुटलेले इलेक्ट्रिक बोर्ड, चोंदलेले ड्रेनेज तसेच जेवण बनविण्यासाठी अपुरी जागा अशा अनेक अडचणी असून कॅन्टीन किचनचे नूतनीकरण करण्यात यावे, यासाठी प्रशासनाला चार वेळा पत्र देण्यात आले आहे. मात्र अद्यापही त्याची दखल घेण्यात आलेली नाही.

कॅन्टीनच्या किचनमध्ये जेवण बनविण्याचे साहित्य, शेगडी व इतर भांडी ठेवण्यात आली आहेत. ही भांडी प्रशासनाची असून याचे भाडे कॅन्टीन चालकाला द्यावे लागते. असे असले तरी येथील मोडलेले इलेक्ट्रॉनिक स्विच, भांडी घासण्यासाठी लहानशी मोरी, सांडपाणी वाहून जाण्यासाठी असलेली अपुरी सुविधा यामुळे कॅन्टीनचालक मेटाकुटीला आले आहेत. कॅन्टीनचे नूतनीकरण करण्यात यावे, असे पत्र कॅन्टीन चालकाने पालिकेला दिले आहे.

कॅमेरा बसवण्यात आला असल्याने घटनास्थळाचाही अंदाज घेता येणार आहे. सध्याच्या काळात अद्ययावत यंत्रणा विकसित होत असून त्यासाठी अग्निशमन दलानेदेखील पुढाकार घेतला असल्यामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

## खोट्या दस्तावेजांने शेतीचा फेरफार; तिघांवर गुन्हे

**भंडारा :** खोटे दस्ताऐवज तयार करून शेतीची रजिस्ट्री करीत फेरफार केले. याप्रकरणी मोहाडी पोलिसांनी मोहाडीचे दुय्यम निबंधक हितेश मते, कांद्रीचे तलाठी सोनबा आहाके व मंडळ अधिकारी राजेश्वर मोहरकर यांच्यासह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी मोरेश्वर मारोती मोटघरे (४७) रा. धामणगाव, ता. मौदा यांनी तक्रार दाखल केली होती. दुय्यम निबंधकांसह तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल झाल्याने प्रशासनिक गोटात खळबळ उडाली आहे.

या एकंदरीत प्रकारामुळे सध्या या परिसरात एकच चर्चा होताना दिसून येत आहे. नागरिकांमध्ये याबाबत संताप व्यक्त होत आहे तर अनेकांकडून कडक कारवाई करण्याबाबतची मागणी करण्यात येत आहे. शासनाच्या वतीने ज्यांनी जनतेचे सेवक म्हणून योग्य काम करणे अपेक्षित असताना त्यांच्याकडूनच जर खोटेनाटे प्रकार घडत असतील तर न्याय कुठे मागावा, अशा स्वरूपाच्या भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहेत.

माहितीनुसार, मोरेश्वर मोटघरे यांची कांद्री शेतशिवारात गट क्रमांक ७७९/१ व ७८०/२ मध्ये असलेली क्षेत्र क्रमांक१०४ व ०८९ हेक्टर आर शेती आहे.

या शेती संदर्भात रवींद्र आसाराम बिसणे, रा. मांगली, ता. तुमसर, अशोक जयदेव मेश्राम (७४), रा. पचारा व प्रेमदास मदनलाल राऊत (५७), रा. मातानगर, तुमसर यांनी संगनमत करून मोटघरे यांच्या मालकीच्या शेतीचे खोटे दस्ताऐवज तयार केले. तेही इतके बेमालूमपणे केले होते की, त्याबाबत कुठल्याही प्रकारे शंका घेण्यास वाव मिळाला नाही. मात्र हा प्रकार उघड झाल्यानंतर मात्र सर्वांना धक्काच बसला.

तक्रारीच्या अनुषंगाने शहानिशा करीत पोलिसांनी सहा जणांविरुद्ध भादंवीच्या ४१९, ४२०, ४६७, ४६८, ४७१, ३४ कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. खोटी स्वाक्षरी व अज्ञात व्यक्तीला उभे करून शेतीचा फेरफार केल्याचे मोठे धाडस करून दुय्यम निबंधकासह तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखलच्या कारवाईने मोहाडीच्या महसूल प्रशासनात खळबळ उडाली आहे. याबाबतचा तपास पोलिस उपनिरीक्षक दुधकावरा करीत आहेत. त्यांनी चौकशी देखील करण्यास प्रारंभ केला आहे, अशी माहिती मिळालेली आहे.

शासनाच्या वतीने ज्यांना अधिकार दिले आहेत तेच अधिकारी जर अशाप्रकारे कृत्य करत असतील तर जनतेपुढे त्यांच्या प्रश्नांसाठी फार मोठी समस्या येऊ शकते, म्हणूनच याबाबत त्वरित योग्य कार्यवाही करण्याची मागणी होत आहे.

## सफाई कामगार पदोन्नतीच बंद

**मुंबई :** स्वच्छ व सुंदर मुंबईसाठी मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगार रात्रंदिवस झटत असतात. स्थायी समिती आणि महानगरपालिका सभागृहाने ४२ वर्षांपूर्वी सफाई कामगार, चतुर्थश्रेणी कामगार यांना ३३ टक्के लिपिक पदावर खात्यांतर्गत परीक्षेद्वारे पदोन्नती देण्याचा निर्णय घेतला होता. त्यात पालिका प्रशासनाने १० वी एजवी कर्मचारी पदवीधर असावा व खात्यांतर्गत परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पदोन्नती देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सफाई कामगारांना एक प्रकारे पदोन्नती बंद केली आहे.

प्रशासनाने २०१६ मध्ये दहावी उत्तीर्ण झालेल्या परीक्षार्थींना या परीक्षेतून बाद करून फक्त पदवीधरांना परीक्षेस बसता येईल, पालिका सभागृहाच्या ठरावाविरुद्ध कर्मचारी संघटनेने औद्योगिक न्यायालयात आव्हान दिले होते.

# असंघटित क्षेत्रातील कामगारांना न्याय मिळवून देणार - सचिन अहिर

**लोणावळा** : असंघटित कामगार आज ग्रॅच्युइटी, भविष्य निर्वाह निधी आणि आरोग्याच्या सुविधांपासून वंचित आहेत. त्यांच्यापैकी ९६ टक्के कामगारांना किमान वेतनही धड मिळत नाही. त्यामुळे या असंघटित क्षेत्रातील शोषित कामगारांना न्याय मिळवून देण्याचे काम हाती घ्यावे लागेल. त्यासाठी आवश्यक तो लढा उभारू, अशी ग्वाही शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) उपनेते, आमदार सचिन अहिर यांनी दिली.

भारतीय कामगार सेनेशी संलग्न असलेल्या महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय कामगार संघाच्या अधिपत्य अंतर्गत असलेले कारखाने आणि आस्थापनाच्या कामगारांच्या विविध प्रतिनिधींचे दोनदिवसीय संमेलन सचिन अहिर यांच्या नेतृत्वाखाली नुकतेच लोणावळा येथे पार पडले. त्याप्रसंगी बोलताना असंघटित क्षेत्रातील कामगारांना न्याय मिळवून देण्याची भूमिका त्यांनी मांडली.

आज केवळ ४ टक्के कामगार संघटित असून त्यांनाच सामाजिक सुरक्षितता आणि आरोग्यविषयक हक्क कायद्याने मिळत आहेत. उर्वरित ९६ टक्के कामगार असुरक्षिततेचे जीवन जगत आहेत. त्यांना संघटित करण्यासाठी संघटित क्षेत्रातील कामगार कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला पाहिजे अशी अपेक्षाही सचिन अहिर यांनी व्यक्त केली. कामगार चळवळीचे प्रश्न तसेच यापुढील काळात कामगारांच्या विविध प्रश्नांवर कार्य करण्याचा निर्धार त्यांनी कार्यकर्त्यांना दिला.

या संमेलनात युनियनचे सरचिटणीस गोविंदराव मोहिते यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यकर्ता संमेलनाला मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण, अंबरनाथ, रायगड, रत्नागिरी, पुणे, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर आदी ठिकाणाहून १७५ युनियन प्रतिनिधी उपस्थित होते. दरम्यान, पहिल्या दिवशी झालेल्या प्रशिक्षण शिबिरात अरविंद श्रोत्री, राजेंद्र गिरी, केंद्रीय कामगार शिक्षण केंद्राचे शिक्षणाधिकारी चंद्रकांत जगताप, चंदन कुमार या तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. यावेळी आंबेकर श्रम संशोधन संस्थेचे संचालक जी. बी. गावडे, राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या शिक्षण विभागाचे प्रमुख-उपाध्यक्ष बजरंग चव्हाण, उपाध्यक्ष राजन लाड, माजी नगरसेवक सुनील अहिर, संजय कदम, मिलिंद तांबडे, उत्तम गीते, अण्णा शिर्सेकर, निवृत्ती देसाई, शिवाजी काळे, साई निकम, किशोर रहाटे, आवधानी पांडे, बाळा सावर्डेकर, ईश्वर वाघ, वाहतूक संघटना प्रमुख सुनील बोरकर, लोणावळ्याचे माजी नगराध्यक्ष राजू गवळी, पुणे जिल्हा सल्लागार बबनराव भेगडे, माझगाव डॉक वर्कर्स युनियनचे दीपक यादव, अ‍ॅड. नितीन भवर, मन:शांती केंद्राच्या स्वाती आलुरकर तसेच विविध मान्यवर मंडळी उपस्थित होती.

## ‘समग्र शिक्षा’तील कर्मचारी कायम करा

**मुंबई** : समग्र शिक्षा कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत कायम करावे व सातव्या वेतन आयोगानुसार वेतन मिळावे, अशी मागणी राष्ट्रीय मूल निवासी बहुजन कर्मचारी संघ संलग्न प्रोटान विंग राज्य अध्यक्ष डॉ. संजय धावर्डे यांनी राज्य शासनाकडे केली आहे.

या योजनेत कंत्राटी तत्त्वावर राज्यात ६५०० कर्मचारी काम करीत आहेत, तर पालिका व शिक्षण उपसंचालक मुंबई येथे १५० कर्मचारी कार्यरत आहेत. यामध्ये सहायक कार्यक्रमाधिकारी, प्रोग्रामर, लेखा लिपिक, समावेशित शिक्षण विशेष शिक्षक अशा पदांवर काम करीत आहेत.

# असंघटीत कामगारांसाठी स्वतंत्र महामंडळ

सामाजिक सुरक्षा आणि कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी असंघटीत कामगार कल्याण महामंडळ आणि त्याच्या अंतर्गत व्यवसाय, उद्योग क्षेत्रनिहाय ३९ आभासी मंडळे स्थापन करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

असंघटीत कामगारांची संख्या मोठी आहे. अशा कामगारांसाठी उद्योग व व्यवसाय निहाय वेगवेगळी कामगार कल्याणकारी मंडळे स्थापन करण्याची मागणी होत असते. या सर्व कामगारांना सामाजिक सुरक्षा व कल्याणकारी योजना मिळाव्यात यासाठी त्यांची नोंदणी व त्यांच्या कल्याणकारी योजना राबविण्याकरिता, निधीची तरतूद व त्यांचे वितरण करण्याकरिता महामंडळ स्थापन करण्याची गरज होती. त्यानुसार हे महामंडळ ३९ उद्योग व ३४० व्यवसायांतील कामगारांसाठी काम करेल. यासाठी ३९ आभासी मंडळे तयारी केली जातील.

यासाठी नियामक मंडळ व कार्यकारी मंडळ असेल. नियामक मंडळाचे मुख्यमंत्री अध्यक्ष व उपमुख्यमंत्री उपाध्यक्ष असतील. तर कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष कामगार मंत्री असतील. असंघटीत कामगार कल्याण महामंडळाचे सर्वसमावेशक पोर्टल तयार करण्यात येईल. या पोर्टलद्वारेच ३९ आभासी मंडळ आणि त्यातील व्यवसाय निहाय कामगारांची नोंदणी केली जाईल.

महाराष्ट्र राज्य असंघटित कामगार कल्याण महामंडळाने सुचविलेल्या योजना तसेच आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने सुचविलेल्या विविध ९ विशेष क्षेत्रांमधील योजना राबविण्यात येतील. त्यातील कामगारांच्या पाल्यांसाठी विशेष शैक्षणिक अर्थसहाय्य, महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेत समावेश नसलेल्या आजारांसाठी आरोग्य विमा योजना, गृहकर्ज योजना, आपत्ती काळातील अर्थसहाय्य अन्य सामाजिक सुरक्षा योजना यात समाविष्ट असतील.

## ‘श्रमजीवी’चे आंदोलन

**पालघर** : जिल्हा आरोग्य विभाग तसेच जिल्हा शल्यचिकित्सक विभागाअंतर्गत कार्यरत असणाऱ्या १०२ कंत्राटी वाहनचालकांना तीन महिन्यांपासून, तर ४८ सफाई कर्मचाऱ्यांना मागील ११ महिन्यांपासून कंत्राटदाराने वेतन न दिल्याने श्रमजीवी कामगार रयत संघटनेतर्फे जिल्हाधिकारी कार्यालयात आंदोलन करण्यात आले.वेतन देण्यासाठी निर्माण झालेल्या अडचणींबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून हा प्रश्न तातडीने सोडवण्याचे आश्वासन देण्यात आले. रुग्णवाहिका चालकांना १२ हजार २८४ रुपयांचे वेतन निश्चित असताना, कंत्राटदार फक्त १० हजार रुपये देत असल्याची तक्रारही आंदोलकांनी केली.

# ऊसतोड कामगारप्रश्नी नोडल एजन्सीचे निर्देश



**मुंबई** : मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागातील स्थलांतरित कामगारांच्या समस्यांवर उच्च न्यायालयाने कान उपटल्यानंतर अखेर राज्य सरकारने नमती भूमिका घेत ऊसतोड कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलू, अशी हमी घेतली. तसे प्रतिज्ञापत्रच न्यायालयात सादर केले. त्याची प्रभारी मुख्य न्यायमूर्ती नितीन जामदार आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने दखल घेत ऊसतोड कामगारांशी संबंधित विविध सरकारी यंत्रणांच्या भूमिका मांडण्यासाठी नोडल एजन्सी नेमण्याचे निर्देश राज्य सरकारला दिले.

दरम्यान, मराठवाडाच्या दुष्काळग्रस्त भागांतील मजुरांना राज्यातील पश्चिम महाराष्ट्रातील सांगली, कोल्हापूर, पुणे, सातारा, सोलापूर आणि अहमदनगर येथे स्थलांतरित व्हावे लागते. या मजुरांच्या आर्थिक आणि लैंगिक शोषणावर आधारित वृत्त दैनिकांत प्रसिद्ध झाले होते. वृत्तात स्थलांतरित कामगारांची होणारी परवड नमूद करण्यात आली होती. त्या वृत्ताची दखल घेत या भागांतील स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या समस्या सोडवण्यासाठी उच्च न्यायालयाने सुमोटो याचिका दाखल करून घेतली आहे. या याचिकेवर प्रभारी मुख्य न्यायमूर्ती नितीन जामदार आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. त्यावेळी राज्य सरकारतर्फे अ‍ॅड. जनरल बिरेंद्र सराफ यांनी प्रतिज्ञापत्र सादर केले. ऊसतोड कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचा दावा केला. स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या विविध गरजा ओळखून पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी, तसेच साखर उद्योग क्षेत्रातील या कामगारांची पिळवणूक रोखण्यासाठी सरकार उपाय-योजना राबवत आहे, असे सरकारने प्रतिज्ञापत्रात स्पष्ट केले. ऊसतोड कामगार हे साखर कारखान्याचे कामगार आहेत. संबंधित सर्व कायद्यांतर्गत संरक्षणाचे हक्कदार आहेत, असेही सरकारने प्रतिज्ञापत्राद्वारे मान्य केले.

सरकारच्या प्रतिज्ञापत्रातील विविध मुद्द्यांच्या अनुषंगाने ज्येष्ठ वकील मिहीर देसाई आणि अ‍ॅड. प्रज्ञा तळेकर यांनी प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी न्यायालयाकडे वेळ मागितला असून लवकरच ते सादर होईल. न्यायालयाने ही विनंती मान्य करत खंडपीठाने याचिकेची सुनावणी केली.

## महागाई भत्त्यात चार टक्के वाढ

**मुंबई** : राज्य शासनाच्या सेवेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ४ टक्के महागाई भत्ता वाढ देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. सदर वाढ १ जानेवारी २०२३ पासून लागू करण्यात आली असून, पाच महिन्यांच्या थकबाकीसह जूनच्या वेतनापासून देण्यात येणार आहे.

राज्य सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांना सध्या ३८ टक्के महागाई भत्ता मिळतो. त्यात ४ टक्क्यांनी वाढ करून तो आता ४२ टक्के करण्यात आला. १ जानेवारी २०२३ पासून ही वाढ लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार गेल्या पाच महिन्यांची थकबाकीही रोखीने देण्यात येणार आहे. वित्त विभागाने त्यासंबंधीचा शासन आदेश प्रसृत केला असून त्यानुसार कार्यवाही होत आहे.

# मुंबई शिक्षण मंडळ कार्यालयावर निदर्शने

**मुंबई** : परीक्षा कामाचे मानधन, शालार्थ क्रमांक प्रश्नी मुंबई विभागीय कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेने वाशी येथील मुंबई विभागीय शिक्षण मंडळाच्या कार्यालयासमोर निदर्शने केली. संघटनेचे सरचिटणीस प्रा. मुकुंद आंधळकर यांच्या नेतृत्वाखाली ही निदर्शने करण्यात आली. या निदर्शनात ठाणे, पालघर, रायगड व मुंबई जिल्ह्यातील सुमारे २०० हून अधिक शिक्षकांचा सहभाग होता. दरम्यान, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष नितीन उपासनी कार्यालयात उपलब्ध नव्हते. त्यामुळे सचिव डॉ. सुभाष बोरसे यांना संघटनेने निवेदन दिले.

बारावी परीक्षेच्या निकाला दिवशीच परीक्षेच्या कामाचे मानधन शिक्षकांना मिळत असलेले मानधन अद्याप देण्यात आले नाही, तसेच शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून मान्यता मिळालेल्या शिक्षकांना वेतन सुरु होण्यासाठी आवश्यक असलेला शालार्थ क्रमांक दिला नाही. यासाठी ही निदर्शने झाली. शिक्षकांचे काम झाल्यानंतरही त्यांना २ ते ३ महिन्यांनी मानधन दिले जाते. त्या थकबाकीची एकूण रक्कम सुमारे १ कोटी रुपये आहे. जमा झालेल्या फीच्या व्याजाची रक्कम केवळ शिक्षकांना दिली जाते. शिक्षकांना वेळेत शालार्थ क्रमांक मिळत नाहीत. त्यांना महिनोन्‌महिने वेतनासाठी झगडावे लागते. शिक्षकांची यादी संघटनेने अनेक वेळा मागूनही दिली जात नाही.

## प्राथमिक शिक्षक समितीतर्फे निवेदन

**मालेगाव** : जिल्हा परिषदेच्या अंतर्गत येणाऱ्या शिक्षकांच्या आंतरजिल्हा व जिल्ह्यांतर्गत बदली धोरण रद्द करण्याची शिफारस ग्रामविकास विभागाकडे राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने करण्यात आलेली आहे. बदली धोरणात अनेक तरतुदींचा विचार करता पूर्वीप्रमाणे बदली धोरण कायम ठेवावे अशी मागणी करण्यात आली.

ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषद शिक्षकांसाठी ७ एप्रिल २०२१ नुसार आंतरजिल्हा बदली धोरण निश्चित केले आहे. सन २०१७ पासून जिल्ह्यांतर्गत व आंतरजिल्हा बदलीची ऑनलाईन प्रक्रिया सुरू करून भ्रष्टाचार मुक्त पारदर्शक बदल्यांची कार्यवाही सुरू झाली आहे. त्यानुसार यापुढील काळात कार्यवाही होईल, अशी अपेक्षा यानिमित्ताने व्यक्त होत आहे.

शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांच्या आंतरविभागीय आंतरजिल्हा, जिल्ह्यांतर्गत बदल्या होत असताना जिल्हा परिषदेच्या शिक्षकांच्या बाबतीत बदली न करण्याचे धोरण अतार्किक व अनाकलनीय आहे अशी प्राथमिक शिक्षक समितीची ठाम धारणा आहे. शासनाने यासंदर्भातील निर्णय रद्द न केल्यास सनदशीर आंदोलन करण्याचा मार्ग पत्करला जाईल, यातून सरकारला लोकशाही मार्गाचा आदर करून न्याय द्यावा लागेल, मात्र जर शासन याच्याकडे दुर्लक्ष करत आहे, हे ध्यानात आले तर, यापुढील काळात मात्र, अधिक तीव्र स्वरुपाचे आंदोलन करावे लागेल आणि त्याची जबाबदारी ही शासनाची तसेच संबंधित प्रशासनाची राहिल, असा इशारादेखील विजय कोंबे व राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर व पदाधिकाऱ्यांनी याबाबत दिला आहे.

# तलाठी भरती प्रक्रियेत उभे ऑनलाइन विघ्न

**मुंबई** : राज्याच्या महसूल व वनविभागाकडून तलाठी भरती प्रक्रिया ही ऑनलाइन पध्दतीने होत असून त्यासंबंधातील अर्ज भरताना होणाऱ्या चुकीला सुधारण्याची वा दुरुस्त करण्याची सोय यात नसल्याने ही अर्ज प्रक्रिया उमेदवारांसाठी मोठी डोकेदुखी ठरली आहे. केवळ इतकेच नव्हे तर, यासंबंधात उपलब्ध असलेल्या हेल्पलाइन क्रमांकावर या सर्व उमेदवारांना कोणतीही मदत मिळत नसल्याच्या तक्रारी उमेदवार करीत आहेत.

ही तलाठी भरती प्रक्रिया टीसीएस कडून राबविण्यात येत असून अर्ज भरताना होणाऱ्या चुकीच्या दुरुस्तीची कोणतीही सुविधा उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

या त्रासाची महसूल विभागाकडून तत्काळ दखल घेतली जावी अन्यथा अनेक उमेदवार तलाठी भरतीच्या प्रक्रियेतूनच बाद होतील, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना अनेक वर्षांपासून तलाठी भरतीची प्रतीक्षा होती. अखेर राज्यांतील ४ हजार ६४४ जागांच्या भरतीची जाहिरात प्रसिद्ध झाली. अनेक वर्षांपासून परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी त्यामुळे सुखावले. परंतु अर्ज भरण्यामध्ये असणारी ही त्रुटी उमेदवारांना अस्वस्थ करणारी ठरली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाप्रमाणे राज्य शासनाने भरतीसाठी नियुक्त केलेल्या या कंपनीच्या माध्यमातून उमेदवारांना भरलेल्या अर्जात संभाव्य चूक दुरुस्त करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी विद्यार्थ्यांकडून केली जात आहे.

या संदर्भात काही उमेदवारांनी निवेदनेही महसूल मंत्र्यांना पाठवली असून अर्जातील लहान चुकांमुळे आपली संधी कशी हुकेल, याबद्दल माहिती दिली आहे. शिवाय हेल्पडेस्कवर तक्रार नोंदवल्यानंतर ‘तुम्हाला भरलेल्या अर्जात कोणतेही बदल करता येणार नाहीत, तसेच तुम्हाला प्रवेश शुल्क परत मिळणार नाही किंवा तुम्हांला प्रवेश मिळणार नाही’ असे उत्तर कळवित असल्याची तक्रारही केली आहे.

या सर्व प्रकारामुळे अनेक संकटांचा सामना करावा लागत असून त्वरित कार्यवाही व्हावी, अशी अपेक्षा उमेदवारांकडून व्यक्त होत आहे.

## सेवानिवृत्तांची बैठक

**यवतमाळ** : जिल्हा पेन्शनर वेल्फेअर असोसिएशनच्या कार्यकारिणीची सभा घेण्यात आली. सभेत सेवानिवृत्तांच्या विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली.

सभेच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे जिल्हाध्यक्ष हरिभाऊ राऊत होते. या बैठकीत, जिल्हा परिषद लवकरच आयोजित करणार असलेल्या पेन्शन अदालतसंदर्भात विचारविनिमय करण्यात आला. सभेला सेवानिवृत्त कर्मचारी उपस्थित होते. सभेत समस्यांचे निवारण करण्याच्या दृष्टिकोनातून चर्चा झाली. यापुढेही एकदिलाने संघर्ष करण्याचा निर्णय सर्वानुमते बैठकीत घेण्यात आला. संघटनेचे जिल्हाध्यक्ष हरिभाऊ राऊत यांनी सभेत प्रशासनाबरोबर आतापर्यंत झालेल्या चर्चेची माहिती दिली.

# केंद्र व राज्य कर्मचाऱ्यांची निदर्शने

**मुंबई** : केंद्र व राज्य सरकारचे प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी प्रत्येक केंद्र व राज्य सरकारच्या कार्यालयासमोर ३६ जिल्ह्यांतील प्रत्येक कार्यालयासमोर दुपारच्या वेळेत निदर्शने करण्यात आली. शासनाच्या वतीने वारंवार कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होत असून त्यांच्या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी ही निदर्शने करण्यात आली.

केंद्र, राज्य सरकारने या मागण्यांबाबत उदासीनता दर्शविल्यास जुलै अखेरपर्यंत देशव्यापी आंदोलनाची घोषणा केली जाईल, असे मध्यवर्ती संघटनेचे सरचिटणीस विश्वास काटकर यांनी सांगितले.

मार्चमध्ये सरकारी कर्मचारी व शिक्षकांनी त्यांच्या प्रलंबित मागण्या धसास लागाव्यात या उद्देशाने बेमुदत संप आंदोलन छेडले होते. या आंदोलनातील प्रमुख मागणी सर्वांना जुनी पेन्शन योजना पूर्वलक्षी प्रभावाने लागू करा ही होती. सर्व रिक्त पदे तत्काळ भरा, अनुकंपा तत्त्वावरील नियुक्त्या विनाअट करा, सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करा, मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचे पदोन्नती सत्र सुरू ठेवा, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १०:२०:३० ची सेवांतर्गत प्रगती योजना लागू करा, चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावा, कामगार कर्मचाऱ्यांच्या हक्कांचा संकोच करणारे कामगार कायद्यातील बदल रद्द करा, सरकारी विभागात खासगीकरण व कंत्राटीकरण धोरणास मज्जाव करा, नवीन शिक्षण धोरण रद्द करा यासारख्या प्रमुख मागण्या राज्य सरकारकडे प्रलंबित आहेत. केंद्र सरकारकडेही पीएफआरडीए कायदा रद्द करा, खासगीकरण धोरण थांबवा, नवीन शिक्षण धोरणाचा पुनर्विचार करा, भाववाढ रोखा अशा स्वरूपाच्या मागण्या प्रलंबित आहेत. याबाबत वारंवार संबंधित यंत्रणांकडून मागणी करून तसेच पाठपुरावा करूनदेखील योग्य प्रतिसाद मिळत नसल्यामुळे कामगार वर्गात प्रचंड नाराजीचे वातावरण दिसून येत आहे.

दरम्यान, प्रशासन या मागण्या कधी पूर्ण करणार याकडे कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे. जर मागण्यांची पूर्तता झाली नाही तर कर्मचाऱ्यांनी यापुढील काळात आपले आंदोलन तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# सिडकोचे कार्य आशियात सर्वोत्तम

**नवी मुंबई** : केंद्र व राज्य सरकारच्या अनेक प्राधिकरणात मी यापूर्वी सेवा दिली आहे. जेएनपीटी बंदर हे सिडको क्षेत्राजवळचे बंदर आहे. तेव्हापासून मी सिडकोचे काम पाहत असून सिडकोचे कार्य हे आशिया खंडात सर्वोत्तम असल्याचे प्रतिपादन सिडकोचे नवीन व्यवस्थापकीय संचालक अनिल डिग्गीकर यांनी केले. सिडको स्पोर्ट्‌स अ‍ॅन्ड कल्चरल असोशिएशन, सिडको आर्टिस्ट कम्बाईन आणि सिडको एम्प्लॉईज युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने वाशी येथील सिडकोच्या प्रर्दशन केंद्रात सिडको कर्मचारी व अधिकाऱ्यांचे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी डिग्गीकर यांनी हे गौरवोद्गार काढले.

सिडको स्थापनेला मार्चमध्ये ५३ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्याच महिन्यात होणारे स्नेहसंमेलन काही कारणास्तव जुलैमध्ये आयोजित करण्यात आले होते. मार्च महिन्यात सिडकोतील कर्मचाऱ्यांसाठी आयोजित विविध क्रीडा व कला स्पर्धा झाल्या. यावेळी सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक राजेश पाटील, मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे, सिडको कामगार संघटनेचे अध्यक्ष विनोद पाटील, सरचिटणीस जे. टी. पाटील आदी उपस्थित होते.

**‘कर्मचारी टाइम्स’ चे कार्यालयीन प्रतिनिधी**

१. भाऊसाहेब पठाण
२. सुरेश आहेरकर
३. अशोक शिंदे
४. छाया करे
५. रिध्दी कुबल
६. गुरुदत्त वाकदेकर
७. सुरेश चिकणे
८. कृष्णा भरडे

## वर्गणीदारांसाठी सूचना

१. **‘कर्मचारी टाइम्स’** अंकाची वर्षिक वर्गणी ३०० रुपये असून कोणत्याही महिन्यापासून वर्गणीदार होऊ शकता.
२. वर्गणी मनीऑर्डर, धनादेश, डिमांड ड्राफ्ट, ऑनलाईन किंवा युपीआयद्वारे स्वीकारली जाते. कार्यालयात प्रत्यक्ष रोख रक्कम भरूनही वर्गणीदार होता येते.
३. वर्गणी भरताना सोबत स्वत:चे नाव, पत्ता सुवाच्च अक्षरात नोंद करणे, ही वर्गणीदाराची जबाबदारी आहे.
४. मनीऑर्डर स्लीप भरताना त्यावर संपूर्ण नाव, पत्ता व संपर्क क्रमांक लिहावा.
५. **‘कर्मचारी टाइम्स’** कार्यालयात वर्गणी प्राप्त झाल्यानंतर उशीरात उशीरा २ महिन्यांच्या आत आपला अंक सुरु करण्यात येतो.
६. **‘कर्मचारी टाइम्स’** चे सर्व अंक दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात बहुधा १ तारखेलाच पोस्टात दिले जातात. तेव्हा १५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास १ तारखेपूर्वी स्थानिक टपाल कचेरीत तक्रार नोंदवून त्या तक्रार प्रतीसह **‘कर्मचारी टाइम्स’** कार्यालयास कळवावे. अंक पाठविण्यात येईल. तक्रारीत वर्गणीदार क्रमांक कळविणे आवश्यक आहे.
७. एक महिना उलटून गेल्यानंतर आलेल्या तक्रारी, टपाल कचेरीत तक्रार न नोंदविता आलेल्या तक्रारी, दूरध्वनीवरील तोंडी तक्रारी यांची नोंद घेतली जाणार नाही.
८. लेखी तक्रार नोंदवूनही दखल घेतली जात नाही, वारंवार कळवूनही पत्ता बदलला जात नाही, वर्गणीची मुदत संपण्यापूर्वी अंक बंद झाला, अशा स्वरुपाच्या तक्रारी आपण संपादकांकडे अवश्य करू शकता, त्याची दखल घेतली जाईल.
९. अर्धवट पत्त्यामुळे बऱ्याच वर्गणीदारांचे अंक परत येत असतात, यापुढे सलग तीन महिने अंक परत येतील, त्यांची वर्गणी संबंधित वर्गणीदार जोपर्यंत लेखी तक्रार नोंदवून पूर्ण पत्ता कळवत नाही, तोपर्यंत स्थगित ठेवण्यात येईल.
१०. **‘कर्मचारी टाइम्स’** चे अंक किरकोळ विक्रीसाठी **‘कर्मचारी टाइम्स’** कार्यालयात उपलब्ध असतात, याची नोंद घ्यावी.

**संपर्क** : राज्य सरकारी गट ‘ड’ (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, ९, नवीन प्रशासन भवन, तळ मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालयसमोर, मुंबई - ४०००३२.

**संपर्क** : ९८९०९१६५८८, ९८२१३७४६२६

**ईमेल** : karmacharitimes@gmail.com

**वेबसाईट** : www.karmacharitimes.com

## आवाहन

**‘कर्मचारी टाइम्स’** मध्ये सर्व संवर्गातील शासकीय अधिकारी, कर्मचारी यांची संबंधीची माहिती, बातम्या तसेच घडामोडी यांची माहिती प्रसिध्द करण्यात येते. त्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांच्या बातम्या, घडामोडी, लेख प्रसिद्धीसाठी पाठवावेत. जाहिरातीसाठी देखील आवाहन करण्यात येत आहे. **संपर्क संपादक : ‘कर्मचारी टाइम्स’, द्वारा राज्य सरकारी गट ‘ड’ (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, ९, नवीन प्रशासन भवन, तळ मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालयसमोर, मुंबई ४०००३२.भ्रमणध्वनी: ९८९०९१६५८८**

**ईमेल : karmacharitimes@gmail.com**

♦♦♦

# कर्मचाऱ्यांच्या वसाहतीवर वक्रदृष्टी

## वरिष्ठांसाठी पुनर्विकासात तीन बहुमजली इमारती उभारण्याचा घाट

**मुंबई** : सुमारे सहा महिन्यांपूर्वी तब्बल एक कोटी रुपये खर्चुन दुरुस्त केलेल्या नेव्ही नगर परिसरातील अफगाण चर्चजवळील कुलाबा उदंचन केंद्र कर्मचारी वसाहतीच्या जागी बहुमजली इमारती बांधण्याचा घाट मुंबई महानगरपालिकेने घातला आहे.

वसाहतीमध्ये वास्तव्यासाठी असलेल्या केंद्रीय कर्मचाऱ्यांना हुसकावून तेथे पालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी सर्व सुविधांनी युक्त अशा बहुमजली इमारती बांधण्याची तयारी सुरू आहे. या कर्मचाऱ्यांना तातडीने घर रिकामे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे याबाबत कर्मचारी वर्गामध्ये नाराजीचे वातावरण असून संबंधितांनी योग्य ती दखल घेऊन कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

मागील अनेक वर्षांपासून कुलाबा उदंचन केंद्र येथील कर्मचाऱ्यांच्या वसाहतीमध्ये मुंबई महानगरपालिकेतील १९ कर्मचारी कुटुंबांसह वास्तव्यास आहेत. या वसाहतीत एक मजली इमारत आणि दोन बैठ्या चाळींचा समावेश आहे. येथे वास्तव्यास असलेल्या कर्मचाऱ्यांची मुले याच परिसरातील शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. सहा महिन्यांपूर्वी प्रशासनाने या वसाहतीची एक कोटी रुपये खर्च करून दुरुस्ती केली. वसाहतीमधील सर्व खोल्यांमधील कोबा काढून त्या जागी पॉलिश लाद्या बसविण्यात आल्या. घरांचे दरवाजे, खिडक्या, त्यांची तावदाने, काचा बदलण्यात आल्या. इमारतीच्या भिंतींना आतून-बाहेरून सिमेंटचा गिलावा (प्लॅस्टरिंग) देण्यात आला. त्यानंतर इमारतींची रंगरंगोटी करण्यात आली. इतकेच नव्हे तर इमारतीमधील सांडपाणी वाहिनी बदलण्यात आली. दुरुस्तीअंती या इमारतीला उजाळा मिळाला आणि ती नवीकोरी बनली. मात्र प्रशासनाने आता या वसाहतीच्या जागी वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी बहुमजली इमारती बांधण्याचा घाट घातला आहे.

या वसाहतीच्या जागी सात मजली तीन इमारती बांधण्यात येणार आहेत. या इमारतींमध्ये तीन-चार शयनगृह असलेल्या सदनिकांचा समावेश आहे. इतकेच नव्हे तर अतिवरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी या इमारतींमध्ये तीन चार ड्युप्लेक्स सदनिका बांधण्यात येणार आहेत. या वसाहतीच्या पुनर्विकासासाठी मुंबई मनपाने निविदा मागविल्या होत्या. सदर निविदांमध्ये बहुमजली इमारतींच्या बांधकामासाठी ६३ कोटी ८ लाख रुपये खर्च अंदाजित केला होता. या कामासाठी ११ टक्के अधिक दराने निविदा सादर करणाऱ्या कंत्राटदाराला महानगरपालिकेने इमारतींच्या बांधकामाचे ७० कोटी १ लाख ९० हजार रुपयांचे कंत्राट दिले आहे.

दरम्यान, या वसाहतीमधील कर्मचाऱ्यांना शक्य तितक्या तातडीने निवासस्थान रिकामे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या कर्मचाऱ्यांना कुलाब्यातील गेट वे ऑफ इंडियाजवळील मेरी वेदर उदंचन केंद्राजवळील एका वसतिस्थानात पर्यायी जागा देण्यात येणार आहे. मात्र ही इमारत गेली २० वर्षे बंद होती. त्यामुळे या इमारतीच्या डागडुजीचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले आहे. साधारण २० वर्षांपूर्वी या वसतिस्थानात पालिकेचे काही कर्मचारी वास्तव्यास होते. परंतु त्यापैकी काहींच्या नातेवाईकांनी घरातच आत्महत्या केली. त्यामुळे या इमारतीत कुणीही राहायला तयार नव्हते. परिणामी, गेली २० वर्षे ही इमारत रिकामीच होती. या इमारतीचा पुरातन वारसा वास्तूंच्या यादीत समावेश आहे. मात्र भीतीपोटी आजही या इमारतीत वास्तव्यास जाण्यास कुणीच तयार नाही. असे असतानाही अफगाण चर्चजवळील वसाहतीतील कर्मचाऱ्यांची तेथे पाठवणी करण्याचा अट्टहास प्रशासन करीत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

दरम्यान, याबाबत वेळीच योग्य ती कार्यवाही करून कर्मचाऱ्यांना दिलासा द्यावा तसेच त्यांच्यात कुठलीही भीती राहणार नाही, याकडे लक्ष देण्याची गरज कर्मचारी वर्गाकडून व्यक्त होत आहे.

# तांत्रिक कारणाने पेन्शन नाकारता येणार नाही

**मुंबई** : पेन्शन हा सरकारी कर्मचाऱ्यांना दिलेला एक मौल्यवान अधिकार आहे. तांत्रिक कारणावरून हा अधिकार नाकारता येणार नाही, असे स्पष्ट करत मुंबई हायकोर्टाने पुण्यातील फार्मसी कॉलेजच्या प्राध्यापकाला मोठा दिलासा दिला.

निवृत्तिवेतनाचा लाभ हा सरकारी कर्मचाऱ्यांचा महत्त्वपूर्ण अधिकार आहे. निवृत्तीनंतरही सन्मानाने कर्मचाऱ्यांना जगता यावे यासाठी केलेली ती सामाजिक कल्याणाची तरतूद आहे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. त्याचबरोबर त्यांच्या न्याय्य हक्काबाबत त्यांच्यावर कधीही अन्याय होऊ नये, अशी अपेक्षा सर्वसाधारणपणे कामगारांची असते, हेही यानिमित्ताने न्यायालयाच्या ध्यानात आणण्यात आले.

न्यायमूर्ती गौतम पटेल आणि न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठाने त्या प्राध्यापकाच्या सेवेतील तफावत दूर करा आणि सेवानिवृत्तीचे लाभ द्या, असे स्पष्ट निर्देश दिले. तांत्रिक अडचणींमुळे सेवानिवृत्तीच्या लाभांपासून वंचित ठेवले जात असल्याचा आरोप करून पुण्यातील फार्मसी कॉलेजचे प्राध्यापक डॉ. प्रदीप नलावडे यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. या याचिकेवर न्यायमूर्ती गौतम पटेल आणि न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी याचिकाकर्त्याच्या वतीने ज्येष्ठ वकील अॅड. नरेंद्र बांदिवडेकर, तर प्रतिवादी कॉलेजतर्फे अॅड. महिंद्र देशमुख आणि राज्य सरकारतर्फे अतिरिक्त सरकारी वकील व्ही. एम. माळी यांनी बाजू मांडली.

खंडपीठाने सर्व बाजू ऐकून घेतल्यानंतर सरकारी कर्मचाऱ्यांचा पेन्शनवर असलेला मौल्यवान अधिकार अधोरेखित केला. पात्रता सेवेची गणना करण्यात तंत्रशिक्षण संचालनालयाने स्पष्टपणे चूक केली आहे. प्राध्यापकाला चुकीच्या पद्धतीने अपात्र ठरवून सेवानिवृत्तीच्या लाभांपासून वंचित ठेवले, असे ताशेरे ओढतानाच याचिकाकर्त्या प्राध्यापकाच्या सेवेतील तफावत दूर करा आणि सेवानिवृत्तीचे लाभ द्या, असे निर्देश खंडपीठाने दिले.

तसेच पुण्यातील पूनम औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयातील सहायक प्राध्यापकाला तो पात्र असलेल्या निवृत्तिवेतनाचा लाभ देण्याचे आदेश दिले. सेवानिवृत्ती लाभातील तफावत दूर करण्याची मागणीही यावेळी खंडपीठाने मान्य केली आणि खंडपीठाने पेन्शनवरचा कर्मचाऱ्यांचा अधिकार अधोरेखित केला.


# सफाई कामगारांसाठी स्वतंत्र बोर्डाची मागणी

**मुंबादेवी** : सफाई कर्मचारी वर्गासाठी माथाडी बोर्डाच्या धर्तीवर सफाई कामगारांसाठी स्वतंत्र बोर्ड स्थापन करावे, अशी मागणी युनायटेड रिपब्लिकन पार्टीने केली आहे.

सफाई कामगार हा महत्वाचा सामाजिक घटक आहे. त्यांना न्याय मिळावा तसेच त्यांचे जीवनमान उंचावले पाहिजे. येत्या अधिवेशनात याबाबतचे बिल पारित करून बोर्ड स्थापन करण्यात यावे, या मागणीकरिता २७ जुलैला जेलभरो आंदोलनाची हाक देण्यात आल्याची माहिती युनायटेड रिपब्लिकन पार्टीचे अध्यक्ष तानसेन नावरे यांनी दिली. त्यावेळी त्यांच्यासोबत नितीन मोरे, ईश्वरसिंग झंझोटोह, आनंद निरभवणे, जीवन आलेराव, शाम वाडेकर आणि विश्वनाथ कांबळे उपस्थित होते.

# शासकीय कार्यालयांत लठ्ठ कर्मचारी किती?

**मुंबई** : गेल्या काही महिन्यांपासून वैद्यकीय शिक्षण विभागातर्फे आरोग्याच्या विविध समस्यांवरील जनजागृती अभियान सुरू करण्यात आले आहे. त्यामध्ये नागरिकांमध्ये वाढणारा लठ्ठपणा हासुद्धा विषय घेण्यात आला आहे.



यामुळे मार्च महिन्यापासून राज्यातील बहुतांश वैद्यकीय महाविद्यालयांत ओबेसिटी दवाखाना सुरू करण्यात आले आहे. यामध्ये नागरिकांमध्ये वाढत्या लठ्ठपणामुळे होणाऱ्या संभाव्य धोक्याची माहिती देण्यात येत असून वजन कमी करण्याचे उपाय सुचविले जात आहेत.

विदेश म्हणजे या कार्यक्रमाअंतर्गत मुंबईतील काही शासकीय कार्यालयांमध्ये जाऊन तेथील कर्मचाऱ्यांची तपासणी करण्यात आली, त्यामध्ये काही प्रमाणात कर्मचारी लठ्ठ असल्याचे दिसून आल्याचे या अभियानाचे समन्वयक यांनी सांगितले. लठ्ठपणामुळे आरोग्याच्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामध्ये प्रामुख्याने मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार, गुडघेदुखी या आजारांचा समावेश आहे. दैनंदिन जीवनशैलीत बदल करून लठ्ठपणाला वेळीच आळा घातला तर अनेक आजारांपासून प्रतिबंध करता येऊ शकतो, असे मत वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ सांगतात. एखादी व्यक्ती लठ्ठ आहे की नाही याची चाचपणी करण्यासाठी बॉडी मास इंडेक्स (बीएमआय) ही चाचणी केली जाते. राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांत सध्या या ओबेसिटी क्लिनिककरिता एक विशिष्ट दिवस आखण्यात आला असून, त्या दिवशी विशेष ओपीडी चालविली जाते.

कर्मचारी वर्गाला अनेकदा बौद्धिकतेशी संबंधित कामे करावी लागतात. त्याचबरोबर जागेवरच राहून कामे करावी लागत असल्यामुळे शारीरिक हालचाल कमी होत असते. अशा परिस्थितीत या कर्मचाऱ्यांना स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देणे अवघड होते. म्हणून अनेक व्याधी होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत त्यांच्यात जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. म्हणूनच हे अभियान कर्मचारी वर्गाला उपयोगी पडणार आहे.

# कर्मचाऱ्यांचा थकवा गंभीरपणे घ्या!

**मॉन्ट्रिअल** : कामगारांना सांभाळायचे असेल तर त्यांचा थकवा गंभीरपणे घ्या, अशी मागणी जागतिक पातळीवर होऊ लागली आहे. कॅनडात २०२३ मध्ये एक चतुर्थांश कर्मचाऱ्यांना थकल्यासारखे वाटत आहे. गेल्या वर्षभरात या थकव्यात आणि कंटाळ्यात कोणतीही घट झालेली नाही. पूर्ण ३६ टक्के कर्मचारी आता मागील वर्षाच्या तुलनेत अधिक थकलेले आहेत, असा दावा कॉन्कॉर्डिया विद्यापीठाचे प्राध्यापक क्लॉडीन मॅगेन यांनी केला आहे.

मॅगेन म्हणतात की, तुम्ही थकलेले नसाल, तर कदाचित तुम्ही काही काम हळूहळू थांबवले असेल. म्हणजे नोकरी टिकवण्यासाठी आवश्यक तेवढेच काम करत असाल.

# कामगार रुग्णालयात १४ ऑगस्टपासून ओपीडी

**मुंबई** : अंधेरी (पूर्व) एमआयडीसी येथील कामगार रुग्णालयाला १७ डिसेंबर २०१८ मध्ये आग लागली होती. या दुर्घटनेत १३ जणांचा मृत्यू झाला व १५० जण जखमी झाले होते. तेव्हापासून आजपर्यंत हे रुग्णालय बंदच आहे. मात्र, १४ ऑगस्टपासून पहिला टप्प्यात येथे ओपीडी सुरू केले जाणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य रुग्णसेवक व श्रमिक कामगार संघटनेचे राज्य सचिव भिमेश मुतुला यांनी याबाबत बोलताना दिली.




कामगारांच्या आरोग्याची हेळसांड होत असल्याने अंधेरीतील हे रुग्णालय लवकर सुरु करावे अशी मागणी मुतुला यांनी केंद्रीय श्रम व रोजगार मंत्री भूपेंद्र यादव व आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री भारती पवार यांनी केली होती. केंद्रीय कामगार मंत्री यादव यांनी हे हॉस्पिटल लवकर सुरू होण्या-साठी जातीने लक्ष घातले. २९ जुलै, ११ जानेवारी, २१ फेब्रुवारी, ३ मार्च रोजी त्यांनी हॉस्पिटलचे काम सुरू करण्यासाठी नॅशनल बिल्डींग कंस्ट्रक्शन कॉर्पोरेशन लिमिटेड (एनबीसीसी) सोबत आढावा बैठका घेतल्या. एनबीसीसीने कार्यादेश दिल्याने ओपीडीतील काम तीन महिन्यांत पूर्ण केले .

# खासगी शाळांमुळे शिक्षक पदे रिक्त


**अहमदनगर** : राज्यातील सर्व क्षेत्रामध्ये गुरूपौर्णिमेचा उत्सव साजरा करण्यात आला. परंतु विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी शिक्षकच नसल्याचा प्रकार महाराष्ट्रात सुरू आहे. राज्यात कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत नेमक्या परिस्थितीबाबत आत्मपरीक्षण आणि त्यानुसार अंमलबजावणी करण्याची मागणी केली जात आहे.

शिक्षण विभागात रिक्त पदांची संख्या मोठी आहे. शिक्षक पदे रिक्त असल्याने जिल्हा परिषदेच्या पटसंख्येवर परिणाम होऊ लागला आहे. हे विद्यार्थी खासगी शाळांची वाट धरू लागले आहेत. खासगी शाळांमुळे आता शासकीय शाळांची अवस्था बिकट होऊ लागली आहे. त्याचा परिणाम विद्यार्थी संख्येवर होत आहे.

# सिडकोच्या कर्मचाऱ्यांची 'दिवाळी'

## कर्मचाऱ्यांना २१ हजार रुपये रोख स्नेहसंमेलन भत्ता

**नवी मुंबई** : राज्यातील श्रीमंत महामंडळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिडकोतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची या महिन्यात दिवाळी साजरी झाली आहे. यंदा ५४ व्या वर्षात पदार्पण केलेल्या सिडकोच्या कर्मचाऱ्यांसाठी सात जुलै रोजी वाशी येथील प्रदर्शन केंद्रात स्नेहसंमेलन आयोजित केले होते. त्यापूर्वी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्नेहसंमेलन भत्ता म्हणून २१ हजार रुपये रोख रक्कम देण्यात आले.



यापूर्वी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना स्नेहभेट दिली जात होती. मात्र, माजी व्यवस्थापकीय संचालक संजय भाटिया यांच्या संकल्पनेनुसार स्नेहभेट ऐवजी रोख रक्कम देण्याची पध्दत सुरु करण्यात आली असून या रकमेतून कर्मचाऱ्यांनी आपल्या पाल्यांच्या भविष्यासाठी एखाद्या गुंतवणूक योजनेत ह्या बोनस रकमेची गुंतवणूक करावी असे अभिप्रेत आहे. राज्यात अशा प्रकारची स्नेहसंमेलन निधी देण्याची सुरुवात करणारी सिडको पहिली संस्था आहे.

सिडकोच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगामुळे चांगला पगार मिळत आहे. याशिवाय अनेक सेवा सुविधा आहेत. यात गृहयोजना आणि वैद्यकीय सुविधा महत्त्वाची मानली जात आहे. सिडको कर्मचारी-अधिकाऱ्यांना त्यांच्या कुटुंब विस्तारानुसार एक किंवा दोन घरांची सुविधा मिळत आहे. याशिवाय दिवाळीत सानुग्रह अनुदान दिले जात आहे.

विविध क्रीडा प्रकारांच्या स्पर्धा पार पाडल्या. वाशी येथील प्रदर्शन केंद्रात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे भव्य स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे या स्नेहसंमेलनामध्ये हिरीरीने सहभाग नोंदवला.

जून १९९५ मध्ये सुरु झालेली स्नेहसंमेलन भेट माजी कामगार संघटनेचे अध्यक्ष श्याम म्हात्रे यांच्या काळात काही कारणास्तव बंद झाली होती. त्यानंतर ही योजना २००५ मध्ये सुरु करण्यात कामगार संघटनेला पुन्हा यश आले. आठ वर्षांपूर्वी सिडकोचे माजी व्यवस्थापकीय संचालक संजय भाटिया यांनी ही भेट रोख रकमेत सुरु करताना ही रक्कम पाल्यांच्या भविष्यासाठी केंद्र सरकारच्या योजनेत गुंतवणूक करण्याचा सल्ला दिला होता. भाटिया यांच्या या सल्ल्यावर किती कर्मचारी अंमलबजावणी करतात, याची नोंद नाही.

# प्रशासनाची दिरंगाई

## शेतकरीच कारभारी

**वरुड** : तालुक्यातील मोरचूद येथे साठवण बंधाऱ्याचे काम पूर्ण होऊन पाच वर्षे झाली आहेत. तेव्हापासून या बंधाऱ्याला कोणत्याही प्रकारचा निधी अथवा मदत मिळालेली नाही तसेच कोणताही अधिकारी त्याची पाहणी सोडा, फिरकूनही पाहत नाही. या बंधाऱ्याच्या दरवाज्याला पाट्या लावणे आणि काढण्याची कामे शेतकरी स्वखर्चाने करतात. निधीची मागणी करतांच जलसंपदा विभाग उडवाउडवीची उत्तरे देत असल्याने शेतकऱ्यांनी आता आंदोलनाचा इशारा दिला आहे.

तालुक्यातील मोरचूद येथे साठवण बंधाऱ्याचे काम पूर्ण होऊन पाच वर्षे झाली. तेव्हापासून या बंधाऱ्याला कोणताही निधी अथवा मदत मिळालेली नाही. कोणताही अधिकारी त्याची पाहणी करण्यास आलेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनीच स्वखर्चाने या बंधाऱ्यांची देखभाल सुरू केली आहे.

# एसटी कर्मचारी वसाहतीची पडझड

**ठाणे** : राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचारी वसाहतीमधील तीन घरांची पावसामुळे पडझड झाल्याची धक्कादायक बाब उघड झाली आहे. वंदना बसस्थानकजवळील वसाहतीत तीन सदनिकांच्या छताचे प्लास्टर कोसळले. वसाहतीतील इमारती जीर्ण झाल्या असून धोकादायक स्थितीत असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांनी केला असून त्वरित याबाबत कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

उल्हासनगर आणि भिवंडी शहरांमध्ये धोकादायक इमारती कोसळून रहिवाशांना जीव गमवावा लागल्याच्या घटना जिल्ह्यात घडल्या आहेत. पावसाळापूर्व आढावा बैठकीतही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई महानगर क्षेत्रातील सर्व धोकादायक इमारतींचे स्थापत्य संरचना लेखापरीक्षण करण्याच्या सूचना दिल्या होत्या. तर उल्हासनगर येथील सर्व अनधिकृत धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाचे धोरण नुकतेच जाहीर केले होते. दुसरीकडे सरकारी कर्मचाऱ्यांच्या वसाहतीकडे सरकारचे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. ठाणे शहराच्या पश्चिम भागात वंदना बसस्थानक आहे. या बस स्थानकाजवळच राज्य परिवहन मंडळाच्या कर्मचाऱ्यांची वसाहत आहे. या वसाहतींमधील आठ इमारतींत सुमारे ५० ते ६० कुटुंबे वास्तव्यास आहेत. सर्वच इमारतीची दुरवस्था झाली आहे. इमारतीला बाहेरून मोठे तडे गेले आहेत. अनेक ठिकाणी प्लास्टर निघाले आहे. खोल्यांमध्ये काही ठिकाणी पावसाचे पाणी गळत आहे. वसाहतीमधील एच विंगमधील तळमजल्यावरील दोन घरांचा आणि पहिल्या मजल्यावरील एका सदनिकेचा त्यात समावेश आहे. तर यातील नुकत्याच झालेल्या एका पडझडीच्या घटनेत दोन लहान मुली थोडक्यात बचावल्या आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

या वसाहतीचे नियमित स्वरूपात संरचनात्मक लेखा परीक्षण केले जात नाही. येथील रहिवाशांकडून इमारतीच्या पडझडीच्या तक्रार आल्यावरच येथील संरचनात्मक लेखा परीक्षण तेव्हाच केले जात असल्याची कबुलीच खुद्द वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे.

या वसाहतीत पडझड झाल्याची कोणतीही माहिती वा तक्रार आलेली नाही. रहिवाशांच्या तक्रारीनुसार दुरुस्तीचे काम करू दिले जाते. रहिवाशांची लेखी स्वरूपात तक्रार आल्यास दुरुस्तीचे काम केले जाईल असे विलास राठोड, विभाग नियंत्रक, राज्य परिवहन मंडळ, ठाणे विभाग यांनी सांगितले.

याबाबत संबंधित विभागाच्या लक्षात आणून देखील ही बाब गंभीरपणे घेतली जात नाही. त्याचबरोबर त्यावरील उपाययोजना देखील होत नाही. त्यामुळे रहिवाशांमध्ये सदैव भीतीचे वातावरण राहिले आहे. उद्या काही दुर्घटना झाली तर आपल्या जीवाचे काहीही होऊ शकते, त्यानंतर उपाय करून काहीही उपयोग नाही. म्हणूनच वेळीच योग्य ती कार्यवाही व्हावी, अशी मागणी इथे राहणाऱ्या कर्मचाऱ्यांनी सातत्याने केली आहे.

दरम्यान, याविषयी तसेच सातत्याने घडत असलेल्या पडझडीच्या घटनांमध्ये कर्मचारी तक्रार करण्यासाठी गेल्यास त्यांना वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून उडवाउडवीची उत्तरे मिळत असल्याची माहिती काही रहिवाशांनी दिली आहे. तर वसाहतीमधील सर्व नागरिक घाबरून राहत आहेत. भविष्यात कोणतीही दुर्घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण, असा संतप्त सवाल येथील रहिवाशांकडून उपस्थित केला जात आहे.

# निवृत्त कर्मचाऱ्यांच्या आठवणींसाठी सहकाऱ्यांचे वटवृक्ष रोपण

**मुंबई** : मुंबई महानगर पालिकेच्या एल विभागातील साकीनाका परिरक्षण चौकी येथील कामगार मायावन कलीयान यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी त्यांचा सत्कार केला. या सोहळ्यात त्यांनी दिलेल्या सेवेची आठवण राहावी, म्हणून चौकीच्या परिसरात त्यांच्या हस्ते त्यांच्या नावाची आणि सेवेची माहिती असलेला फलक लावून वटवृक्षाचे एक छान रोपटे लावण्यात आले.

या रोपट्याचे पालकत्व चौकीतील अधिकारी व कामगारांनी घेतले आहे. मायावन यांनी वेळ काळाची पर्वा न करता ४० वर्षे पालिकेत सेवा दिली. बंदिस्त पर्जन्य जलवाहिनीची सफाई व चोक काढण्याचे काम निस्पृहपणे केले. मोहिली परिसरातील नागरिकांनीदेखील त्यांच्या साधेपणाची व उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन वेळोवेळी त्यांचा सत्कार केला. त्यांच्या या कार्याचा वटवृक्ष लावून आणि त्याची जोपासना करून सर्व पालिका कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्याची आठवण करून देत राहणार आहे. या उपक्रमांबद्दल विविध सामाजिक घटकांकडून स्वागत होत आहे.

# आयटीआयमधील कंत्राटी कर्मचाऱ्यांना दिलासा

**मुंबई** : महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी व तिसरी पाळी आणि उर्वरित औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी पाळी ऑगस्ट २०१० सत्रापासून एकूण १५०० कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत.

या कर्मचाऱ्यांना नियमित करण्याबाबत सातत्याने मागणी करण्यात येत होती, त्या पार्श्वभूमीवर कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाकडून समितीची नियुक्ती करण्यात आली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी विभागाचे मंत्री असणार आहेत. समितीत एकूण आठ सदस्य असतील.

# कामगारांना अर्थसाहाय्य

**छत्रपती संभाजीनगर** : कामगार कल्याण मंडळाच्या वतीने कामगारांच्या पाल्यांना आरोग्य तसेच शैक्षणिक स्वरूपाची शिष्यवृत्ती अभ्यासक्रमानुसार निधी उपलब्ध करून दिला जातो. किरकोळ आजारावर दवाखान्यात उपचार होतातच, परंतु गंभीर, दुर्धर आजाराग्रस्ती कामगार कल्याण मंडळ कामगारांच्या पाठीशी राहते. मराठवाड्यात अशा १११ जणांना २५ लाखांची मदत कामगार कल्याण मंडळाकडून देण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगरला ५२, नांदेडला ३२, लातूरमध्ये २७, कामगारांनी गंभीर आजार सहाय्यता योजनेचा लाभ घेतला आहे. त्यांना विभागीय कामगार कल्याण मंडळाकडून भरीव अर्थसहाय्य दिले आहे. सर्वसाधारण शिष्यवृत्ती, क्रीडा शिष्यवृत्ती, परदेशी शिष्यवृत्ती, पाठ्यपुस्तक योजना, तसेच एमएससीआयटी योजनांचाही समावेश आहे. हृदयरोग आजारात अँन्जिओप्लास्टी, किडनी ट्रान्सप्लांट, कर्करोग इत्यादीतही मदत मिळते.

कर्मचारी योगेश कवले म्हणाले, कामगारांच्या उपचाराचा निधी कामगार कल्याण मंडळाने दिल्याने आजारात उपचार झाले असून, कामगारांना आधार मिळाला आहे.

# १९ पोलीस निरीक्षकांची विनंती बदली

**मुंबई** : राज्य पोलीस दलात कार्यरत १९ पोलीस निरीक्षकांच्या विनंती बदल्या करण्यात आल्या आहेत. अस्थापना विभागाचे अप्पर पोलीस महासंचालक संजीव-कुमार सिंघल यांनी बदल्यांचे आदेश जारी केले.

यामध्ये, पोलीस निरीक्षक संग्रामसिंह पाटील यांची बुलढाणा, प्रवीणकुमार बांगर यांची धाराशिव, संजय बांगर यांची रायगड, सुनील पवार यांची मीरा - भाईंदर - वसई-विरार, दत्तात्रय गुंड यांची ठाणे शहर आणि ओमकांत चिंचोळकर यांची नांदेड येथे बदली झाली आहे.

# आरक्षितपदी महिला उमेदवारांच्या नियुक्तीबाबत लवकरच निर्णय

**मुंबई** : शासकीय नोकर भरतीमध्ये महिलांकरिता ३० टक्के आरक्षण आहे. या पदभरतीमध्ये महिलांच्या आरक्षित पदावर महिला उमेदवार न मिळाल्यास पुरुष उमेदवारांची भरती करण्यात येऊ नये याबाबत मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन महिला व बालविकास विभागाकडून लवकरच कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.

आमदार डॉ. भारती लव्हेकर यांनी महिला आरक्षणासंदर्भात उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेनुसार चर्चा करण्यासाठी आयोजित बैठकीत मंत्री श्री. लोढा बोलत होते. मंत्री श्री. लोढा म्हणाले की, महिला व बालविकास विभागाकडून महिलांच्या आरक्षित पदावर महिला उमेदवार न मिळाल्यास पुरुष उमेदवारांची भरती करण्यात येऊ नये याबाबत मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याबाबत लवकरच कार्यवाही करण्यात येईल.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने जारी करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार महिला व बालविकास विभागाने ही कार्यवाही करावी, असे निर्देश त्यांनी दिले.




# आनंदाचे प्रमाण मोजणारी कंपनी

तीन वर्षांपूर्वी, स्पिंकलरने एम्प्लॉई डिलाईट अॅश्युरन्स प्रोग्राम (ईडीएपी) नावाची एक अनोखी संकल्पना सादर केली, जी तिच्या कर्मचाऱ्यांच्या आनंदावर लक्ष केंद्रित करते. कंपनीच्या युनिफाइड एचआरएमएस पोर्टल 'वर्कडे' मध्ये व्यवस्थापक आणि कर्मचारी यांच्यात दर तिमाहीत ईडीएपी आयोजित केले जाते.

कर्मचाऱ्यांच्या आनंदा-सारखा अत्यंत व्यक्तिनिष्ठ पैलू मोजता येतो का? सर्वेक्षणांवर आधारित काही संस्थांनी एकतर्फी गुणांकीत केलेले हे आनंद निर्देशांक असले तरी, कंपन्यांनी कर्मचाऱ्यांचा आनंद कशामुळे होतो याबद्दल बोलण्यासाठी संभाषणाची सोय करणे दुर्मिळ आहे. स्पिंकलर ही एक अग्रगण्य ग्राहक अनुभव व्यवस्थापन कंपनी गेल्या तीन वर्षांपासून हा आनंद प्रकल्प राबवत आहे.

कंपनीच्या कर्मचाऱ्यांची एकूण संख्या ३,५११ आहे. त्यापैकी ८०६ अमेरिकेमध्ये आहेत आणि २,७०५ आंतरराष्ट्रीय स्तरावर आहेत, त्यापैकी १,९०८ भारतात आहेत. जागतिक स्तरावर, संस्थेतील महिला कर्मचाऱ्यांचा वाटा एकूण कर्मचाऱ्यांच्या ३१.५ टक्के आहे आणि कंपनीच्या मंडळात २५ टक्के महिला कार्यरत आहेत.

रोहित मुंजाल, सीएचआरआओ - एपीजे, स्पिंकलर, म्हणतात, ज्याप्रमाणे स्प्रिंकलरचा दृष्टिकोन आमच्या ग्राहकांना आनंदी बनवण्याचा आहे, तसाच आनंद आम्हांला आमच्या स्वतःच्या कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण करायचा आहे. अशाप्रकारे, तीन वर्षांपूर्वी, कंपनीने एक अनोखी संकल्पना मांडली, ज्याचे नाव आहे. एम्प्लॉई डिलाईट अॅश्युरन्स प्रोग्राम (ईडीएपी), जो यावर लक्ष केंद्रित करतो.

एक सुरक्षित, निर्णय-मुक्त क्षेत्र तयार करणे केवळ तेव्हाच शक्य आहे जेव्हा तुम्ही सकारात्मक हेतू गृहीत धरता आणि समोरची व्यक्ती काय विचार करत असेल आणि त्याला काय वाटत असेल याचा सखोल अभ्यास करता. आमचे सीईओ रॅगी थॉमस अनेकदा म्हणतात, स्वतःची खरी संस्कृती निर्माण करण्यासाठी, आम्ही 'आत्म्याला आत्म्याशी' जोडले पाहिजे. आम्ही कर्मचाऱ्यांचा आनंद एका निर्देशांकावरून मोजतो, ज्याला कर्मचारी आनंद निर्देशांक (ईएचआय) म्हणतात. दृष्टीकोन सोपा आहे - ऐका, शिका, कृती करा, मुंजाल पुढे म्हणतात.

कंपनीच्या युनिफाइड एचआरएमएस पोर्टल वर्कडे मधील व्यवस्थापक आणि कर्मचारी यांच्यात प्रत्येक तिमाहीत ईडीएपी आयोजित केले जाते. याचं वैशिष्ट्य असं आहे की, चर्चेत कर्मचाऱ्यांना आनंद कशामुळे मिळतो, कर्मचारी आणि वरिष्ठ व्यवस्थापन यांच्यातील विश्वास आणि सामंजस्य सुधारण्याच्या योजना यांचा समावेश होतो. जरी त्या चर्चेचा एक भाग लोक त्यांची उद्दिष्टे किंवा ध्येय कसे साध्य करत आहेत याबद्दल देखील असेल, तर ईडीएपीचा भाग म्हणून वापरलेले मेट्रिक्स कर्मचाऱ्यांचे मूल्यांकन करण्यासाठी औपचारिक उपाय नाहीत. हे केवळ कर्मचाऱ्यांसह सतत संपर्कात राहण्याची संधी म्हणून काम करते.

व्यवस्थापकाच्या अहवालाला गुणांकनापेक्षा जास्त महत्व आहे. मुंजाल पुढे म्हणतात, कर्मचाऱ्यांचे चिंतेचे कारण, त्यांना संस्थेत कसे वाटते आणि काय सुधारणा आवश्यक वाटतात यासारख्या गुणात्मक बाबींवर उघडपणे चर्चा केली जाते.

मुंजाल लक्ष वेधतात की, एक कर्मचारी नाखूष असू शकतो कारण त्याला/तिला कार्यक्षेत्राच्या पलीकडे अधिक काहीतरी करायचे आहे किंवा तो संघाला कमकुवत करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या समस्येशी संबंधित असू शकतो किंवा कर्मचारी ज्या वैयक्तिक बाबीशी झुंजत आहे, त्याच्याशी संबंधित असू शकतो. या चर्चा मुक्तपणे होत असल्याने, त्या चर्चांवर आधारित काही ठळक मुद्दे आणि त्या सामान्य समस्या ऐकण्याच्या मंचांमध्ये मांडल्या जातील आणि त्यावर उपाय केले जातील.

ईडीएपी संभाषण व्यवस्थापकास ऐकणाऱ्याच्या भूमिकेमध्ये ठेवते, त्याचे दस्तऐवज बनवते जेणेकरून त्यावर योग्य ती कार्यवाही करता येईल आणि त्यानंतर आम्ही कर्मचाऱ्यांकडे पुढील ईडीएपी (किंवा त्यापूर्वी) दरम्यान परत जाऊ. तसेच, कृतींवर नजर टाकल्यास मूर्त परिणाम दिसून येतात आणि प्रत्येक व्यवस्थापकाच्या स्तरावर प्रगतीचा मागोवा घेतला जातो.

याशिवाय, कंपनीकडे स्प्रिंकलर हॅपीअर प्रोग्राम देखील आहे, जो कर्मचाऱ्यांची वैयक्तिक उर्जा पातळी सर्व परिमाणांवर वाढवण्याचा २१ दिवसांचा कार्यक्रम आहे, मग तो शारीरिक, मानसिक, भावनिक किंवा आध्यात्मिक तसेच अनेक सूक्ष्म पद्धतींद्वारे तयार केला आहे.



बऱ्याच संस्थांमध्ये, संस्कृती आणि प्रतिभा संघ आणि व्यावसायिक नेतृत्व या चर्चेतून येणारे ट्रेंड समजून घेण्यासाठी खोलवर जातात आणि गरज पडल्यास हस्तक्षेप करतात, असेही मुंजाल नमूद करतात. ते पुढे म्हणतात की, व्यवस्थापक आणि व्यवसाय प्रमुख यांच्यामध्ये आवश्यक असलेले सर्वात महत्वाचे घटक तयार करण्यासाठी ईडीएपी हे एक शक्तिशाली साधन आहे, जे विश्वसनीय आहे. मागच्या तिमाहीच्या तुलनेत या प्रत्येक चर्चेवर प्रत्येक तिमाहीत येणाऱ्या व्यवस्थापकीय नेतृत्व कर्मचाऱ्यांसाठी एप्रिलच्या आसपास त्यांच्या कामगिरीचे पुनरावलोकन करते. गेल्या पाच वर्षांपासून, स्प्रिंकलर वार्षिक कामगिरी पुनरावलोकनावर अवलंबून नाही. असे का असे विचारले असता, मुंजाल म्हणतात, आम्ही वार्षिक कामगिरीच्या पुनरावलोकनावर विश्वास ठेवत नाही, कारण हा वेळेचा अपव्यय आहे. अनेक कंपन्या वर्षाच्या शेवटी कामगिरीचे पुनरावलोकन करण्याचा प्रयत्न करतात. फक्त वर्षाच्या शेवटीच का? ध्येयपूर्ती आणि त्याच्या अवरोधा विरुद्ध होत असलेल्या कामगिरीचे वर्षभर चर्चा व्हायला हवी.

मुंजाल म्हणतात की, बरेच लोक वार्षिक कार्यप्रदर्शन पुनरावलोकनांमध्ये गुणवत्ता चक्र वाढीसह गोंधळात टाकतात. स्प्रिंकलरमध्ये, कंपनी ज्या गुणवत्तेचे चक्र स्वीकारते ते कंपनीच्या एका विशिष्ठ वेळेच्या उद्दिष्टावर आणि बाजाराच्या एकूण परिस्थितीवर आधारित असते. आम्ही भूमिका आधारित संस्था आहोत. नोकरीचे मूल्य आणि कर्मचारी त्याच्या कामातून कोणते मूल्य निर्माण करत आहे, हे त्या व्यक्तीचे वेतन ठरवण्यासाठी पुरेसे आहे. जर कर्मचाऱ्यांनी त्यांना नेमून दिलेले लक्ष्य पूर्ण केले तर त्यांना दरवर्षी प्रोत्साहन मिळेल. विक्री विभागातील संघांसाठी, प्रोत्साहने त्रैमासिक दिली जातात. तसेच, जर कंपनीने चांगली कामगिरी केली तर कर्मचाऱ्यांना त्याचा फायदा मिळेल आणि ते त्यांच्या गुणांकनासाठी किंवा बोनससाठी त्याचा वापर करू शकतात. जर तुम्ही या गोष्टी उत्तमप्रकारे करत असाल, तर तुम्हाला वार्षिक कामगिरीच्या पुनरावलोकनांची गरज नाही, कारण वर्षाच्या शेवटी कार्य अहवाल तपासण्याचे कारणच उरणार नाही, असं मुंजाल आत्मविश्वासाने सांगतात.

भारतात, स्प्रिंकलरची गुंतवणूक प्रामुख्याने उत्पादन आणि अभियांत्रिकी क्षेत्रांमध्ये आहे. बेंगळुरू कार्यालया व्यतिरिक्त, कंपनीने नुकतेच गुरुग्राममध्ये त्यांचे नवीन संशोधन आणि विकास केंद्र सुरू केले आहे. नवीन कार्यालयातील गरज पूर्ण करण्यासाठी, कंपनीने गेल्या महिन्यात २०० कर्मचारी भरती केले आणि या वर्षाच्या अखेरपर्यंत पूर्ण-वेळ कर्मचारी म्हणून सुमारे ४०० जणांची नियुक्ती करण्याची योजना आहे.

मुंजाल म्हणतात, आमची संशोधन आणि विकासाची रणनीती म्हणजे जे लोक प्रामुख्याने महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून बाहेर पडत आहेत त्यांना कामावर रुजू करून घेणे. आमच्याकडे आमच्या प्रतिभा विकासाची लक्षणीय टक्केवारी आहे आणि आम्हाला विश्वास आहे की, हा आमच्यासाठी स्पर्धात्मक फायदा आहे.

मुंजाल म्हणतात, आम्ही नवीन प्रतिभांना कामावर घेऊन अनेक व्यवस्थापक तयार केले आहेत. शिक्षण आणि नेतृत्व कार्यक्रमांमध्ये ७०:२०:१० तत्त्वांचा अंतर्भाव करून कॅम्पस भाड्याने घेतो. आम्ही उच्च-कार्यक्षम वैयक्तिक योगदान कर्त्यांना नामांकित करतो आणि नंतर आम्ही त्यांना व्यवस्थापक होण्यासाठी तयार करतो.

अॅस्पायर उपक्रम उच्च-कार्यक्षम प्रतिभा विकसित करण्यासाठी स्प्रिंकलरच्या वचनबद्धतेला बळकटी देतो. कर्मचाऱ्यांना चार महिन्यांसाठी स्प्रिंकलर नेतृत्वासोबत काम करण्याची संधी दिली जाते. हे नाते कर्मचाऱ्यांच्या मनोबल वृद्धीसाठी आणि स्प्रिंकलरला उच्च आणि अधिक आव्हानात्मक भूमिकांमध्ये योगदान देण्यास मदत करण्यासाठी आहे.

गेल्या वर्षी, ११ देशांमधील प्रत्येक व्यवस्थापकाने प्रभावी नेतृत्व आणि कार्यप्रदर्शन व्यवस्थापन चर्चा यावर मोमेंट्स दॅट मॅटर' नावाची दोन दिवसीय कार्यशाळा घेतली होती. तसेच गेल्या वर्षी, वरिष्ठ नेतृत्वाच्या एका संघाने अनेक आठवडे जगभरात प्रवास केला आणि ७०० जणांना नेतृत्व प्रशिक्षण आणि गुंतवून ठेवण्यासाठी विविध विषयांवर जसे की, नियुक्ती पद्धती, कार्यप्रदर्शन व्यवस्थापन आणि कंपनी संस्कृती यावर मार्गदर्शन केले.

स्प्रिंकलरची लिंक्डइन लर्निंगसोबत भागीदारीदेखील आहे. ज्यामुळे कर्मचाऱ्यांच्या लर्न-टू-ग्रो प्लॅन्समध्ये गुंतवणूक केली जाते. आमच्याकडे आमचे बहुतेक तांत्रिक आणि डोमेन आधारित प्रशिक्षण लियर्न नावाच्या कंपनीद्वारे केले जाते, जी एलएमएस म्हणून काम करते आणि आम्हाला आमच्या कर्मचाऱ्यांसाठी त्यांच्या भूमिका आणि प्रशिक्षणाच्या गरजांवर आधारित प्रशिक्षण सामग्री तयार करण्यास अनुमती देते, असे मुंजाल म्हणतात.

मुलाखतीचा शेवट करताना मुंजाल म्हणतात की कौशल्य, क्षमता, भूमिका स्पष्टता, उद्दिष्टे, ओकेआरएस आणि प्रभावी अभिप्राय यंत्रणा या दृष्टीने कर्मचाऱ्यांची उत्पादक क्षमता वाढवणे ही त्यांचे मुख्य ध्येय आहे. तसेच, कंपनी तिच्या विविध कार्यालयांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करत असल्याने, मनुष्यबळ विभागाचे आगामी प्रमुख कार्य हे सुनिश्चित करणे आहे की, कर्मचारी तांत्रिक स्तरावर कुशल आहेत.

गुरुदत्त दिनकर वाकदेकर

# कामगार हिताविषयी बोलू काही

हंगामी बेरोजगारी व त्यातून येणारी आर्थिक अस्थिरता ही समस्या केवळ औद्योगिक कामगारांपुरती मर्यादित नसून कामगारांच्या बरोबरीने उच्च पदावर काम करणाऱ्यांनादेखील या समस्येचा तितक्याच तीव्रतेने सामना करावा लागत आहे. वेतन व इतर सुविधांचा हा असमतोलपणा दूर करण्यासाठी सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्रातील उद्योगांबरोबरच केंद्र व राज्य सरकारांनी निश्चित कार्यक्रम आखला पाहिजे.

ठराविक वेतनावर नेमलेली व्यक्ती (प्रशिक्षणार्थीचा देखील यात समावेश आहे) म्हणजे कामगार अशी व्याख्या भारत सरकारच्या श्रम व रोजगार विभागाने केली आहे. सर्वसाधारणपणे, औद्योगिक आस्थापनेत शारीरिक मेहनतीचे किंवा कौशल्याचे अतांत्रिक किंवा तांत्रिक स्वरूपाचे काम करणाऱ्या व्यक्तीला कामगार म्हणून संबोधले जाते. त्यामुळे या व्याख्येनुसार विशिष्ट उद्योगातील अभियांत्रिकी, संगणक प्रणाली, व्यवस्थापकीय, प्रशासकीय इत्यादी तुलनेने वरच्या दर्जाचे काम करणाऱ्या व्यक्तींचा त्यात समावेश होत नसला तरी त्यांचेही काही प्रश्न आहेत आणि त्यांच्याकडे लक्ष द्यायला हवे. काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला (मग ती व्यक्ती कोणत्याही दर्जाचे किंवा पदावर काम करीत असेल) कायद्याने देऊ केलेले न्याय्य हक्क व कायदेशीर संरक्षण मिळाले पाहिजे. किमान वेतन, कामगारांना रोजगार विषयक हमी, समान काम समान वेतन, भेदभावपूर्ण वागणूक, कामाविषयक जबरदस्ती, कामाचे तास, कामाच्या ठिकाणची सुरक्षा व आरोग्य इत्यादी महत्त्वपूर्ण बाबींविषयी १८७ सदस्य-राष्ट्रे असलेल्या आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने (आयएलओ) 'आंतरराष्ट्रीय श्रम मानके' निश्चित केली आहेत, जी भारतानेदेखील मंजूर केली आहेत.

भारतामध्ये कारखाना कायदा, औद्योगिक कलह कायदा, कामगार संघटना कायदा, किमान वेतन कायदा यांसारखे कामगारांच्या हितासाठी आणि कल्याणासाठी अनेक कायदे त्या-त्या वेळच्या सरकारांनी अंमलात आणले आहेत. तथापि, वर्तमानस्थितीत देशातील औद्योगिक क्षेत्रांतील अनेक उद्योगांमध्ये कंत्राटी कामगार मोठ्या प्रमाणात नेमले जातात.

यासाठी सरकारने कंत्राटी कामगारांच्या हिताच्या दृष्टीने १९७०मध्ये कंत्राटी कामगार कायदा संमत केला. कायम किंवा नियमित स्वरूपात नेमण्यात आलेल्या कामगारांप्रमाणे कंत्राटी कामगारांना सद्यःस्थितीत रोजगारसंबंधीचे सर्व फायदे मिळतात का? त्याचे उत्तर नकारार्थी येते.

गेल्या काही वर्षांत देशातील कंत्राटी कामगारांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. आज देशामध्ये जवळपास ४६ टक्के कंत्राटी कामगार विविध उत्पादन, बांधकाम, सेवा उद्योगांमध्ये काम करीत आहेत. या सर्व कामगारांना रोजगारविषयक हमी, वर्तमान महागाईनुसार वेतन, पगारी रजा, सुरक्षा व आरोग्यविषयक हमी, भविष्य निर्वाह निधी, निवृत्ती वेतन यांसारख्या नियमित कामगारांना देण्यात येणाऱ्या सुविधा देण्यात येतात का? असे अनेक प्रश्न व समस्या कामगारांपुढे, विशेषतः कंत्राटी कामगारांसमोर आ वासून उभ्या आहेत. याचे उत्तर ना उद्योजकांकडे आहे ना सरकारकडे.

उद्योजकांच्या बाजूने विचार केला तर उद्योग चालू ठेवण्यासाठी कंत्राटी कामगार नेमणे त्यांना आवश्यक वाटते, तर सरकारच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास कंत्राटी रोजगारामुळे बेरोजगारी कमी करून अधिकाधिक लोकांना रोजगार उपलब्ध करून देता येतो. ही झाली या संदर्भातील सकारात्मक बाजू.

परंतु या सकारात्मकतेला नकारात्मकतेची एक गडद किनारही आहे आणि ती म्हणजे हंगामी बेरोजगारीची. याचे कारण औद्योगिक मागणीत वाढ होताच अनेक उद्योग विशिष्ट कालावधीसाठी निवडक फायदे देऊन रोजगार उपलब्ध करून देतात आणि कामाची निकड संपताच या कामगारांना घरची वाट दाखवली जाते.

इथे प्रश्न उपस्थित होतो तो आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या कामगारहित विषयक कायद्याचा. अशाप्रकारे कामगारांचे कोणते हित जपले जाते? कोणती हमी, सुरक्षा, सुविधा कामगारांना दिली जाते? याविषयी सरकार पातळीवर गांभीर्याने विचार व्हायला हवा.

**रोजगार गमावण्याची समस्या**

सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी व ब्लूमबर्ग या आर्थिक घडामोडींचा अभ्यास करणाऱ्या संस्थांनुसार २०२३ मध्ये भारतातील बेरोजगारी दर जानेवारी महिन्यातील ७.१४ टक्क्यांवरून एप्रिलमध्ये ८.११ टक्क्यांपर्यंत वाढला.

भारतातील माहिती तंत्रज्ञान उद्योगात मार्च २०२२ अखेर एकूण ५१ लाख कामगारांपैकी सहा टक्के कंत्राटी कामगारांना शेवटच्या तिमाहीत आपला रोजगार गमवावा लागला तर भारतातील वाहन उद्योगांमधील मारुती सुझुकी व महिंद्रा या आंतरराष्ट्रीय स्तरावरील उद्योगांमध्ये निम्म्याहून अधिक कामगार कंत्राटी स्वरूपात नेमले जातात. हीच स्थिती देशातील इतर अनेक उद्योगांमध्ये आढळून येते.

या सर्व कामगारांचे हित नेमके कशाप्रकारे संरक्षित केले जाते, त्याचबरोबर अशा हंगामी बेरोजगारीचा त्यांच्या कुटुंबावर, आर्थिक स्थितीवर तसेच समाजातील त्यांच्या स्थानावर काय परिणाम होतो हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. औद्योगिक क्षेत्रातील कंत्राटी कामगारांच्या समस्या.

अधिकारी, डॉक्टर, अभियंते, संगणक अभियंते, वकील, शिक्षक, प्राध्यापक इत्यादींच्या तुलनेने वरच्या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना देखील वर्तमान स्थितीत औद्योगिक क्षेत्रातील कंत्राटी कामगारांप्रमाणेच अनेक समस्या भेडसावत आहेत.

आज अनेक आस्थापना, संस्था व उद्योगांमध्ये उपरोक्त पदांवरील कर्मचारी तात्पुरत्या काळासाठी, निवडक कामासाठी नेमले जातात आणि त्यांचा कामाचा कालावधी तसेच दिलेले काम संपताच त्यांना कमी केले जाते. आज देशातील अनेक विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा, शैक्षणिक संस्थांमध्ये ठराविक काळासाठी शिक्षक, प्राध्यापक या पदांवर नेमणूका केल्या जातात.

**शिक्षक कराराविना**

आजमितीस सुमारे १२.७ टक्के कंत्राटी शिक्षक देशात विविध शैक्षणिक संस्थांमध्ये कार्यरत असून शाळांतील स्थिती यापेक्षा विदारक आहे. युनेस्कोच्या स्टेट ऑफ द एज्युकेशन रिपोर्ट फॉर इंडिया, २०२० नुसार भारतात सरकारी व खाजगी क्षेत्रातील शाळांमध्ये ४२ टक्के शिक्षक कराराविना व दहा हजार रुपयांपेक्षा कमी वेतनावर ज्ञानदानाचे काम करीत आहेत. त्यामुळे त्यांच्याबाबतीत नेहमी सहानुभूती व्यक्त करण्यात येते.

या नेमणुका करताना त्यांना देण्यात येणारे वेतन, भत्ते, सुविधा या बाबतीत भेदभावपूर्ण वागणूक दिली जाते. अशा स्थितीत विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिक्षणाचा दर्जा कसा राखणार असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. संस्थांच्या काही आर्थिक किंवा अन्य समस्या असतीलही, परंतु अशाप्रकारे या विद्वत् कर्मचाऱ्यांचे हित कसे जपले जाते हा अनुत्तरित प्रश्न आहे. त्यामुळे या समस्या केवळ औद्योगिक कामगारांच्या आहेत असे नव्हे तर उच्चविद्याविभूषित कर्मचाऱ्यांनाही आहेत.

थोडक्यात, हंगामी बेरोजगारी व त्यातून येणारी आर्थिक अस्थिरता ही समस्या केवळ औद्योगिक कामगारांपुरती मर्यादित नाही. कामगारांच्या बरोबरीने उच्च पदावर काम करणाऱ्यांना देखील या समस्येचा तितक्याच तीव्रतेने सामना करावा लागत आहे. वेतन आणि इतर सुविधांचा हा असमतोलपणा दूर करण्यासाठी सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्रातील उद्योगांबरोबरच केंद्र आणि राज्य सरकारांनी निश्चित कार्यक्रम आखला पाहिजे. हे कामगारांच्या हिताचे असून अंतिमतः उद्योगांच्या आणि देशाच्या हिताचे आहे. याचे कारण कामगार संतुष्ट असेल तर देशाच्या आर्थिक विकासालाही पोषक वातावरणाची निर्मिती होईल.

डॉ. अशोक कुडले

(लेखक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात अर्थ-शास्त्राचे अध्यापन करतात.)

## सीमाभागातील उमेदवार तलाठी होण्यापासून वंचित

**मुंबई** : राज्य शासनाच्या महसूल विभागाकडून ४ हजार ६४४ तलाठी पदांसाठी उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. त्यास भरभरून प्रतिसाद मिळाला असून आतापर्यंत दहा लाखांहून अधिक अर्ज प्राप्त झाले आहेत. मात्र, असे असले तरी तलाठी 'क' प्रवर्गाच्या गट जाहिरातीत आणि अर्ज दाखल करण्याच्या ऑनलाइन पोर्टलमध्ये राज्याच्या सीमाभागातील ८६५ मराठी भाषक गावांचा समावेश नसल्याने उमेदवार या प्रक्रियेपासून वंचित राहणार आहेत. या उमेदवारांनी महसूल मंत्र्यांना पत्र लिहिले आहे.

महाराष्ट्र सरकारने कर्नाटक सीमाभागातील मराठी भाषिकांना महाराष्ट्र राज्याचे सक्षम नागरिक म्हणून ८६५ गावांतील रहिवाशांना मान्यता दिली आहे. त्यानुसार ही पदे भरली जावीत, अशी इथल्या उमेदवारांची मागणी आहे.

हार्दिक शुभेच्छा...



रवि शिराळे
+९१-९८२३८ ४६३३३
+९१-९८२३८ ४५००१

SMARAT
PLY
MICA
DOOR
Inspired by Nature

साईद्वार
प्लायवुड अँड हार्डवेअर

फायबर डोअर, सागवान डोअर, फ्लश डोअर, विनियर डोअर, पीव्हीसी डोअर

-: संपर्क :-
शॉप नं. ३ए, भागचंद कॉम्प्लेक्स, अंबड चौफुली, जालना - ४३१२०३.
फोन नं. : ०२४८२-२२४४५८
ई मेल : saidwardoor@gmail.com

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...



रिद्धी गणेश कुबल
१८-०८-२०२३
संगणक विभाग

तुम्हाला लाभो उदंड आयुष्य, हीच मनात सदैव इच्छा
तुमच्या स्वप्नांना येऊ दे बहर, जन्मदिनी ह्याच शुभेच्छा !!!

-: शुभेच्छुक :-
'कर्मचारी टाईम्स' परिवार

♦ संपादक : एम.एम. उर्फ भाऊसाहेब पठाण ♦ कार्यकारी संपादक : अशोक रामचंद्र शिंदे प्रकाशक-मुद्रक : श्री.एम.एम. उर्फ भाऊसाहेब पठाण यांनी 'कर्मचारी टाइम्स' हे मासिक राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ साठी प्लासकोट इंडस्ट्रीज, २३, म्युनिसिपल इंडस्ट्रीअल इस्टेट, केशवराव खाड्ये मार्ग, जेकब सर्कल, मुंबई ४०००११ येथे छापून राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, ९, नवीन प्रशासन भवन, तळमजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालयसमोर, मुंबई ४०००३२ येथे प्रसिद्ध केले. शीर्षक सत्यापन क्रमांक ५२०२८ दिनांक ११/१०/२०२२ माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारद्वारा प्राप्त.♦ संपर्क संपादकीय : ९८९०९१६५८८, ९८२१३७४६२६, जाहिरात : ९८९०९१६५८८, ७९७२९२७०१५ वितरण : ९८९०९१६५८८, ९५०३५७९५५२ ई मेल : karmacharitimes@gmail.com वेबसाईट : www.karmacharitimes.com ♦ सर्व कायदेशीर बाबी मुंबई न्यायालयाच्या कक्षेत ♦ (प्रेरणास्थान : आदरणीय कै. र.ग.कर्णिक, संस्थापक : भाऊसाहेब पठाण)

♦ Editor : M.M. Alias Bhausaheb Pathan Executive Editor : Ashok Ramchandra Shinde Publisher Printer : Shri. M.M. Alias Bhausaheb Pathan printed the magazine 'Karmachari Times' for State Government Group D (Class IV) Employee Central Federation at Plascote Industries, 23 Municipal Industrial Estate, Keshavrao Khadye Marg, Jacob Circle, Mumbai 400011. State Government Group D (Class IV) Employees Central Federation, 9, New Administration Building, Ground Floor, Madam Cama Marg, Opposite Mantralaya, Mumbai 400032. Title Verification No. 52028 dated 11/10/2022 Received by Ministry of Information and Broadcasting, Government of India. ♦ Contact - Editorial : 9890916588, 9821374626 ♦ Advertisement : 9890916588, 9503579552 ♦ Distribution : 9890916588, 9503579552
E-mail : karmacharitimes@gmail.com Website : www.karmacharitimes.com ♦ All Legal matter subject to Mumbai Jurisdiction